SJB/ KGS/ MHM/ 10:00

( **सभापतीस्थानी माननीय उपसभापती**)

:: **अर्धा-तास चर्चा** ::

**पृ.शी.**: राहनाळ हळवेपाडा (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील आदिवासी, दलित इत्यादींच्या झोपडया पाडण्याबाबत.

**मु.शी.**: राहनाळ हळवेपाडा (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील आदिवासी, दलित इत्यादींच्या झोपडया पाडण्याबाबत या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 13224 ला दिनांक 17 मार्च, 2006 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात डॉ.अशोक मोडक, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

डॉ.अशोक मोडक (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, "राहनाळ हळवेपाडा (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील आदिवासी, दलित इत्यादींच्या झोपडया पाडण्याबाबत" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 13224 ला दिनांक 17 मार्च, 2006 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये अर्धा-तास चर्चा चर्चा उपस्थित करीत आहे.

महोदय, सन्माननीय मंत्री महोदय डॉ.राजेंद्र शिंगणे यांनी याच विषयाच्या अनुषंगाने पावसाळी अधिवेशनामध्ये माझ्या आणि सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांच्या प्रश्नाला उत्तर दिले होते. परंतु दुर्दैवाने असे सांगण्याची वेळ आली आहे की, अद्यापपावेतो राहनाळ हळवेपाडा (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील आदिवासी, दलित, भटक्या, विमुक्त या लोकांचे पुनर्वसन झालेले नाही. माझी अशी माहिती आहे की, कालपासून भिवंडीच्या तहसील कचेरीसमोर ही माणसे उपोषणास आणि धरणे धरावयास बसलेली आहेत. ती मंडळी शासनाकडून न्यायाची अपेक्षा करीत आहेत. या विषयाच्या अनुषंगाने दिनांक 17 मार्च, 2006 रोजी विधिमंडळात प्रश्न आला होता. त्यावेळेला जे उत्तर देण्यात आले होते त्यामध्ये विसंगती असल्यामुळे आज अर्धा-तास चर्चेचे आयोजन करावे लागले आहे. दिनांक 17 मार्च रोजी, सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय दत्त, गोविंदराव आदिक आणि रमेश निकोसे यांनी प्रश्न उपस्थित केला होता. भिवंडी तालुक्यातील राहनाळ हळवेपाडा येथील सुशिक्षित बेरोजगार, आदिवासी, दलित व भटके विमुक्तांच्या झोपडया पाडल्याच्या निषेधार्थ जिल्हाधिकारी ठाणे यांनी दिनांक 12 जुलै, 2005 रोजी सदर भागातील झोपडयांच्या पुनर्वसनाबाबत आश्वासन देऊनही अद्याप पुनर्वसन केले जात नाही अशी तक्रार

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.अशोक मोडक....

श्रमजीवी संघटनेने दिनांक 24 जानेवारी, 2006 रोजी लेखी निवेदनाद्वारे शासनाकडे केली होती. परंतु प्रश्नाच्या लेखी उत्तरामध्ये सन्माननीय मंत्री महोदय डॉ.पतंगराव कदम यांनी असा उल्लेख केला की, "निवेदन अद्याप प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही." महोदय, श्रमजीवी संघटनेच्या अध्यक्षा श्रीमती विद्युल्लता पंडित यांनी शासनाला दिलेले पत्र माझ्याकडे आहे. तसेच ते पत्र शासनाला प्राप्त झाल्याबाबतची शासनाची पोच पावतीही माझ्याकडे आहे. त्यामुळे मला माननीय मंत्री महोदयांना विचारावयाचे आहे की, याबाबत शासनाने काय कृती केली आहे ? हा प्रश्न केवळ पुनर्वसनाचा नाही. जागतिक बँकेच्या सहाय्यातून मेट्रो रेल्वे प्रकल्प, प्रपोज्ड रेल्वे प्रकल्प किंवा रस्ते अशी जी कामे घेण्यात येणार आहेत व त्यामुळे जी माणसे बेघर होणार आहेत त्यांचे केवळ रिसेटलमेंटच नव्हे तर रिहॅबिलिटेशन करण्यात येईल असे आश्वासन महाराष्ट्र सरकारने दिले हाते. परंतु ते आश्वासन अद्यापि पूर्ण केले गेले नाही. The World Bank has suspended aid and asssistance to Govt. of Maharashtra. दुर्दैवाने रिहॅबिलिटेशन तर सोडाच परंतु रिसेटलमेंटचा सुध्दा पत्ता नाही. महोदय, ज्यांच्या झोपडया पाडण्यात आल्या आहेत त्यांच्याकडे, रेशन कार्ड आहे, त्यांना 20 वर्षांपासून नागरी सोयी-सुविधा सुध्दा दिल्या जात आहेत.

महोदय, दिनांक 21 जुलै, 2005 रोजी माननीय मंत्री डॉ.राजेंद्र शिंगणे यांनी या सदनाला सांगितले होते की, हा विषय रेल्वे प्रशासनाचा असून, तो महाराष्ट्र सरकारच्या अधिकार क्षेत्रात असला तरी महाराष्ट्र सरकारशी सल्लामसलत करण्यात आली नाही. महोदय, हा विषय अत्यंत ज्वलंत असा विषय आहे. सन्माननीय सदस्य सर्वश्री जितेंद्र आव्हाड, मधुकर सरपोतदार, प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी त्यावेळी आम्ही ज्या मागण्या केल्या होत्या त्या मागण्यांना समर्थन दिले होते. सन्माननीय मंत्री डॉ.राजेंद्र शिंगणे हे त्यावेळी म्हणाले होते की, "सभापती महोदय, त्या ठिक्‍णी गेल्या 20 वर्षांपासून झोपडया आहेत. माननीय सदस्यांनी सांगितल्यानुसार त्यांना सर्व प्रकारच्या सोयी-सुविधा देण्याचे ठरविले आहे. 1 ते 9 हेक्टर इतक्या जागेच्या परिसरात या झोपडया होत्या. परंतु पावसाळयापूर्वी रेल्वे प्रशासनाने त्या झोपडया पाडल्या. रेल्वेच्या जागेमध्ये त्या झ ोपडया असल्यामुळे आम्ही त्या पाडणार आहोत, असे महाराष्ट्र शासनाला रेल्वे प्रशासनाने

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.अशोक मोडक....

कळविले नव्हते. झोपडया उघडयावर असल्यामुळे शेड उभारुन त्यामध्ये लोक राहत आहेत. त्यामुळे महाराष्ट्र शासनाची त्या परिसरात जागा असल्यास, त्या जागेवर त्यांचे पुनर्वसन करण्याबाबत विचार केला जाईल." महोदय, माझा सांगण्याचा उद्देश एवढाच आहे की, आता पावसाळा तोंडावर आलेला आहे. त्यामुळे या लोकांना लवकरात लवकर न्याय देण्याच्या दृष्टिकोनातून शासनाने प्रयत्न करावेत, अशी या अर्धा-तास चर्चेच्या माध्यमातून विनंती करतो व माझे भाषण पूर्ण करतो.

----------

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. राजेंद्र शिंगणे ( महसूल व पुनर्वसन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. अशोक मोडक साहेबांनी सांगितल्याप्रमाणे, मौजे राहनाळ हळवेपाडा येथील रेल्वेच्या जागेवर असलेल्या झोपडपट्टीवासियांचा हा प्रश्न आहे. गेल्या 15-20 वर्षापासून ते त्या ठिकाणी राहत असताना देखील मागील पावसाळ्यामध्ये रेल्वेने त्यांना त्या ठिकाणाहून उठविले. त्या परिसरामध्ये जर कोणती महाराष्ट्र शासनाची जागा असेल तर तेथे त्यांचे पुनर्वसन करण्याचा जरुर विचार करण्यात येईल, अशाप्रकारचे आश्वासन मी मागील अधिवेशनात या सभागृहात दिले होते. सभापती महोदय, रेल्वेच्या जागेमध्ये अनेक वर्षापासून राहत असताना देखील त्यांना सर्व प्रकारच्या सुविधा मिळत होत्या. त्यांचे मतदार यादीत नाव आहे, तसेच त्यांच्याकडे रेशनकार्डही आहे. सभापती महोदय, त्या परिसरामध्ये महसूल खात्याच्या दोन जागा आहेत. त्यातील पहिली जागा, कारिवाली येथे असून ती 10 हेक्टर एवढी आहे, जी त्या ठिकाणाहून एक कि.मी. अंतरावर आहे. तसेच दुसरी जागा " सर्व्हे 130 पैकी 191 " असून ती जागा एकूण 12 हेक्टर 84 आर एवढी आहे. सभापती महोदय, त्या ठिकाणी देखील बऱ्याच मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाले आहे. त्या परिसरामध्ये महसूल खात्याची जवळपास साडे तीन-चार एकर जागा आहे. सभापती महोदय, रेल्वेच्या त्या जागेमध्ये जे लोक सद्य:स्थितीत राहत आहेत, त्यांना तेथेच ठेवता येईल का, या विषयावर रेल्वे प्रशासनाशी चर्चा करण्यात येणार आहे. त्यातून देखील रेल्वे प्रशासनाने मान्य केले नाही तर आपल्याकडे दोन जागा आहेतच. त्या दोन जागापैंकी एका जागेवर निश्चितपणे त्यांचे पुनर्वसन करण्याचा निर्णय घेण्यात येईल व त्या संदर्भातील कार्यवाही करण्यात येईल.

**उपसभापती** : माननीय मंत्रीमहोदय, याच प्रश्नाच्या अनुषंगाने माझे आपल्याला एक सांगणे आहे. या ठिकाणी माननीय पालकमंत्री देखील उपस्थित आहेत. भिवंडीच्या पट्ट्यामध्ये गोरगरिबांनी जर अतिक्रमण करुन स्वत:च्या निवाऱ्याकरिता घर बांधले असेल तर आपण त्यांना तेथून काढण्याची तत्परता दाखवितो. परंतु येथे दलित वर्गाने फार मोठ्या प्रमाणात अतिक्रमण केलेले आहे. त्या कोट्यावधी रुपयांच्या अतिक्रमणाकडे स्थानिक प्रशासनाचे लक्ष नाही. आमच्या सारख्यांनी तक्रार केल्यानंतरही स्थानिक प्रशासन डोळे झाकून, काहीही न करता गप्प बसले आहे. याचा अर्थ आम्ही नेमका काय समजायचा ? आम्ही शासनाकडे तक्रार केली, शासनाने कार्यवाही करायला सांगितले तरी स्थानिक प्रशासन सांगते की, शासनाचे मंत्री आमच्यावर दबाव आणतात.

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**माननीय उपसभापती ....**

माननीय मंत्रीमहोदय, या सर्व गोष्टी शासनास भूषणावह नाहीत. तरी, या भागात जेवढी अतिक्रमणे झालेली आहेत, ती सर्व ताबडतोब 15 दिवसांत काढायला सुरुवात करावी, असे मी आपल्याला निदेश देतो. ते निदेश आपण पाळावेत. " आग सोमेश्वरी, बंब रामेश्वरी " असा प्रकार पूर्वी कधीही झाला नव्हता. शासनाने कारवाई करायला सांगितल्यावर स्थानिक प्रशासन दुसऱ्याच प्रश्नाकडे हात घालते. प्रशासन अशाप्रकारे वागत असल्यामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. प्रशासन कारण नसताना आपली व सभागृहाची दिशाभूल करत आहे. तरी या संदर्भात गंभीर पावले उचलावी लागतील.

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, आपण अतिशय महत्वाच्या गोष्टींवर प्रकाश टाकला आहे. परंतु मी आपल्या एक बाब मुद्दाम निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, ठाणे जिल्ह्यातील पूर्वीचा व्यवसाय आणि आताचा व्यवसाय यामध्ये बदल झालेला आहे. नागरीकरण होत असल्यामुळे तेथील स्थानिक घटक शेतीवर गोडावून बांधून भाड्याने देत आहेत आणि आपला उदरनिर्वाह करीत आहे. कारण त्या जमिनी समुद्राच्या पाण्याने अतिशय नापीक झालेल्या आहेत. आज त्यांच्याकडे उदरनिर्वाहाचे कोणतेही साधन नसल्याकारणाने त्यांनी तेथे गोडाऊन्स बांधली आहेत.

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VVK/ KGS/ MHM/ प्रथम श्री. कांबळे.. 10:10

श्री. गणेश नाईक..

गोडाऊन बांधतांना त्यांनी एक चूक केलेली आहे ती म्हणजे त्यांनी एन.ए. परमिशन घेतलेली नाही. आपण दिलेले निदेश योग्य आहेत, ही गोडाऊन ज्यांनी बांधलेली आहेत त्या लोकांना कायद्याच्या कक्षेत आणण्याच्या दृष्टीने निर्णय घेतला पाहिजे. म्हणून त्यांनी एन.ए. परमिशन घेतली पाहिजे, एन.ए. परमिशनसाठी जी फी आहे ती त्यांनी भरुन कायद्याच्या कक्षेत यावयास पाहिजे. स्वत:च्या जमिनीवर ज्यांचे बांधकाम आहे त्याबाबत वेगळा विचार व्हावा, सरकारी जमिनीवर जे अतिक्रमणे झालेली आहे त्याबाबत आपण दिलेले निदेश अतिशय योग्य आहेत.

**उपसभापती** : पालकमंत्री महोदयांनी जे विचार मांडले त्याबाबत मी पूर्णपणे सहमत आहे. त्यामध्ये संशोधनाचा मुद्दा असा आहे की, स्थानिक भूमिपुत्रांनी केलेली कामे किती आहेत, आणि जमिनीवर बाहेरच्या बिल्डरांनी येऊन मजा मारलेले लोक किती आहेत. हा देखील संशोधनाचा मुद्दा आहे जो आपण टाळू शकत नाही. स्थानिक भूमिपुत्राच्या बाबतीत आमची देखील भूमिका सहमतीची असेल. परंतु स्थानिक भुमिपुत्रांच्या खांद्यावर बंदूक ठेऊन जी मंडळी त्यांचा लाभ घेत आहेत. त्यांना देखील शासन क्षमा करणार आहे काय ? हा महत्वाचा मुद्दा आहे, या मुद्दयाला कोठल्याही बाबतीत मी बगल देऊ शकत नाही.

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, आपल्या मताशी मी सहमत आहे, स्थानिक भूमिपुत्रांच्या जमिनीवर एखाद्याने भाडयाने जमीन दिल्यानंतर त्या लोकांनी ती जमीन एन.ए. करुन घेणे गरजेची आहे. ते कायद्याच्या कक्षेत येऊन त्यांनी जर फी भरली तर ते तोडणे पण गरजेचे आहे. गोडाऊन जर स्थानिक लोकांच्या जमिनीवर बांधलेले असतील आणि ती जर तोडली गेली तर त्यांचे भाडे त्या ठिकाणी त्यांना मिळणार नाही. त्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची पाळी येईल. त्या अनुषंगाने आपले निदेश निश्चितपणे सवार्थाने लोकांच्या हिताची जपणूक करणारे असतांना ते कायद्याचे पालन करणारे असावेत असे मला वाटते.

**उपसभापती** : मी दिलेले सर्व निदेश कायदेशीर आहेत, व ते कायद्याचे पालन करणारे आहेत त्याबाबत सभागृहात कोणाचेही दुमत असू नये. मात्र ज्या अधिकाऱ्यांनी मागील दिलेले निदेश पाळलेले नाहीत, त्यांच्यावर येत्या 15 दिवसांत आपण कारवाई करा, आणि कारवाईचा अहवाल सभागृहासमोर 15 दिवसांत सादर करण्यात यावा.

......2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, दोन सन्माननीय व्यक्तींनी अतिक्रमणाचा उल्लेख केलेला आहे. हा विषय अतिक्रमणाचा नाही. मी परत ही चर्चा ट्रकवर आणू इच्छितो. यामध्ये गैरसमज होऊ नये म्हणून गेली 20 वर्ष जी माणसे राहतात, ज्यांच्याकडे रेशन कार्ड आहेत, आपण जे म्हणत आहात तो विषय थोडा वेगळा आहे तो तळटीपेमध्ये घालण्यासारखा आहे. तो विषय महत्वाचा नाही असे मी म्हणत नाही. किंबहुना मघाशी जागतिक बँक व महाराष्ट्र शासनाच्या कराराचा मी उल्लेख केला तेथे ही तो भाग आहे. मी त्या विषयाकडे जाऊ इच्छित नाही. सन्माननीय मंत्री महोदयांनी दिलेले उत्तर मला समाधानकारक वाटते. पंरतु मला येथे एक विनंती करावयाची आहे की, आपण दोन मुद्दे मांडले, त्यातील एक असा आहे की, पूर्वी जेथे लोक राहत होते, तेथेच त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी अग्रकम दिला जाईल, आणि दुसरा विषय आपण असा मांडला की, सरकारने काही जागा बघितल्या आहेत, त्या ठिकाणी त्यांचे पुनर्वसन करण्यात येईल. माझी विनंती अशी आहे की, पावसाळा त्यामानाने जवळ आलेला आहे आणि त्यांचे गांभीर्य लक्षाात घेऊन आपण कृपया याबाबत काही डेडलाईन सांगू शकाल काय ? आणि या दोघांनीही जो विषय मांडला होता, त्यामध्ये खरोखर आणखी काही मधल्या काळात लोक तेथे जाऊन घुसले असतील, त्यांचे अतिक्रमण आहे. आणि अनेकदा असे घडते की, "धन्याला धत्तुरा आणि चोराला मलिदा " असे हाणार नाही ना असे दोन प्रश्न माझ्या मनात आहेत.

डॉ. राजेद्र शिंगणे : सभापती महोदय, येथील सर्व लोकांचे पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने येत्या सोमवारी किंवा मंगळवारी श्रमजीवी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेतो, लवकरात लवकर येथील सर्व लोकांचे पुनर्वसन आहे त्या जागेवर किंवा महाराष्ट्र शासनाच्या ज्या दोन जागा आहेत त्या जागांवर करण्यात येईल. यामध्ये प्रामुख्याने आपण असा उल्लेख केला की, शासनाच्या एकूण 14 एकर जागा आहे त्यातील 10 एकर जागेवर अतिक्रमण झालेले आहे तेथे 4 एकर जागा शिल्लक आहे, आणि दुसरी कारिवली येथे जी जागा शिल्लक आहे, या तीन जागांच्या पर्यायापैकी कोणत्या जागेवर ताबडतोबीने पुनर्वसन करता येईल हे पहावे लागेल. कारण रेल्वेच्या जागेवर जर पुनर्वसन करावयाचे असेल तर त्यांच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करुन तेथे पुनर्वसन करणे शक्य असेल तर आणि त्यांनी जर त्या ठिकाणी मान्यता दिली तर ही कार्यवाही लवकरात लवकर करता येईल. तसेच शासनाच्या जागेवर सुध्दा ताबडतोब पुनर्वसन करता येईल.

....3...



VVK/ KGS/ MHM/ प्रथम श्री. कांबळे.. 10:10

डॉ. राजेंद्र शिंगणे...

आणि म्हणून येत्या सोमवारी किंवा मंगळवारी श्रमजीवी संघटनेच्या लोकांना आणि ज्यांनी अतिक्रमण केलेले आहे त्यातील सुध्दा दोन-तीन लोकांना बैठकीला बोलवून घेण्यात येईल याबाबत टाईम बाऊंड कार्यक्रम ठरविण्यात येईल. तसेच सन्माननीय सभापती महोदयांनी जे निदेश दिलेले आहेत त्या निदेशाप्रमाणे ठाणे जिल्हयामध्ये जी अतिक्रमणे झालेले आहेत त्यांच्यावर कारवाई करण्याचे मी सांगितले होते, परंतु दुर्दैवाने अजूनपर्यंत कारवाई झालेली नाही. याबाबत ताबडतोबीने कारवाईला सुरुवात करण्यात येईल. येत्या 15 ते 20 दिवसांत ही कारवाई पूर्ण करुन याचा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल, ठाणे जिल्हयाच्या संदर्भात मागील आठवडयामध्ये लक्षवेधीला उत्तर देत असतांना  मी खालच्या सभागृहात असे सांगितले आहे की,.....

यानंतर श्री. सांगळे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.राजेंद्र शिंगणे ....

गौण खनिजाचे उत्खनन होणे, वाळूची बेकायदेशीर वाहतूक होत आहे याबाबत जिल्हाधिका-यांनी जवळपास 75 कोटी रुपये वसूल होण्यासाठी अनेक बिल्डर्सना व लोकांना नोटीसा पाठवलेल्या आहेत. ही वसुली सुध्दा सुरु आहे. ही वसुली झाली नाही तर संबंधितांवर फौजदारी कारवाई करण्याचे शासनाकडून सुचवण्यात आले आहे.

उपसभापती : या पध्दतीने सीआरझेड चे फार मोठया प्रमाणात उल्लंघन होत आहे. या संदर्भात माझी माननीय मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, आपण स्वत: आपल्या सोयीच्या वेळेला त्या ठिकाणी भेट देऊन सीआरझेडचे किती उल्लंघन झाले आहे याची पाहणी करावी व याबाबत सुध्दा आपण योग्य ती कार्यवाही करावी असे मी आपल्याला निदेश देतो.

डॉ.राजेंद्र शिंगणे : ठीक आहे.

डॉ.अशोक मोडक : सभापती महोदय, आपण सर्वजण माझ्या मताशी सहमत व्हाल असे मला वाटते. या ठिकाणी चर्चा झाल्याचा एक फायदा आहे. Railway administration must take government of Maharashtra in confidence. या सर्व प्रकरणात ही चर्चा झालीच नसती तर त्यांना कोणी न्याय दिला असता, म्हणूनच एका अर्थाने एक्झरसाईज करताना माझी आपल्याला विनंती आहे की, भविष्यात असे प्रकार होता कामा नयेत यासाठी रेल्वे प्रशासनाला एखादे पत्र पाठविण्याबाबत या ठिकाणी माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले तर बरे होईल.

डॉ.राजेंद्र शिंगणे : या संदर्भात रेल्वे प्रशासनाला सुध्दा निश्चितपणे तशाच प्रकारचे पत्र पाठविण्यात येईल.

--------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मिथेनॉलच्या गैरवापरामुळे मानवी जीवनाला निर्माण झालेला धोका

**मु. शी.** :मिथेनॉलच्या गैरवापरामुळे मानवी जीवनाला निर्माण झालेला धोका यासंबंधी डॉ.नीलम गो-हे यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

डॉ.नीलम गो-हे ( विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करते.

"मुंबई शहरात मिथेनॉल हे विषारी मिश्रण नशा येण्यासाठी हातभट्टीच्या दारुत सर्रास मिसळण्यात आल्याने सदर मिथेनॉल रसायन हे प्रमाणापेक्षा जास्त मिसळले गेल्यामुळे मिथेनॉल मिश्रित दारु पिऊन सातरस्ता व विक्रोळी येथे शेकडो लोकांना आलेला मृत्यू, मिथेनॉल हे रसायन बाजारात सहज उपलब्ध होत आहे, त्यांच्या गैरवापरांमुळे मानवी जीवनाला निर्माण झालेला गंभीर धोका, अशीच मिथेनॉल मिश्रित दारु १०-१२ वर्षापूर्वी मुंबईच्या छाया बारमध्ये प्याल्याने त्यावेळीही शेकडो व्यक्तींचा झालेला मृत्यू लक्षात घेता राज्यात मिथेनॉल या रसायनासाठी परवाना अत्यावश्यक करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना. "

सभापती महोदय, प्रत्येक वेळी एखादी दुर्घटना घडली की, त्यावेळी वातावरण खूप तापते. परंतु अनेक वेळी पुढील नवीन संकट येईपर्यंत मूळ प्रश्नाबाबत कार्यवाही करण्याबाबतचे शासनाचे धोरण पुरेसे स्पष्ट दिसत नाही, असे लक्षात येते. सभापती महोदय, आपल्याला कल्पनाच आहे की, महाराष्ट्रामध्ये गेल्या अनेक वर्षांमध्ये हातभट्टीच्या दारुमध्ये मिथेनॉल नावाचे विषारी मिश्रण मिसळल्यामुळे शेकडो लोक मृत्युमुखी पडले आहेत. या प्रश्नाच्या संदर्भात चर्चा सुरु झाल्यानंतर काही वेगवेगळे संदर्भ समजून घेण्याची आवश्यकता आहे. म्हणून गेल्या वर्षापासून मी या विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करीत होते. पूर्णपणे दारुबंदी करावी ही बाब अव्यवहार्य नसल्याचे अनेक लोकांचे म्हणणे आहे. याचे मुख्य कारण म्हणजे हप्ता राज, किंवा वेगवेगळया प्रकारच्या गावठी दारुचे सुरु असलेले थैमान. या संदर्भात वेगवेगळे अनुभव लक्षात घेतल्यास तीन प्रकारच्या लॉबीज यामध्ये काम करताना दिसतात. पहिली लॉबी मध्ये वेगवेगळया दारु उत्पादकांनी स्वत:ची बाजारपेठ वाढवण्यासाठी आपली माणसे ठेवलेली असतात. या लॉबीमध्ये विदेशी मद्याच्या संदर्भात युरोप तसेच अशिया खंडातील विशेषत: थायलंड सारख्या देशांमध्ये तयार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MJS/ MHM/ KGS/ प्रथम श्री.विठ्ठल खर्चे .... 10:15

डॉ.नीलम गो-हे .....

झालेली दारु आपल्या देशात मिळते. दुसरी बाब म्हणजे गेल्या 2-3 वर्षात सरळसरळ शासनाने बियरला चालना देण्यासाठी, ज्यामध्ये कमी प्रमाणात दारु आहे, अशाप्रकारची बियर कशी उपलब्ध होईल, बियर उत्पादकांच्या दृष्टीने उत्पन्नवाढीला व उद्योगवाढीला चालना देण्यासाठी घेतलेली भूमिका. याच गटामध्ये देशी दारुचे उत्पादन करणारे सुध्दा लोक आहेत. त्यांचे सुध्दा स्वत:चे काही म्हणणे आहे. तसेच चौथी लॉबी ज्याबद्दल वारंवार चर्चा होत आहे त्याबद्दल मी काही बोलणे योग्य होणार नाही. परंतु महाराष्ट्र शासनाने ऑन पेपर वाईनला चालना देण्यासाठी वाईन ही दारु नाही अशा प्रकारची भूमिका घेतलेली आहे. तसेच दारु सगळीकडे लोकप्रिय असते, रात्री 9 ते 10 वाजल्यानंतर देशी दारुच्या दुकानामध्ये अनेक लोक दिसतात, तसेच हातभट्टीची दारु सुध्दा उपलब्ध होत आहे. दारुला संपूर्णपणे बाजूला करणारा एक फॅक्टर म्हणजे बनावट दारु होय. यामध्ये विदेशी दारु असेल, बियर असेल, देशी दारु असेल, वाईनचे उत्पादक असतील. सभापती महोदय, मी स्वत: आयुर्वेद डॉक्टर आहे. आयुर्वेदामध्ये अनेक लक्षणे दिलेली आहेत, त्या लक्षणांमध्ये दारु पिणा-या व्यक्तिच्या 5-6 स्टेजेस आहेत. या सर्व लक्षणांपासून दारु पिणा-या लोकांचे मत परिवर्तन करणे अशक्य आहे. या लक्षणांमध्ये असे सांगण्यात आले आहे की, 4-5 स्टेजेसनंतर दारु पिणारा माणूस तोंडाने काही आवाज काढायला लागतो, त्यापैकी काही आवाज गाढवासारखे असतात.

( यानंतर श्री.सुंबरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. गोऱ्हे ...

म्हणजे त्यांनी दिलेली लक्षणे पाहिली की आपल्याला आश्चर्य वाटते. म्हणून वाईनचे जेव्हा समर्थन केले जाते तेव्हा प्रश्न असा आहे की, विदेशी दारू असेल तर त्यावर किती कर असावा, तो कर वाढल्यामुळे लोक विदेशी वा देशी दारूकडे जाण्याचे बंद होतील का ? हा वादाचा विषय होऊ शकतो. दुसरा विषय म्हणजे आता वाईनला चालना दिली पाहिजे. सभापती महोदय, डॉ. राम मनोहर लोहिया यांनी एके ठिकाणी म्हटले आहे की, भाषा, मनषा, भोजन आणि भवन या चार मुद्यांमध्ये वरच्या स्तरामध्ये आणि वरच्या जातींमध्ये जन्माला आलेल्या लोकांचे अनुकरण कनिष्ठ जातीत जन्मलेले आणि कनिष्ठ आर्थिक परिस्थिती असलेले लोक करीत असतात. म्हणून प्रश्न असा येतो की, जी वाईन आपल्या लोकांना माहितीच नाही. वाईन प्यायची म्हणजे तोंडाला प्याला लावून घटाघटा वाईन पिणारे लोक जेथे आपल्याला दिसतात आणि युरोपसारख्या देशांमध्ये जेथे वाईन फारच थोडी, अगदी तेथील मॅनर्सचा भाग म्हणून वापरली जाते. आज दक्षिण आफ्रिकेसारख्या देशांमध्ये देखील भारतासारखेच प्रश्न आपल्याला दिसताहेत. म्हणून येथे मिथेनॉलचा संबंध या सगळ्या विषयांशी येतो. मग ती देशी दारू असेल, विदेशी दारू असेल, बिअर असेल आणि अनेक ठिकाणी आपल्याला चित्र असे दिसते की, जे यातील दर्दी आहेत अशा काही लोकांबरोबर, मग ते ड्रायव्हर असेल वा इतरही अन्य वेगवेगळ्या लोकांबरोबर मी या संदर्भात माहिती घेण्याच्यादृष्टीने बोलले आहे. विशेषत: आमच्याकडे खूप दारुड्या लोकांच्या पत्नी त्यांना घेऊन येत असतात. त्यावेळी मी त्यांना विचारते की, हा माणूस दारूसाठी किती खर्च करतो? तर त्या सांगतात की, आम्हाला चांगल्या ब्रँडची दारू विकत घेणे परवडत नाही म्हणून मग आम्ही हातभट्टीची किंवा देशी दारू विकत घेण्याचा प्रयत्न करीत असतो. तेव्हा यामध्ये प्रश्न असा आहे की, या दारूमध्ये ज्याची भेसळ केली जाते ते मिथेनॉल हे सहजगत्या उपलब्ध असते. अनेक औषधांमध्ये देखील त्याचा उपयोग केला जातो. आपल्याला कोठल्याही औषध कारखानदाराला यामध्ये त्रास द्यायचा नाही. पण तरीही आपण दारूच्या संदर्भात एक खास विधेयक या विधीमंडळात पास केले आहे. त्यात म्हटलेले आहे की, दारूची वाहतूक करणे, मोटार चालवित असताना दारू पिणे, उद्यानासारख्या सार्वजनिक ठिकाणी दारू पिणे यावर बंदी आहे. म्हणजे यावर निर्बंध आणण्याचा आपण आपल्या परीने प्रयत्न केलेला आहे. म्हणून माझा या अर्धा तास चर्चा उपस्थित करण्यामागे हेतू हाच आहे की, विदेशी दारू असो, देशी दारू असो, हातभट्टीची दारू जी लोक

...... इ 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. गोऱ्हे ...

तयार करतात त्यासाठी मूळ द्रव्य म्हणून जे मिथेनॉल वापरले जाते त्यावर जोपर्यंत आपण निर्बंध आणीत नाही तोपर्यंत आपण कोठल्याही एका गटासाठी म्हणून, मग ती बिअर असो, विदेशी दारू असो, त्यातील वेगवेगळे ब्रँड असोत, किंवा वाईन असो., याचा कितीही प्रचार आणि प्रसार करण्याचा प्रयत्न केला आणि त्याच्याशी आमचे मतभेद असतील तरी देखील हे सर्व बाकीचे ब्रँड एका बाजूला आणि मिथेनॉलमुळे स्वस्त दारू उपलब्ध होते हे दुसऱ्या बाजूला. म्हणून तुम्ही याची असेसमेंट काढली तर तुम्ही मिथेनॉलवर काही ना काही नियंत्रण आणणे आवश्यक आहे. या संदर्भात माझ्याकडे दोन केसेस आहेत. एक औरंगाबाद येथील अंबड येथील केस आहे. ज्यामध्ये मोटारसायकल वरून या सगळ्या बनावट दारूची ने-आण चालली होती. आपल्या महाराष्ट्राच्या सीमेवर दीव-दमण जवळ प्रचंड प्रमाणात बनावट दारूचे कारखाने आहेत आणि तेथे मिक्सिंग करण्याचे काम चालते हे आपल्या सगळ्यांनाच माहिती आहे. म्हणून माझी अशी मागणी आहे की, मिथेनॉलचा ज्यांच्या ज्यांच्याकडे उपयोग होतो त्यांच्याकडे त्याबाबतची संपूर्णपणे नोंदणीची व्यवस्था असली पाहिजे. म्हणजे ते कोठल्या औषधासाठी ते मिथेनॉल लागते, किती प्रमाणात लागते आणि दुसरे महत्त्वाचे म्हणजे या मिथेनॉलची वाहतूक करताना त्यासाठी परवाना आहे का ? कशासाठी हे मिथेनॉल घेऊन चालले आहेत ? याची नोंद त्यांचेकडे असली पाहिजे. या स्वरूपाचे निर्बंध यावर आम्ही आणू असे आश्वासन मंत्री महोदयांनी जवळ जवळ वर्षापूर्वी दिले होते. म्हणून किती कोणाचे लायसेन्स वाढविण्यापेक्षा देखील या मिथेनॉलवर नियंत्रण आणणे आणि योग्य प्रकारे त्यात सुरक्षितता आणणे जेणे करून ते सहजगत्या वापरले जाणार नाही यासाठी शासन कोठली पावले उचलीत आहे याचे उत्तर मला येथे आपल्याकडून अपेक्षित आहे. दुसरा प्रश्न असा की, आम्ही दारूबंदी करतो, त्यासाठी धाडी टाकतो याबाबतीत बरेचसे धडाकेबाज खुलासे होत असतात परंतु शासनाचे या संदर्भातील धोरण हे दारूला प्रोत्साहन देणारेच आहे. एक उत्पादन म्हणूनच त्याकडे पाहिले जाते. माझे त्याबाबतीत म्हणणे असे आहे की, जे जे बेकायदेशीर गोष्टी घडतात त्यावर नियंत्रण जोपर्यंत आणले जात नाही तोपर्यंत त्याचा फायदा ना उत्पादकांना होतो, मात्र याच्या मधले असे जे गुंड-पुंड आहेत ते लोक यामध्ये स्वतःची लॉबी चालवून याच्या नावाने पुढे सरकतात. त्यामुळे नाव देशी-विदेशी दारूचे आणि प्रत्यक्षात मिथेनॉलच्या निमित्ताने जी अंडरवर्ल्डची आणि बाकीच्या गुंड लोकांची लॉबी आहे त्यांच्याकडे सगळे साम्राज्य जाते आहे. ते

...... इ 3 ..



KBS/MHM/KGS. श्री. सांगळे नंतर --- 10:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

थांबविण्याच्या दृष्टीकोनातून शासनाकडून आम्हाला योग्य ती उत्तरे मिळावीत अशी अपेक्षा मी व्यक्त करते. धन्यवाद.

***

( यानंतर श्री. सरफरे .... एफ 1 ..

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गणेश नाईक (उत्पादन शुल्क मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी मिथेनॉल मिश्रित हातभट्टीची दारु विकली जाते यासंबंधीची अर्धा तास चर्चा उपस्थित केली आहे. त्यावर त्यांनी आपले विचार व्यक्त करीत असतांना समाजामध्ये अशाप्रकारे मोठया प्रमाणामध्ये लोक दारु प्राशन करतात आणि त्यामुळे जी वाताहात होते त्याची कारणमीमांसा सांगितली. एक गोष्ट आपण मान्य केली पाहिजे की, समाजाची जी व्यवस्था आहे त्यामध्ये पूर्णपणे दारुच्या आहारी गेलेला माणूस हा दारु सोडण्याच्या मनस्थितीमध्ये नसतो.पूर्वीच्या कालखंडामध्ये सोमरस म्हणून दारुचा उल्लेख केला जात असे. दारुचे व्यसन हे केव्हाही वाईट असते. दारु पिण्याचे समर्थन करण्याच्या भानगडीमध्ये शहाण्या माणसाने पडू नये आणि कुणी पडणार नाही. दारुच्या सेवनाने स्वत:ची शारीरिक हानी होते, त्याचबरोबर त्याचा संसारही उध्वस्त होतो. घरामध्ये व्यसनाधीन झालेली वडीलधारी माणसे, काका-मामा असतील तर त्यांना समजाविण्याच्या मनस्थितीमध्ये घरातील लहान मुले नसतात. बाल्यावस्थेमध्ये असल्यामुळे त्यांच्या मनामध्ये मोठया माणसांच्या या वाईट संवयीबद्दल नापसंती असते परंतु ती नापसंती बोलून व्यक्त करु शकत नाहीत. त्यामध्ये त्यांच्या मनाचा कोंडमारा होतो. माननीय सदस्यांनी दारुच्या आहारी गेलेल्या व्यक्तींच्या पाच स्टेजेस या ठिकाणी सांगितल्या. त्यापैकी शेवटच्या पाचव्या स्टेजमध्ये माणूस गेल्यानंतर व त्याचा मृत्यू झाल्यानंतर त्याचा संसार उघडा पडतो. पाचव्या स्टेजमध्ये त्याला मृत्यू येण्यापूर्वी त्याच्या शरीराची तडफड होत असते, त्याचे बोलणे-वागणे पशूसारखे असते. त्याचा संसार रस्त्यावर येण्याची परिस्थिती निर्माण होते. मी उत्पादन शुल्क खात्याचा मंत्री जरी असलो तरी माझ्या खात्याला किंवा राज्य सरकारला यामधून कराचे भरीव उत्पन्न मिळावे आणि राज्य शासनाच्या तिजोरीमध्ये भर पडावी या विचारसरणीचा मी नाही. परंतु एक गोष्ट सांगितली पाहिजे की, एखादी गोष्ट आपण कायद्याच्या कक्षेमध्ये आणल्यानंतर ती गोष्ट सामाजिकदृष्टया निषिध्द होते हे आपण निश्चितपणे मान्य केले पाहिजे. माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी व्हिस्की, रम, फेणी, बिअर, देशी दारु, वाईनचा उल्लेख केला. यामध्ये प्रत्येक व्यक्तीची मते, पक्षाची मते निरनिराळी आहेत. जो माणूस खाजगीत बोलतो ते सार्वजनिक जीवनामध्ये बोलतो असे नाही.दारु किंवा अल्कोहोल जवळ बाळगण्यासाठी लायसन्स घेतांना त्याला प्रतिज्ञापत्र द्यावे लागते. डॉक्टरच्या सल्ल्यानुसार त्याला परवाना मागावा लागतो. आणि डॉक्टरचा सल्ला जर नसेल तर त्या माणसाला दारु पिण्यासाठी परवानगी नाही. सभापती महोदय, मिथेनॉलचे मिश्रण दारुमध्ये केल्यामुळे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गणेश नाईक...

राज्यामध्ये ज्या घटना घडल्या आहेत त्या मन बधीर करणाऱ्या आहेत. त्यामध्ये 1971 मध्ये खोपोलीला खोपडीचे प्रकरण घडले, 1977 मध्ये घाटकोपर येथे, 1977 मध्ये चिपळूण येथे, 1988 मध्ये वरळी, मुंबई येथे, 1986 मध्ये नागपूरला, 1981 मध्ये पुणे-येरवडा येथे, 1984 मध्ये धुळे-विदारवाडी येथे, 1989 मध्ये कोल्हापूर येथे व 1990 मध्ये पुणे-यावल येथे, 1991 मध्ये मुंबई व पुणे येथे आणि शेवटी 2004 मध्ये मुंबईमध्ये अशाप्रकारे एकूण 11 घटना घडल्या आहेत.या घटनांमध्ये शेकडयांनी माणसे मरण पावली आहेत. खरे म्हणजे या गावठी दारुच्या सेवनामुळे एकप्रकारे मृत्यूचा सापळा रचला गेला आहे.

सभापती महोदय, तत्कालीन मुख्यमंत्री माननीय श्री. वसंतराव नाईक साहेबांच्या काळात देशी दारुचे परवाने देण्याची पध्दत राज्यात सुरु झाली. ही पध्दत सुरु झाल्यानंतरही हातभट्टी बनविण्याचे प्रकार थांबले नाहीत. माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, सन 2004-05 व 2005-06 मध्ये राज्य सरकारने जास्तीत जास्त हातभट्टी विरोधी मोहीम जोरकसपणे सुरु केली आहे.

(यानंतर श्री.किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ KGS/ पूर्वी श्री.सरफरे... 10:30

श्री.गणेश नाईक (पुढे सुरु...

पोलीस खाते आणि एक्झाईज आणि विविध सामाजिक संघटना, विविध पक्षाच्या लोकांच्या संघटना यांच्या सहकाऱ्यानी हातभट्टयांना पायबंद घातलेलेल आहे. याचा अर्थ वस्त्यांमधून चोरुनमारुन हे प्रकार होत नसतील, असे म्हणता येत नाही. मिथेनॉल घटक द्रव्य आहे, त्याबाबतचे नियंत्रण हे एफडीअेकडे गेलेले आहे. अशाप्रकारच्या घटना घडल्यानंतर श्री.पार्थसारथी यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमलेली होती. त्या समितीने 17 शिफारशी केलेल्या आहेत. त्यातील 9 शिफारशी या उत्पादन शुल्क विभागाशी संबंधित आहेत आणि अन्य 8 शिफारशी या अन्य विभागांशी संबंधित आहेत. या विषयावर गेल्या हिवाळी अधिवेशनामध्ये चर्चा झालेली आहे. या पेयामध्ये मिथेनॉल मिश्रण करतात, अशा लोकांवर कारवाई करण्याच्या संबंधात कायद्यामध्ये सुधारणा केलेली आहे. कमीत कमी दोन वर्ष ते सात वर्षे कैद आणि 25 हजार ते 2 लाखापर्यन्त दंड अशाप्रकारची शिक्षा कायद्यामध्ये केलेली आहे. अशाप्रकारची सुधारणा केल्यानंतर अशा घटना घडणार नाहीत, याची दक्षता शासन घेणार आहे. मी एकच सांगेन की, राज्य सरकारची यंत्रणा सर्वार्थाने या गोष्टीवर नियंत्रण ठेवणारी आहे, असे माझे म्हणणे नाही परंतु या गोष्टीच्या अनुषंगाने राज्य शासनाच्या विचाराशी समरस होऊन या गोष्टी लक्षात आणून देण्याचे माझे सुध्दा कर्तव्य आहे,अशाप्रकारची भावना लोकांमध्ये निर्माण होईल तेव्हा राज्य शासन सक्षमतेने याबाबतीत पावले टाकू शकेल. भविष्यात अशाप्रकारच्या घटना घडणार नाहीत, यासाठी राज्य शासन तत्परतेने काम करेल.

डॉ.नीलम गोऱ्हे : एखादी घटना उघडकीस येईपर्यन्त काही कारवाई केली जात नाही. आता हातभट्ट्यांचे उच्चाटन झाले, असे मंत्रीमहोदय, सदनामध्ये सांगत असले तरी, सदनाच्या बाहेर गेल्यानंतर मंत्री महोदय तसे म्हणणार नाहीत, अशी परिस्थिती आहे. पार्थसारथी समितीचा अहवाल आल्याचे सांगण्यात आले. त्यांनी केलेल्या शिफारशींची अंमलबजावणी कशी होणार आहे ? कारण एफडीअे कडे मिथॉनॉलच्या संबंधात नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी आहे, एफडीअे यामध्ये काय दखल घेणार आहे ? अर्धा तासाच्या निमित्ताने आम्ही विषय मांडतो, तेव्हा सभापती महोदय,आम्हाला आपल्याकडून संरक्षण पाहिजे. दुसऱ्या डिपार्टमेंटकडे बोट दाखविले जाते. याबाबतीत काहीच निर्बंध आणले नसतील तर या शिफारशींची काहीच अंमलबजावणी होणार नाही. पार्थसारथी समितीने ज्या शिफारशी केल्या, त्याबाबत मुंबई पोलीस आयुक्तालयामध्ये चर्चा झालेली आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे या शिफारशींचे संपूर्ण मॉनिटरींग होणार नाही, कारण त्या प्रमाणात पोलीस फोर्स नाही. हातभट्टयाच्या दारुमध्ये मिथेनॉलवर नियंत्रण आणण्याचे काम दुसऱ्या विभागाचे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ KGS/

डॉ.नीलम गोऱ्हे (पुढे सुरु....

आहे. या संबंधात कोणीच जबाबदारी घेणार नसेल, तर हा हैदोस चालू रहाणार आहे. आपल्या विभागाच्या संबंधित ज्या काही शिफारशी आहेत, त्याबाबत आपण प्रॉम्प्ट आहात, याबद्दल काही म्हणणे नाही. एखादी गोष्ट चालू आहे, म्हणून ती तशीच चालू ठेवली पाहिजे असे नाही. परंतु लोकांवर पराकोटीचे निर्बंध आणले तर प्रतिक्रिया वेगळी होते. मिथेनॉलवर नियंत्रण ठेवणारा विभाग असेल तर या संदर्भात माहिती घेऊन उत्तर द्यावयास पाहिजे.

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, राज्य उत्पादन शुल्क विभागाशी संबंधित असलेल्या एकूण आठ शिफारशी आहेत. त्याची माहिती पाहिजे असेल तर वाचून दाखवितो. त्यामध्ये "रेक्टीफाईट स्पिरीट, ऑर्डिनरी स्पिरीट किंवा डिनॅचर्ड स्पिरीट, मिथेनॉल, क्लोरलहायडट्रेट हे द्रव्य पदार्थ बेकायदेशीरपणे जवळ बाळगण्यासंदर्भातील गुन्हे दखल पात्र करण्यात यावेत व त्यात वाढीव शिक्षेची तरतूद करण्यात यावी."....

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गणेश नाईक ....

दुसरी शिफारस अशी आहे की, मिथेनॉलची साठवणूक हे इतर बिगर विषारी द्रव्य पदार्थापासून स्वतंत्रपणे ठेवण्यासाठी नियमावली तयार करण्यात यावी. यासंदर्भात या विभागाने क्र.डीएनएस.1197/54374/11, दिनांक 31.1.1998 नुसार परिपत्रक काढून कोणत्याही परिस्थितीत "मिथेनॉल" व पेय मद्य किंवा औद्योगित मद्यास एका ठिकाणी वापरण्यात येऊ नये म्हणून औद्योगित मद्याकांचा वापर करणाऱ्या घटकांनी त्याच जागी "मिथेनॉलची" साठवणूक करु नये/वापर करु नये अशा स्पष्ट सूचना दिल्या असून सदर सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी सुरु आहे. सभापती महोदय अशा प्रकारच्या 8 शिफारशी आहेत तसेच इतर 9 शिफारशी आहेत त्या मी पटलावर ठेवतो.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MHM/

**पृ. शी.** : मुंबईतील वाहतुकीची समस्या.

**मु. शी.** : मुबईतील वाहतुकीची समस्या यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण, वि. प. स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. मधुकर चव्हाण ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"मुंबईतील वाहतुकीची समस्या दिवसेंदिवस उग्र स्वरूप धारण करत आहे, वाहतूक पोलिसांचे संख्याबळ वाहतुकीला समतोल नसून अपुऱ्या पोलिसांच्या संख्येमुळे शहरात अनेक ठिकाणी वाहतूक कोंडीला तोंड द्यावे लागत आहे. रोज सुमारे 50-60 नवीन वाहनांची परिवहन विभागात नोंदणी होत असणे, त्यामुळे रोज नवीन वाहनांची भर पडत असून रस्त्यावरील वाहने वाढतच आहेत. परंतु रस्त्याचे रुंदीकरण शक्य नसल्याने दक्षिण मुंबईमध्ये वाहतुकीची कोंडी ही रोजचीच बाब आहे. यावर शासनाने उपाय शोधून काढणे गरजेचे आहे. त्यातच मुंबईतील टॅक्सी व ऑटोरीक्षा चालकांच्या बेजबाबदारपणे वाहन चालविण्याने व कुठेही गिऱ्हाईक शोधण्यासाठी वाहने उभी करण्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होणे, काही वेळेला टॅक्सी बेस्टच्या थांब्यांवर उभी केल्याने बेस्टच्या बसेस बस थांबा सोडून उभ्या रहातात. त्यामुळे मागून येणाऱ्या वाहनास अडथळा निर्माण होतो. वाहतूक पोलिसांनी वाहतूक सुरळीत चालण्यासाठी विशेष दक्षता घेणे जरुरीचे असणे, उदा. कोणत्याही वाहनास वाहतूक पुलावर थांबण्यास मज्जाव करणे, सर्व टॅक्सी व ऑटोरीक्षांना त्यांना नेमून दिलेल्या वाहनतळावरच उभे रहाण्यास भाग पाडणे, टॅक्सी व ऑटोरीक्षांना योग्य असलेल्या ठिकाणी नवीन वाहनतळ बनविण्याच्या जागांची वरिष्ठांना माहिती देणे, जेणेकरुन प्रत्येक नाक्यावर टॅक्सी व ऑटोरीक्षा उभ्या करण्यासाठी वेगळा वाहनतळ असेल व त्याचा इतर रहदारीस अडथळा होणार नाही. बहुसंख्य वाहने लाल दिवा झाल्यावरही झेब्रा क्रॉसिंगवर उभी रहाणे, ज्यामुळे रस्ता ओलांडणाऱ्यांना अडथळा निर्माण होणे, झेब्रा क्रॉसिंगवर वाहने थांबविण्याचे नियम कडक करण्याची आवश्यकता, प्रत्येक सिग्नलवर एका वाहतूक पोलिसाची नेमणूक करणे, तसेच वाहतूक पोलिसांना देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणामध्येही सुधारणा करणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना."

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MHM/

श्री. मधुकर चव्हाण ........

सभापती महोदय, मुंबईतील अतिशय ज्वलंत प्रश्न मी या अर्धा-तास चर्चेच्या माध्यमातून आपल्यासमोर मांडू इच्छितो. माननीय गृह राज्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. मी एका गोष्टीबद्दल त्यांना धन्यवाद देतो. मुंबईतील दादर परिसरामध्ये जी वाहतूक कोंडी होत होती त्याबाबतीत त्यांनी अतिशय कठोरपणे कारवाई केली आणि जो प्रश्न गेली 20 वर्षे सुटला नाही तो प्रश्न आपण सोडवला त्याबद्दल आपल्याला धन्यवाद देतो. शासनाचे काही चुकले तर आपण दोष देतो त्याचप्रमाणे शासनाकडून जी चांगली गोष्ट होते त्याबाबत शासनाचे अभिनंदन करणे हे माझे नैतिक कर्तव्य आहे. त्या ठिकाणी लोकांना दिलासा मिळाला. सभापती महोदय, या मुंबईमध्ये काही ज्वलंत प्रश्न निर्माण झालेले आहेत. माझी आग्रहाची विनंती आहे. या समस्यांनी मुंबईकर सर्वसामान्य जनतेला वेठीस धरलेले आहे. त्यामध्ये सगळा दोष पोलिसांचा आहे असा माझा दावा नाही. मुंबई हे बेट आहे. मुंबईची लोकसंख्या भरमसाठ वाढलेली आहे परंतु त्याचबरोबर जर काही कठोर कारवाई केली, नियमांचे तंतोतंत, काळजीपूर्वक आणि कठोरपणे पालन केले तर मुंबईच्या जनतेला या अडचणींमध्येही दिलासा मिळू शकतो. उदाहरण द्यावयाचे झाले तर, मुंबई पोलिसांनी आपले कर्तृत्व दाखविले असेल तर त्यामध्ये मुंबईमधील काही सणासुदीच्या दिवसांचा उल्लेख करावा लागेल. पोलिसांनी जर मनात आणले, अधिकाऱ्यांनी जर मनात आणले, शासनाने जर मनात आणले तर कोणतीही गोष्ट घडू शकते. त्याचे एक उदाहरण म्हणजे अनंत चतुर्दशीच्या दिवशी मुंबईतील तीनही चौपाट्यांवर माझ्या अंदाजाप्रमाणे सुमारे 20 ते 25 लाख लोक गणेश विसर्जनासाठी जमत असतात. त्या दिवशी एक साधा अपघातही मुंबईमध्ये होत नाही. कोठे तरी एखादी किरकोळ गोष्ट झाली असेल पण चेंगराचेगरी झाली आहे, वाहतुकीमध्ये अपघात झाला आहे, असे होत नाही. जे पोलीस मुंबई शहरात एकाचवेळी, एकाच दिवशी वाहतुकीचे इतक्या कौशल्याने आणि चांगल्या प्रकारे नियंत्रण करु शकतात तर तेच पोलीस किंवा तीच वाहतूक यंत्रणा अन्य वेळी तसे का करु शकत नाही ? हा या ठिकाणी माझ्या दृष्टीने महत्वाचा प्रश्न आहे. मुंबईच्या जनतेला कशा अडचणी सहन कराव्या लागतात हे मी सांगू इच्छितो. मुंबईतील वाहतुकीची समस्या दिवसेंदिवस अतिशय उग्र स्वरुप धारण करीत आहे. वाहतुक पोलिसांचे संख्याबळ वाहतुकीला समतोल नाही. ते संख्याबळ अपुरे आहे हे मान्य आहे. परंतु अनेक ठिकाणी

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MHM/

श्री. मधुकर चव्हाण ......

काही लोक मुंबई शहरामध्ये लोकांना वेठीस धरतात त्याबाबतीत वाहतूक पोलिसांनी कठोरपणे कायद्याचे पालन केले पाहिजे. या मुंबईमध्ये सर्वसामान्य माणूस सर्वात जास्त भरडला जातो. मुंबईमध्ये फूटपाथ शिल्लक नाहीत. मुंबईतील रस्ते आपण रुंद करु शकत नाही. मुंबईतील रेल्वे वाहतुकीच्या समस्येचा सामान्य माणसांना त्रास होतो. मुंबईत ज्या टॅक्सीज आणि ऑटोरिक्शा आहेत त्यांना वाहन तळ नेमून देणे आवश्यक आहे. टॅक्सी कोठेही उभ्या राहतात. मुंबई शहरामध्ये काही विशिष्ट लोक टॅक्सी वाहतुकीमध्ये काम करतात. ते लोक मुंबईच्या वाहतुकीचे नियम पाळत नाहीत. मी दादरचे उदाहरण देतो. एका टॅक्सीवाल्याने वाहतुकीचा नियमभंग केल्यामुळे एका वाहतूक पोलिसाने त्या टॅक्सी ड्रायव्हरला अडवले. मी बाजूला उभा होतो. त्या पोलिसाने त्याच्याकडे परवाना मागितला तेव्हा तो टॅक्सी ड्रायव्हर म्हणाला की, "जाओ, नही देता. क्या करोगे ? फाईन करोगे ? जान तो नहीं लोगे ? इतका उर्मटपणा मुंबईमध्ये या मंडळींमध्ये आलेला आहे. अशा वेळी जर आपण नियमांची कठोरपणे अंमलबजावणी केली नाही तर मुंबईमध्ये केऑस झाल्याशिवाय राहणार नाही. रोज मुंबईमध्ये 50 ते 60 वाहनांची भर पडते. ज्या वाहनांचे वय 20-25 वर्षे झाले असेल ती वाहने कठोरपणे स्क्रॅब करावीत. त्यामध्ये युनियनवाल्यांची चिंता करु नका. मुंबईमध्ये पावसाळ्यात लोकांना वेठीस धरणाऱ्या जशा युनियन्स आहेत तशाच युनियन त्या ठिकाणी आहेत आणि ते आपल्या सदस्यांकडून वर्गणी घेतात. मी याबाबतीत अतिशय स्पष्टपणे मांडतो. त्या ठिकाणी टॅक्सीमेन युनियन असेल, ऑटोरिक्शा युनियन असेल किंवा अन्य युनियन असेल त्यामध्ये मी एकाही युनियनला असे काम करताना पाहिले नाही की, जे आपले सदस्य आहेत, अनुयायी आहेत त्यांच्या अधिकारासाठी आम्ही पुढारी म्हणून, नेते म्हणून भांडत आहोत. हे तुमचे कर्तव्य आहे. त्या टॅक्सीमेन युनियनने आपल्या लोकांचा मेळावा घेऊन त्यांना सांगितले पाहिजे की, बसस्टॉपवर वाहन उभे करु नये. बसस्टॉपच्या ठिकाणी तीन चार मीटर अंतरावर टॅक्सी उभी करु नये असा नियम आहे. आज मुंबईमध्ये सगळ्या बसस्टॉपवर टॅक्सी आणि रिक्शा उभ्या असतात.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MHM/ पूर्वी श्री. बरवड 10:40

(श्री. मधुकर चव्हाण...)

त्यामुळे स्वाभाविकच बस ही मोठे वाहन असल्यामुळे ती बस स्टॉपपासून दूर रस्त्याच्यामध्ये उभी करावी लागते आणि त्यामुळे वाहतुकीची कोंडी होते. अशा वेळी तुम्ही कठोर कारवाई करा. या मुंबई शहराध्ये कायद्याचे, वाहतुकीच्या नियमांचे काटेकोरपणे पालन केलेच जात नाही. थोडी चिरिमिरी दिली, पैसे दिले की, कायदे पायदळी तुडविता येतात अशी वाहन चालविणा-यांची मानसिकता झालेली आहे. हल्ली एक नवीन व्यवस्था सुरु झालेली आहे. त्याबाबतीत मी पोलिसांना दोष देऊ इच्छित नाही किंवा ते भ्रष्टाचार करतात असा टाहोही फोडत नाही. परंतु दादर (पूर्व), दादर(पश्चिम), बोरीबंदर, भायखळा, घाटकोपर अशा ठिकाणी ट्रान्सफर करण्यासाठी पैसे घेतले जातात. त्याठिकाणी रस्त्यावर चार-चार रांगा लावून टॅक्सी उभ्या केलेल्या असतात. काही ठिकाणी तर विशिष्ट टॅक्सी चालकांची दादागिरी असते. त्याठिकाणी ते दुस-या कोणाला येऊ देत नाहीत. जेथे टॅक्सीची रांग असते तेथून प्रवाशाने टॅक्सी घेणे आवश्यक असते. परंतु 5 टक्के सुध्दा प्रवासी या रांगेतील टॅक्सीमध्ये जात नाहीत. हे टॅक्सीवाले पोलिसांसमोर प्रवाशाला त्याची बॅग खेचत घेऊन येतात. असे प्रकार दादर, मुंबई सेंट्रल आणि अन्य ठिकाणी सर्रास होत असतात. पोलीस त्याबाबतीत कोणतीही कारवाई करीत नाहीत. ते केवळ बघ्याची भूमिका घेतात. मुंबईतील करीरोड, चिंचपोकळी, भायखळा, लोअर परेल या वाहतूक पुलावर रोज सकाळ -संध्याकाळ टॅक्सी उभ्या केल्या जातात आणि त्यामुळे वाहतुकीची प्रचंड कोंडी होते. अशा वेळी एकही पोलीस त्या ठिकाणी नसतो. प्रवासी, पादचारी आणि वाहन चालकांची नेहमीच भांडणे होत असतात. माननीय मंत्री महोदयांनी दादर येथे गुपचूप येऊन पाहणी केल्यानंतर त्यांना वस्तुस्थिती पटली. मी माननीय मंत्री महोदयांना आणि पोलिसांनाही धन्यवाद देतो की, त्याठिकाणी आता अतिशय सुरळीत वाहतूक सुरु झालेली आहे. वाहतूक पोलिसांची अशी एक कार्यपध्दती सुरु झालेली आहे की, जेथे सिग्नल असतात त्याठिकाणी ते थांबत नाहीत. ते सिग्नल पासून लांब कुठे तरी दिसणार नाही, अशा ठिकाणी थांबतात. मग कोणी् तरी वाहन चालक चुकला की हे लांबून व्हिसल मारतात. त्या वाहन चालकाकडे लायसन्स मागतात. मग तो वाहन चालक त्या लायसन्समध्ये 50-100 रु.ची नोट ठेवून ते लायसन्स पोलिसाकडे देतो. लोकांना वाटते की, पोलीस लायसन्स घेऊन चुकणा-या वाहन चालकावर कारवाई करतात. परंतु वस्तुस्थिती तशी नसते. तर, अशा त-हेने मुंबई शहरामध्ये

..2..

(श्री. मधुकर चव्हाण ...)

भ्रष्टाचार सुरु झालेला आहे. सामान्य माणसाला वेठीस धरुन हा भ्रष्टाचार होत आहे. सभापती महोदय, मला हे सांगावयाचे आहे की, या मुंबई शहरामध्ये पैसे दिले की नियमांचे पालन केले नाही तरी चालते असा काही लोकांचा दृढ समज झालेला आहे.याठिकाणी मी परदेशातील उदाहरण देतो. खरे म्हणजे परदेशातील उदाहरणे देण्यामध्ये मला स्वारस्य नसते. आपल्या देशात सुध्दा चांगल्या गोष्टी होऊ शकतात असे मी मानणारा आहे. परदेशामध्ये रात्री 12.00वाजता सुध्दा जेथे सिग्नल असतो त्याठिकाणी वाहतुकीचे नियम अत्यंत काटेकोरपणे पाळले जातात. त्याठिकाणी कोणताही वाहन चालक असे म्हणत नाही की, मला वाहतूक पोलीस पकडणार नाही, मला कोणी पाहणार नाही. त्याठिकाणी सिव्हिक सेन्स आहे. तो सिव्हिक सेन्स आमच्याकडे येणार नाही. हा सिव्हिक सेन्स कायद्याचे कठोर पालन केल्यावर येईल. सभापती महोदय, या मुंबई शहरामध्ये रात्रीचे जास्त अपघात होतात. रात्रौ 9.00 नंतर मुंबई शहरामध्ये बेदरकारपणे वाहने चालविली जातात. या मुंबई शहरातील सर्वसामान्य मध्यमवर्गीय माणसे सकाळी 4.00 वाजल्या पासून कामाला सुरुवात करतात. सकाळी दुधासाठी जाणारे लोक असतात, पेपर टाकणारी मुले असतात, डोक्यावर टोपली घेऊन भाजी आणणारी माणसे असतात. मग अशा माणसांचे रस्ता ओलांडताना अपघात होतात. वाहतुकीचे नियम या मुंबई शहरामध्ये कोणी पाळत नाही. विशेषत: काही बस चालक तर कोणतेही नियम पाळत नाहीत. त्यांना असे वाटते की, मी बस चालक असल्यामुळे आणि आमची शरदरावांची युनियन असल्यामुळे कोणी काहीही करु शकणार नाही. मला निलंबित केले तर आमची युनियन रस्त्यावर येईल आणि प्रशासन घाबरुन माझे निलंबन मागे घेईल.

सभापती महोदय, या वाहतूक पोलिसांनी सिग्नल जवळ उभे राहिले पाहिजे. त्यांनी सिग्नल पासून लांब उभे राहाता कामा नये. योग्य ठिकाणी वाहतूक पोलीस उभे राहिले तर त्यांची वाहन चालकाला दशहत बसेल. वाहन चालकाला वाटेल की, मी वाहतुकीचे नियम मोडले तर वाहतूक पोलीस मला दंड करील.

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ..

मला असे वाटते की मुंबईमध्ये जे सिग्नल बसविले आहेत त्याचे काटेकोरपणाने पालन झाले पाहिजे. या छोटया छोटया गोष्टी आहेत पण सामान्य माणसाच्या दैनंदिन जीवनाशी निगडीत असलेल्या गोष्टी आम्ही येथे मांडल्या नाहीतर आम्ही मुंबईकरांवर अन्याय केल्यासारखे होईल. झेब्रा क्रॉसिंग आहे त्याठिकाणी गाडया उभ्या राहतात. अशा गाडीधारकांवर कठोर कारवाई झाली पाहिजे. दंडाची रक्कम वाढविली पाहिजे. वाहनांवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. असलेल्या नियमांच्या चौकटीत मुंबई शहरातील वाहतूक नीट कशी होईल याचे कठोरपणाने पालन झाले पाहिजे तरच मुंबईच्या जनतेला दिलासा मिळेल. राजा शिवाजी विद्यालयाजवळ 5-6 वर्षापूर्वी झालेल्या अपघातात 5-6 मुले चिरडून मरण पावली होती. पोलिसांना नियमांची काटेकोरपणाने अंमलबजावणी करण्यासाठी एखादा अपघात व्हावा असे वाटते काय ? माणसे मृत्यूमुखी पडली पाहिजेत असे वाटते काय ? रक्त सांडल्यावरच नियमांची कठोरपणाने अंमलबजावणी होणार आहे काय ?

सभापती महोदय, दुसरी एक गोष्ट म्हणजे टॅक्सी स्टॅन्ड बाबत मला सांगितली पाहिजे. टॅक्सी स्टॅन्ड करुन दिले पाहिजेत. जेथे जेथे आवश्यक आहे तेथे टॅक्सी स्टॅन्ड उभे केले पाहिजेत. टॅक्सी चालक भर रस्त्यात टॅक्सी उभ्या करतात. अतिशय कमी वेगाने 10-15 कि.मी.च्या वेगाने टॅक्सी हळूहळू चालवत पॅसेंजर बघत असतात. टॅक्सी हळूहळू चालविल्यामुळे पाठीमागे असलेले ट्रॅफीक जॅम होते. पोलीस काय करतात ? एखाद्या पॅसेंजरला मध्येच उतरायचे असेल तर टॅक्सी बाजूला नेऊन उभी करावी असे टॅक्सी चालकाला वाटत नाही. मध्येच उभी करतात. या टॅक्सीवाल्यांनी मुंबई शहराचे बनारस,पाटणा करुन टाकले आहे. मुंबई शहराला टॅक्सीवाल्यांना एक बेशिस्त शहर करुन टाकले आहे. टॅक्सी चालक रात्रीच्या वेळी जवळचे भाडे घेत नाहीत. "हम नजदीक नही जाएंगे लम्बा भाडा लेना है." एका प्रवाशाने पोलिसांकडे तक्रार केली तो पोलीस सुध्दा प्रामाणिक निघाला आणि त्याने त्या टॅक्सी चालकास वेगळया प्रकारचा दंड केला. मिनिमम भाडे मिळत असेल तर टॅक्सी चालक येत नाहीत. मध्यरात्री मुंबईतील अनेक महिला परिचारिका, कॉल सेंटर्स मधील मुली,टेलिफोन ऑपरेटर्स ऑफीसमधून सुटतात. रात्रीची वेळ असल्यामुळे त्यांना सुरक्षिततेची काळजी असते. अशा वेळी टॅक्सी चालक जवळचे भाडे घेण्यास नाकारतात. यादृष्टीने

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....2

श्री. मधुकर चव्हाण ....

उपाययोजना होणे आवश्यक आहे. वडाळा येथे ट्रक टर्मिनस आहे. खाजगी बसेस बंद केलेल्या आहेत त्याठिकाणी वाहनतळ दिला पाहिजे. खाजगी बसेस एस.टी.स्टॅन्डजवळ उभ्या राहतात. एस.टी.बस 200 रुपयामध्ये पुणे,नाशिक येथे नेणार असेल तर खाजगी बसेस दलालांमार्फत 100 रु किंवा 150 रुपयांमध्ये पुणे आणि नाशिकला घेऊन जातात.दलाल लोक 100 रुपया में पूना,150 रुपया में नाशिक असे ओरडत असतात. खाजगी बसेससाठी ट्रक टर्मिनसप्रमाणे वाहनतळ दिला तर बसेसना शिस्त लागेल. लोकांनाही शिस्त लागेल. मुंबईतील वाहतूक सुधारणेसाठी 2/3 गोष्टी करणे अत्यंत आवश्यक आहे. एक तर सगळया वाहतुकीच्या नियमांचे काटेकोरपणाने पालन झाले पाहिजे. दुसरी गोष्ट कमी गर्दीची जी स्टेशन्स आहे तेथे वाहतुकीचे पालन केले पाहिजे. टॅक्सी चालकांना बस थांब्यापासून काही मिटर अंतरावर टॅक्सी उभी करणे सक्तीचे केले पाहिजे. वाहतूक पोलिसांनी यादृष्टीने अतिशय कठोर पावले उचलली पाहिजेत. सिग्नल तोडून आमच्यासारखा एखादा व्हीआयपी जरी मिळाला तरी शिट्टी वाजल्यावर तो थांबला पाहिजे. कारण ट्रॅफीक पोलीस हे शासनाचे प्रतिनिधीत्व करीत असतात. वाहतूक पोलिसांना कोणी मानत नाही. 10,20,50 रु. दिले तर हम छूट जाएंगे अशी वाहन चालकांची भावना असते. मुंबई शहराला जर कोणी वेठीस धरत असेल तर ते टॅक्सी चालक आणि रिक्शा चालक आहेत. म्हणून या विषयावर मी अर्धा-तास चर्चा उपस्थित केली आहे. या चर्चेतून काही दिलासा देणारे उत्तर मिळेल अशी अपेक्षा व्यक्त करुन माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

----

यानंतर श्री. भारवि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभपती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी मुंबईतील एका गंभीर प्रश्नावर चर्चा उपस्थित केली आहे. मला माहिती आहे की, मुंबईतील वाहतूक समस्येबद्दल ते नेहमी प्रश्न उपस्थित करीत असतात. वाहतूक व्यवस्था कशी सुरळीत होईल याकडे ते सातत्याने लक्ष देत असतात. मुंबई शहरातील वाढती लोकसंख्या, अन्य राज्यातून येणारे लोंढे, एकूण वाहनांची संख्या इत्यादींचा विचार केला तर आता मुंबईतील वाहतुकीच्या कोंडीचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. मुंबईत शहरात वाहतुकीची समस्या दिवसेंदिवस कशी उद्भवत गेली हे सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण साहेबांनी सांगितले आहे. त्या निमित्ताने मी एवढेच सांगू इच्छितो की, मुंबई शहरामध्ये सन 1951 मध्ये वाहनांची संख्या 37000 होती. आज सन 2006 रोजी मुंबई शहरात वाहनांची संख्या 12 लाख 94 हजार म्हणजे जवळ जवळ 3200 टक्क्यांनी वाढली आहे. सन 1951 साली मुंबईतील लोकसंख्या 29 लाख 90 हजार एवढी होती. ती आज 1 कोटी 20 लाखावर पोहोचली आहे. म्हणजे 401 टक्क्यांनी मुंबईच्या लोकसंख्येमध्ये वाढ झाली आहे. येथे सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी मुंबई शहरातील रस्त्यांसंबंधीचा देखील उल्लेख केला आहे. त्यांनी सांगितले की, मुंबईतील रस्ते रुंद करता येणार नाही, हे खरे आहे. सन 1991 रोजी मुंबईत 837 कि.मी.लांबीचे रस्ते होते. सन 2004 पर्यंत मुंबईत 1900 कि.मी.लांबीचे रस्ते बनविण्यात आले. म्हणजेच 227 टक्के रस्ते आपण तयार करू शकलो. मुंबई शहराची भौगोलिक रचना अशी आहे की, या शहराच्या तिन्ही बाजूला समुद्र आहे. त्यामुळेच रस्त्यांचे जाळे वाढविण्यासाठी अडचणी येतात. मुंबई शहरात लहान, मोठी व अवजड वाहनांद्वारे वाहतूक होते. त्यामुळे मुंबई वाहतूक ही संमिश्र आहे. आज काही ठिकाणी मुंबई महापालिकेच्या मदतीने रस्ता रुंदी करणाचे काम हाती घेण्यात आले आहे. त्याचा परिणाम वाहतूक व्यवस्थेवर देखील होतो. मुंबई शहरातील वाहतूक व्यवस्थेची समस्या सोडविण्यासाठी राज्य शासनातर्फे परिवहन विभाग, गृह विभाग सातत्याने प्रयत्न करीत असतो. तसेच, MMRDA तर्फे वाहतूक विभागाच्या समस्येवर उपाययोजना करण्यासाठी पायाभूत सुविधा निर्माण करण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. मुंबई शहरामध्ये वाहतुकीची जास्त कोंडी होऊ नये म्हणून घाऊक बाजारपेठ तसेच कृषि उत्पन्न बाजार समिती नवी मुंबई येथे स्थलांतरित करण्यात आली आहे. या बरोबरच जड वाहनांसाठी वडाळा येथे ट्रक टर्मिनल ...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

24-03-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) K 2

BGO/ KGS/ MHM/ कानडे.. 10:50

श्री.सिध्दाराम म्हेत्रे...

उभारण्यात आले आहे. आज वाहतूक शाखेकडून वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांवर कारवाई करण्यात येते. तसेच फेरीवाले व अवैध पार्किंगमुळे निर्माण होणाऱ्या वाहतुकीच्या कोंडीमुळे वाहतूक शाखेतर्फे विविध प्रयत्न करण्यात येतात. मुंबई शहरातील वाहतूक सेवा सुरळीत चालावी म्हणून 'नो पार्किंग', 'नो एंट्री', 'वन-वे', 'नो राईट टर्न/यु टर्न' इत्यादी निर्बंध अधिसूचनेद्वारे घालण्यात आलेले आहेत. पोलीस विभागाच्या आधुनिकीकरणांतर्गत वाहतूक शाखेला 100अल्कोहोल डिटेक्टर, 29स्पीड चेक गन, 04पोर्टेबल सिग्लल, 1764 रिफ्लेक्टीव्ह जॅकेटस, 100 बॅरीकेडस्, 56 फ्लड लाईटस, 485 पॅराबोलिक क्रॅश बॅरिअर्स इत्यादी उपकरणे/साधने पुरविण्यात आली आहेत. तसेच 150 मोटार सायकल्स, 1 हिप्पो क्रेन, 300 सोलर ट्रॅफिक सिग्नल, 92 इलेक्ट्रॉनिक मेसेजिंग बोर्डे, 15 लेझर स्पीड चेक गन इत्यादींची खरेदी वाहतूक पोलिसांकरिता आगामी काळासाठी घेण्याचे प्रस्तावित आहे. तसेच शहरातील 50 महत्त्वाच्या जंक्शनवर वाहतूक टिपडया उभारण्यात आल्या आहेत. या बरोबरच 12 वर्षे व त्यापेक्षा जास्त सेवा पूर्ण झालेल्या 551 वाहतूक शिपायांना परवाने जप्त करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ KGS/ D/ MHM/ MAP/ पूर्वी श्री.भारवि.... 10:55

श्री.सिध्दाराम म्हेत्रे....

महत्वाच्या रस्त्यांवर जड वाहनांना बंदी घालण्यात आली आहे. वाहतुकीच्या नियमांबाबत लोकांना माहिती देण्यात येत आहे. मुंबईतील 12 शाळांतील 64,790 विद्यार्थ्यांना विनामूल्य वाहतूक नियमांचे प्रशिक्षण रस्ता सुरक्षा सप्ताह योजनेद्वारे देण्यात आले आहे. रिक्षा चालक, टेम्पो चालक, टॅक्सी चालकांकरिता वाहतूक नियमांची माहिती देण्यासाठी प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात आले होते. शासनातर्फे दरवर्षी वार्षिक सुरक्षा सप्ताह साजरा केला जातो. शहरातील 428 जंक्शन्सवर स्वयंचलित सिग्नल्स बसविण्यात आले आहेत. शिवाय अजूनही 150 जंक्शन्स यासाठी प्रस्तावित आहेत. शहरातील पादचाऱ्यांकरिता 66 ठिकाणी स्वयंचलीत सिग्नल यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे. शहरातील 108 महत्वाच्या जंक्शन्सवर सीसीटी यंत्रणा बसविण्यात येणार आहे. बॅलन्स टाईम इंडिकेटर सिग्नल बसविण्यात आले आहेत. रस्त्यावरील जे झेब्रा कॉसिंगच्या ठिकाणी सौर ऊर्जेवर चालणारे प्लॅशर सिग्नल बसविण्याचे काम सुरु आहे. वाहतूक पोलिसांनी चांगल्या केलेल्या कामांना एफ.एम.रेडिओ व इतर प्रसिध्दी माध्यमातून प्रसिध्दी देण्यात येत आहे. वाहतूक शाखेचे मनुष्यबळ वाढविण्यात येत आहे. तसेच वाहतूक शाखेची वेबसाईट तयार करण्यात आली आहे, ही कार्यवाही ट्राफिक विभागाकडून झाली आहे.

आरटीओ मार्फत असलेला जो परिवहन विभाग आहे त्यांच्या माध्यमामतून शहरातील वाढती वाहन संख्या मर्यादित राहावी म्हणून दिनांक 26/11/97 पासून ॲटो रिक्षा आणि टॅक्सी परवान्यावर बंदी घालण्यात आली आहे. सध्या मुंबईमध्ये टॅक्सीचे परवाने 54 हजार व रिक्षा परवाने 1 लाख आहेत. मुंबई शहरातील वाहन संख्या 2006 पर्यंत 12 लाख 94 हजार आहे. शहरामध्ये दोषी वाहनधारकांविरुध्द कायद्यातील तरतुदीनुसार 2004-05 या वर्षात 1,44,403 लोकांवर खटले दाखल करुन कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. 2005-06 या वर्षात 1, 39,709 वाहनधारकांवर या कायद्यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात आली आहे. मुंबई शहरातील वाहतूक समस्येला आळा घालण्यासाठी विशेष मोहिमा आखण्यात आल्या आहे.

मुंबई महापालिकेतर्फे केंद्र शासनाने मुंबई नागरी वाहतूक प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी इंटरनॅशनल डेव्हलपमेंट असोसिएशन आणि इंटरनॅशनल बँक फार रिकंन्स्ट्रक्शन अँड डेव्हलपमेंट यांच्या बरोबर पत पुरवठयासाठी करार केलेला आहे. मुंबईतील वाहतूक सुरळीत व्हावी म्हणून

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ KGS/ D/ MHM/ MAP/ पूर्वी श्री.भारवि.... 10:55

श्री.सिध्दाराम म्हेत्रे....

महापालिकेने विविध कार्यक्रम हाती घेतलेले आहेत. पादचाऱ्यांना रस्ता ओलांडण्यासाठी भुयारी मार्गाची निर्मिती केली आहे. उदा.मेट्रो सिनेमा, सिध्दिविनायक जंक्शन, शिवाजी पार्क, माहिम चर्च या ठिकाणी काम सुरु आहे. रेल्वे मार्गावर पदवर पूल बांधण्याचे प्रस्तावित केले आहे. उदा.जोगेश्वरी(दक्षिण), जोगेश्वरी (उत्तर), विक्रोळी अशा ठिकाणी पदवर पूल करण्याचे ठरविले आहे. तसेच रेल्वे स्थानकांवर प्रवाशी वाहतुकीचे वेगाने निराकरण करण्यासाठी सुरक्षित व सुलभ आगमन व निर्गमन करण्यासाठी वाहतूक विकास योजनेंतर्गत रेल्वे स्थानकापासून 500 मीटर अंतरापर्यंतची जागा सुधारण्यासाठी घेतली आहे. यामध्ये दादर, बोरीवली, घाटकोपर व चेंबूर या रेल्वे स्थानकांचा समावेश आहे. त्याचप्रमाणे क्षेत्रीय वाहतूक नियंत्रण प्रकल्पांतर्गत शहर व उपनगरातील 250 संगमस्थानाच्या ठिकाणी केंद्रीय नियंत्रण व्यवस्था व प्रत्यक्ष वेळेतील प्रतिक्रिया साधणारी यंत्रणा बसविणे अपेक्षित आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे मुंबई नागरी परिवहन प्रकल्प, मुंबई नागरी पायाभूत प्रकल्प, मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्प राबविला जात आहे. सर्वांगिण विकास करण्याच्या दृष्टीने हे प्रकल्प राबविण्यात येत आहेत.

ज्यावेळी वाहतुकीसंदर्भातील प्रकरण दादर येथे घडले त्यामुळे मी एमएमआरडीए, परिवहन विभाग, ट्राफीक विभाग, महापालिका आणि गृह विभाग आणि शासनाच्या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन, जागेवर जाऊन त्या समस्या थोडयाफार प्रमाणात सोडविण्याचा प्रयत्न केला. कालच मी महापालिका, परिवहन विभागाचे सहाय्यक आयुक्त, ट्राफिक विभाग, एमएमआरडीएच्या अधिकाऱ्यांना बोलावून बैठक घेतली. त्या बैठकीमध्ये असे ठरले आहे की, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांच्यासोबत बैठक घेऊन, वाहतुकीसंदर्भातील कोणकोणत्या समस्या आहेत त्यांची प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी करण्यात येईल. त्यानंतर त्यासंदर्भात काय कार्यवाही झाली याबाबत महिन्यातून वा दोन महिन्यातून आढावा घेतला जाईल.

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नंतर श्री.कांबळे....

श्री. सिध्दाराम म्हेत्रे ....

सभापती महोदय, ही बैठक एक महिन्यात झाली नाही तरी दोन महिन्यांत तरी या संदर्भातील बैठक कंपलसरी घेण्यात येईल. बैठकीमध्ये वाहतुकीच्या नियमांसंबंधी किंवा कारवाईसंबंधी निर्णय घेण्यात येऊन त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येणार आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आपण चांगला निर्णय घेतलेला आहे. परंतु आपण त्वरित निर्णय घेणे आवश्यक आहे अशा गोष्टी मी आपल्याला सांगतो. सभापती महोदय, बस स्टॉपवर टॅक्सी थांबणार नाही, हे आपण पाहिले पाहिजे कारण त्यामुळे वाहतुकीची कोंडी होते. त्याचप्रमाणे 20-25 वर्षे आयुष्यमान झालेल्या वाहनांवर आपण बंदी घालावी. तरी, माझा माननीय मंत्रीमहोदयांना प्रश्न आहे की, आपण या संदर्भात हायकोर्टाच्या आदेशाची कठोरपणे अंमलबजावणी करणार आहात का ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, या संदर्भात मी आपल्याला मघाशीच उत्तर दिले आहे. यासंबंधी संबंधित सन्माननीय सदस्यांची व संबंधित आर.टी.ओ. विभाग, परिवहन विभाग, पोलीस विभाग व ट्रॅफिक विभाग यांच्या अधिकाऱ्यांची एक बैठक घेण्यात येऊन त्यासंबंधी तातडीने आपल्याला काय करता येईल हे पाहिले जाईल.

----

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : विनाअनुदानित संस्थांमधून निवृत्त होणाऱ्या शिक्षकांच्या सेवानिवृत्तीसंबंधी.

**मु.शी.**: विनाअनुदानित संस्थांमधून निवृत्त होणाऱ्या शिक्षकांच्या सेवानिवृत्तीसंबंधी श्री. रामनाथ मोते, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. रामनाथ मोते ( कोकण विभाग शिक्षक ) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :--

" विना अनुदानित सेवा वेतननिश्चिती, वेतनवाढी व सेवा निवृत्ती वेतनासाठी ग्राह्य धरली जाते, मात्र त्या कालावधीचे पी. एफ. अंशदान भरण्याबाबत सक्ती करणे, दिनांक १४ फेब्रुवारी, १९७२ च्या शासन निर्णयानुसार व्यवस्थापनाचा हिस्सा सी. पी. एफ. मध्ये भरण्याचा आदेश फक्त कायम विना अनुदानित शाळांना लागू असणे, विना अनुदानित शाळांना हा निर्णय लागू नसूनही सेवा निवृत्त होतांना रक्कम व त्यावरील दंड व्याज भरण्याची सक्ती करणे, तसेच रक्कम न भरल्यास सदरची रक्कम उपदानातून कपात करणे, त्यामुळे विशेषत: रत्नागिरी जिल्ह्यातील व राज्यातील अनेक शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांवर अन्याय होणे याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना. "

सभापती महोदय, या अर्धा तासाच्या चर्चेच्या माध्यमातून, अनुदानित संस्थांमधून निवृत्त होणाऱ्या शिक्षकांच्या सेवानिवृत्तीवेतनाच्या संदर्भात आणि त्यांच्याकडून जबरदस्तीने वसूल केल्या जाणाऱ्या भविष्य निर्वाह निधीच्या खात्यामधील अंशदानाच्या संदर्भात मी प्रश्न उपस्थित करु इच्छितो. सभापती महोदय, या संदर्भात पर्टिक्युलरली रत्नागिरी जिल्ह्यांतील अनेक शिक्षकांवर अन्याय झालेला आहे. शासनाचेच निर्णय असताना त्या निर्णयांचे पालन केले जात नाही. शासनाने शासन निर्णयांमध्ये दिलेल्या डायरेक्टिव्हज्चे उल्लंघन करुन या शिक्षकांकडून अंशदायी निधी वसुल केला जात आहे आणि ती रक्कम भरल्याशिवाय निवृत्तीवेतन मंजूर केले जात नाही. अनेक शिक्षकांकडून फार मोठ्या प्रमाणात या रक्कमा वसूल केलेल्या आहेत. सभापती महोदय, काहींनी ते पैसे भरले नाहीत, त्यांच्या ग्रॅच्युईटीमधून 50-60 हजार रुपये वसुल केलेले आहेत. तरी, या संदर्भात मी दिनांक 30 मार्च, 2005 रोजी शिक्षण विभागाला पत्र दिले आहे. परंतु आता जवळजवळ एक वर्ष होत आहे, माझ्या पत्राला उत्तर मिळालेले नाही. या संदर्भात शासनाने

..3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ....

कोणती कार्यवाही केली याची देखील मला कल्पना नाही. सभापती महोदय, हा विषय अगदी सोपा आहे. शासनाच्या दिनाक 4 नोव्हेंबर, 1968 च्या आदेशानुसार, जे शिक्षक दिनांक 1 एप्रिल, 1966 रोजी सेवेत होते, त्यांना पेन्शन योजना लागू झालेली आहे. तसेच ही पेन्शन योजना लागू करताना जे शिक्षक त्यापूर्वी सेवेत होते, त्यांच्या कॉंट्रीब्युशनची रक्कम जमा करण्याचे शासनाचे आदेश आहेत. पण जे शिक्षक दिनांक 1 एप्रिल, 1966 किंवा त्यानंतर सेवेत येतील, त्यांना ही पेन्शन योजना आपोआप लागू होते. त्यामुळे या शिक्षकांकडून अंशदान घेण्याची कोणतीही तरतूद शासन निर्णयामध्ये नाही. तरी, या ठिकाणी मी दिनांक 2 सप्टेंबर, 1977 रोजीचा शासन निर्णय आपणास वाचून दाखवितो. त्यातील परिच्छेद 3 मध्ये असे म्हटले आहे की, " The teachers recruited on or after 1st April, 1966 will automatically be governed by the scheme. " याचा अर्थ असा आहे की, दिनांक 1 एप्रिल, 1966 किंवा त्यानंतर सेवेत आलेल्या सर्व शिक्षकांना शासनाची ही पेन्शन योजना लागू आहे. पूर्वी कॉंट्रीब्युटरी प्रॉव्हिडंट फंड होता. शिक्षकांच्या पगारातून काही रक्कम त्यांच्या पी.एफ. मध्ये जमा होत होती आणि तेवढाच शेअर मॅनेजमेंटकडूनही त्यांच्या खात्यावर जमा होत होता. परंतु ही पेन्शन योजना लागू झाल्यानंतर त्या शिक्षकांना कॉंट्रीब्युशन भरण्याची सक्ती करण्यात आली होती. या संदर्भात शासनाने शिक्षकांना कॉंट्रीब्युशन चालू करायचे की पेन्शन योजना ऑफ करावयाची असे ऑप्शन दिले होते. ज्यांनी पेन्शन योजना घेतलली आहे, त्यांनी जून, 1969 पर्यंतचे त्यांचे अंशदान शासकीय ट्रेझरीमध्ये भरायचे. परंतु या नंतर रक्कम भरण्याची कोणतीही तरतूद या संदर्भात शासन निर्णयामध्ये नाही. त्यानंतर दिनांक 2 सप्टेंबर, 1970 च्या जी.आर मध्ये चौथ्या परिच्छेदात असे म्हटले आहे की, " The management have not to contribute the Provident Fund from 1st July, 1969 in respect of teachers who opt. for pension scheme. ". सभापती महोदय, दिनांक 1 एप्रिल, 1966 नंतर लागलेल्या शिक्षकांना आपोआपच पेन्शन योजना लागू झालेली आहे. त्यामुळे त्यांना किंवा मॅनेजमेंटला त्यांचे कॉंट्रीब्युशन देण्याची गरज नाही. ज्या शिक्षकांनी ऑप्शन घेतलेला आहे, त्यांच्या बाबतीत मात्र त्यांनी दिनांक 1 जुलै, 1969 पर्यंतची रक्कम भरण्याचे आदेश होते.

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

अग्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते...

सभापती महोदय, ती रक्कम सुध्दा कोणाकडून वसूल करुन घ्यावी, कोणाचे कॉन्ट्रीब्युशन ट्रेझरीमध्ये जमा करावे, यासंदर्भात 2 मार्च 1971 चे स्पष्ट आदेश आहेत. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, "So far as point No.2 is concerned, the government is pleased to direct that the service rendered by the teachers in non-governmental secondary schools for the period during which no contribution to the contributory provident fund was made will also count for pension" याचाच अर्थ कॉन्ट्रीब्युशन भरण्याचे बंधन नव्हते. अनुदानित व विना अनुदानित अशा दोन प्रकारच्या शाळा महाराष्ट्रामध्ये आहेत. विनाअनुदानित शाळामध्ये दोन प्रकार आहेत "ए" कॅटेगिरी व "बी" कॅटेगिरी, "ए" कॅटेगिरीच्या शाळा कायम विनाअनुदान तत्वावर आहेत, आणि "बी" कॅटेगिरीच्या शाळा सुरुवातीला विनाअनुदान तत्वावर असतात आणि मग त्या टप्प्या टप्प्याने अनुदानावर येतात. मग जो शिक्षक सुरुवातील "बी" कॅटेगरीमध्ये मधील विना अनुदानित शाळेवर काम करतो, त्यानंतर अनुदानावर येणाऱ्या शाळेमध्ये काम करतो, त्यांच्याकडून कोणत्याही प्रकारचे कॉन्ट्रीब्युशन घ्यावयाचे नाही. अशा प्रकारचे स्पष्ट आदेश 14 फेब्रुवारी 1972 च्या शासन निर्णयात दिलेले आहेत. त्यामध्ये स्पष्ट म्हटलेले आहे की, "ए" कॅटेगिरी म्हणजे कायम विनाअनुदान तत्वावरील शाळा आणि "बी" कॅटेगिरी म्हणजे " There are, however, some schools which are for, a certain number of years to being with required to remain in the category of unaided secondary schools primarily because Government is, owing to financial constraints, unable to give them grant-in-aid, though such schools have, right from the beginning, sought Government grant, such schools are required to function as unaided schools for some period not because they did not want Government aid but because Government aid is not given to them even though they fulfilled the relevant conditions of recognition and aid." या "बी" प्रकारच्या शाळा आहेत. कॉन्ट्रीब्युशनच्या संदर्भात शासनाने असे म्हटलेले आहे की, If the service rendered by teacher is in an unaided

.....2....



श्री. रामनाथ मोते......

secondary school falling in त्यांच्या बाबतीमध्ये कॉन्ट्रीब्युशन भरावयाची सक्ती आहे. हे एवढे स्पष्ट असतांना सुध्दा रत्नागिरी जिल्हयामध्ये अनेक शिक्षक सुरुवातीला ज्यांच्या शाळा विनाअनुदानित होत्या त्या टप्प्या टप्प्याने अनुदानावर आल्या. अनुदानित शाळेतील शिक्षक म्हणून त्यांना पेन्शन योजना लागू आहे. पण त्यांचे विनाअनुदानित कालावधीचे मॅनेजमेंटचे कॉन्ट्रीब्युशन त्यांनी ट्रेझरीमध्ये भरले नाही, या कारणास्तव त्यांचे पेन्शन पेपर अडविले गेले आहेत, त्यांना सेवा निवृत्तीवेतन मिळाले नाही. खरे तर हे मॅनेजमेंटचे कॉन्ट्रीब्युशन आहे, जे शिक्षकाला प्रत्यक्ष मिळालेच नाही. मॅनेजमेंटने दिलेच नाही, ते शिक्षकांकडून जबरदस्तीने वसूल का करीत आहात. त्यावर दंड व्याज तुम्ही का वसूल करीत आहात. ही रक्कम भरण्याचे बंधन शासन निर्णयानुसार या शिक्षकांवर नाही. शासन निर्णयाच्या विरोधात आपण ही सगळी जबरदस्ती करीत आहात. हा शिक्षकांवर अन्याय होत आहे. आणि म्हणून या अर्ध्या तास चर्चेच्या माध्यमातून सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांकडून मला दोन प्रश्नांची उत्तरे हवी आहेत, त्यातील नंबर एकचा प्रश्न असा आहे की, कॉन्ट्रीब्युटरी प्राव्हीडंड फंडामध्ये विना अनुदानित कालावधीचे कॉन्ट्रीब्युशन, मॅनेजमेंटचा शेअर भरण्याचे जे बंधन आपण टाकलेले आहे ते नियमबाहय आहे, आपल्या जी.आर.च्या विरुध्द आहे, हे तातडीने मागे घेऊन बंद करणार आहात काय ? तसेच दुसरा प्रश्न असा आहे की, या निर्णयाचा चुकीचा अर्थ लावून ज्या अधिकाऱ्यांनी आमच्या शिक्षकांचे 50-60-70 हजार रुपये त्यांच्या ग्रॅज्युएटीमधून वसूल केलेले आहे. ते तातडीने परत करण्याचे आदेश देणार आहात काय ? आम्ही सर्वच बाबतीमध्ये शासनाकडे आग्रह धरतो, सविस्तर विषय मांडतो, चर्चा करतो, हा प्रश्न सामोपचाराने सुटावा अशी आमची विंनती आहे, प्रत्येक गोष्टीसाठी कृपा करुन आम्हाला न्यायालयात जाण्यास भाग पाडू नका. माननीय मंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, शासनाने हा प्रश्न तातडीने सोडवावा.

यानंतर श्री. सांगळे...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके ( शालेय शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, दि.14/2/1972 च्या शासन निर्णयासंदर्भात एक संदिग्धता आहे, ती दूर करण्याची गरज आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी त्या शासन निर्णयामधील काही परिच्छेद या ठिकाणी कोट केले आहेत त्यामधील शब्द थोडे संदिग्ध आहेत. संपूर्ण राज्यातील विनाअनुदानित प्राथमिक व माध्यमिक संस्थांमध्ये सेवा करताना ज्यावेळी ही संस्था अनुदानित तत्वावर येते त्यावेळी तेथील शिक्षकांना सेवानिवृत्ती वेतनासाठी पात्र किंवा ग्राहय धरावयाचे असेल तर ते अंशदान भरणे क्रमप्राप्त आहे. हा मुद्दा रत्नागिरी जिल्हयातील 4 शिक्षकांच्या संदर्भात घडलेला आहे, त्यापैकी एक शिक्षक सेवानिवृत्त झालेले आहेत. त्याच शाळेतील 10-12 शिक्षक अशंदान अनुदान भरत आहेत. या संदर्भात माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, या मंगळवारी किंवा बुधवारी या शासन निर्णयाच्या संदर्भात जी काही थोडी संदिग्धता आहे त्यामध्ये दुरुस्ती करणे गरजेचे आहे. अंशदान अनुदान सक्तीने किंवा जबरदस्तीने वसूल केल्याची बाब खरी नाही. दि.20/3/2000 रोजी सन्माननीय सदस्यांनी दिलेल्या पत्राला उत्तर आलेले नाही, ही बाब खरी आहे. परंतु या विषयाच्या संदर्भात अनेक बैठकी झाल्या होत्या त्या बैठकींमध्ये हा विषय चर्चेला येईल अशी आमची अपेक्षा होती. परंतु हा विषय त्यावेळी चर्चेला आला नाही. म्हणून या विषयाच्या संदर्भात येत्या मंगळवारी किंवा बुधवारी माझे अधिकारी व सन्माननीय सदस्य आपण एकत्रितपणे बसून ही संदिग्धता दूर करण्याचा प्रयत्न करु व ही वसुली नियमबाहय होणार नाही याची दखल घेतली जाईल.

श्री.रामनाथ मोते : तोपर्यंत ज्या शिक्षकांची सेवानिवृत्तीची प्रकरणे प्रलंबित आहेत त्यांनी अंशदान कसे भरायचे ? कारण अंशदान भरण्याबाबत असा कोणताही नियम नाही, शासनाचा जी.आर. नाही. अशा प्रकारचा एखादा जी.आर आहे काय ?

**उपसभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांना सांगू इच्छितो की, माननीय मंत्रिमहोदयांनी येत्या मंगळवारी किंवा बुधवारी याबाबत वेळ दिली आहे ती योग्य आहे. त्यावेळी सन्माननीय सदस्य आणि संबंधित अधिकारी यांना एकत्रितपणे बसून हा प्रश्न निकाली काढण्याचे मान्य केले आहे.

डॉ.अशोक मोडक : मी सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी मांडलेल्या भूमिकेच्या समर्थनार्थ मी या ठिकाणी उभा आहे. या संदर्भात माननीय मंत्रिमहोदयांनी जी.आर. मध्ये संदिग्धता

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.अशोक मोडक ...

असल्याचे मान्य केले आहे. तसेच त्यांनी हे सुध्दा मान्य केले आहे की, एका अर्थाने काही सक्ती करण्यात आली. तसेच येथेच का आश्वासन घ्यावयाचे, कारण सभागृहामधील आश्वासनाला अतिशय महत्व असते. म्हणून सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी आपल्या भाषणाच्या समारोपात ज्या दोन मुद्दांचा परामर्श केला त्याबाबत मी पुन्हा उल्लेख करतो.

**उपसभापती** : त्या दोन मुद्दांचा पुन्हा उल्लेख करण्याची गरज नाही.

डॉ.अशोक मोडक : ठीक आहे. परंतु या दोन मुद्दांच्या संदर्भात या सदनात आश्वासन देणे आवश्यक आहे.

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, विनाअनुदानित संस्थेच्या शाळेमध्ये झालेली सेवा सेवानिवृत्ती वेतन लागू होण्यासाठी शिक्षकांनी अंशदान भरण्याची आवश्यकता आहे. ही योजना संपूर्ण राज्यामध्ये लागू आहे. या जी.आर. मध्ये थोडी संदिग्धता असल्यामुळे रत्नागिरी येथील 3-4 शिक्षकांच्या मनात थोडा संभ्रम निर्माण झाला आहे, हा संभ्रम दूर करणे गरजेचे आहे आणि तो निश्चितपणे दूर करण्याचा प्रयत्न करु.

श्री.रामनाथ मोते : ज्या शाळा कायमस्वरुपी विनाअनुदानित आहे त्या शाळेतील शिक्षकांनी अनुदान भरण्याबाबत माझे कोणतेही दुमत नाही. परंतु ज्या शाळा सुरुवातीला विनाअनुदानित असतात, त्या नंतर अनुदानित झाल्यानंतर तेथील शिक्षकांकडून त्या कालावधीचे अंशदान घेण्याचे आपल्याला बंधन करता येणार नाही. या जी.आर. मध्ये कोणत्याही प्रकारची संदिग्धता नाही. त्यामध्ये "अ" आणि "ब" कॅटेगरी असे स्पष्टपणे म्हटलेले आहे. आता कोणत्याा जी.आर. च्या अनुषंगाने विनाअनुदानित शाळांना अंशदान बंधनकारक असल्याचे माननीय मंत्रिमहोदय सांगत आहेत. त्या जी.आर.बाबत माननीय मंत्रिमहोदयांनी कोणत्याही प्रकारे उल्लेख केलेला नाही.

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, दि.3 ऑगस्ट, 1992 हा प्राथमिक शाळेच्या संदर्भातील जी.आर. आहे. त्यानंतर सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी कोड केलेले सर्व जी.आर.चे संदर्भ माझ्याकडे आहेत. परंतु या प्रकरणी शिक्षकांनी अंशदान भरणे गरजेचे आहे. ही योजना संपूर्ण राज्यभर लागू आहे. याबाबत रत्नागिरी येथील 4 शिक्षकांच्या मनात संभ्रम आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : अर्धा तास चर्चा संपली आहे.

आता सभागृहाची बैठक स्थगित होईल आणि दुपारी 12.00 वाजता सभागृहाची नियमित बैठक सुरु होईल.

( सभागृहाची बैठक सकाळी 11.13 ते दुपारी 12.00 पर्यंत स्थगित झाली.)

-----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/MAP/D. श्री. सांगळे नंतर --- 12.00

**सभापतीस्थानी - माननीय सभापती**

**पृ.शी./मु.शी.** : तोंडी उत्तरे.

**( राखून ठेवलेला तारांकित प्रश्न )**

---

**मुंबईतील भुलेश्वर व धारावी येथील कारखान्यावर छापे घालून बाल कामगारांची केलेली सुटका व डोंगरी येथील बालसुधार गृहातील मुले पळून गेल्याबाबत**

*** 14130 श्रीमती सुधा जोशी, श्री. संजय दत्त, श्री. यशवंतराव गडाख, श्री. मधुकर सरपोतदार, डॉ. दीपक सावंत, श्री. अरविंद सावंत, श्री. विलास अवचट, श्री. अनिल परब, श्री. मधुकर चव्हाण, श्री. विनोद तावडे, श्री. गोविंदराव आदिक, मेजर सुधीर सावंत, श्री. सुधाकर गणगणे, श्री. नतिकोद्दीन खतिब** : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) भुलेश्वर व धारावी (मुंबई) या परिसरातील कारखान्यावर छापे घालून पोलिसांनी 40 बालकामगारांची सुटका केल्याचे दिनांक 19 जोनवारी,2006 रोजी वा त्या सुमारास आढळून आले, हे खरे आहे काय,
(2) मुंबईतील डोंगरी बालसुधारगृहातील काही मुले पळून गेल्याचे दिनांक 1 जानेवारी,2006 रोजी वा त्या सुमारास उघडकीस आले हे खरे आहे काय,
(3) मुंबईतील डोंगरी येथील बालसुधारगृहातील अनेक मुलांना दारुचे व्यसन असुन त्यांना नियमित दारु पुरविण्यात येते व काही बालगुन्हेगारांचे अंडरवर्ल्डशी थेट संबंध आहेत हे खरे आहे काय ?
(4) असल्यास, वरील प्रश्न (1), (2) व 3 नुसार चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(5) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

.

**श्री. धर्मरावबाबा आत्राम, श्री. हर्षवर्धन पाटील यांच्याकरिता** : (1) होय.
दिनांक 12.1.2006 रोजी भुलेश्वर येथून 10 व धारावीतून 30 बालकामगारांची सुटका केली.
(2) होय.
दिनांक 31.12.2005 रोजी डोंगरी बालसुधारगृहातून 35 मुले निघून गेली.
(3) नाही.
(4) चौकशी करण्यात आली आहे. चौकशीनुसार मुले निघून जातांना कर्तव्यावर असलेल्या कर्मचाऱ्याकडून स्पष्टीकरण मागविण्यात आलेले आहे.
(5) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, बालमजुरांच्या सुटकेच्या बातम्या सध्या वरचेवर आपल्या वाचनामध्ये येत आहेत. तेव्हा शासनाने या बाबतीत काही खास मोहीम उघडली आहे काय? या बालमजुरांची सुटका करून त्यांना त्यांच्या गावी परत पाठविल्यावर ते आपल्या बरोबर

..... पी 2 ..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी (पुढे चालू..) ता.प्र.क्र.14130 ...

इतर आणखी समवयस्क मुलांना घेऊन परत येऊन आपल्या मूळ कामावर रूजू होतात अशी बातमी आजच्याच टाईम्स ऑफ इंडियामध्ये आलेली आहे. तेव्हा या बाबतीत शासन काही पावले उचलणार आहे काय ? आणि ज्या ठिकाणी हे बालमजूर पुन्हा कामावर येतात तेथील मालकांवर त्वरित अटक करून त्यांचेवर कडक कारवाई करण्याचे आदेश शासनाने दिलेले आहेत काय किंवा देणार काय ? तसेच त्या बालकामगारांच्या पुनर्वसनाच्या दृष्टीने काही त्रुटी असतील तर अन्य काही नवीन कायम स्वरूपाची अशी पुरोगामी योजना शासन आखणार आहे काय ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी यांनी प्रश्न उपस्थित केलेला आहे त्याबाबत मी सांगेन की, एक तर यामध्ये जे बालमजूर किंवा धाडी टाकल्यानंतर जी मुले सापडतात त्यांची पर्यायी व्यवस्था आपण रिमांडहोम मध्ये करीत असतो. परंतु त्यानंतर त्यांना त्यांच्या पालकांपर्यंत पोहोचविण्याचे काम शासनामार्फत केले जाते. त्यातील काही मुले ही परराज्यातीलसुद्धा सापडतात. त्यांचेबाबतीत पोलीस फोर्सची मदत घेऊन परराज्यातील त्यांच्या गावी त्यांना पोहोचविण्याचे काम सध्या चालू आहे. सभापती महोदय, मुंबई आणि ठाणे या दोन जिल्ह्यांमध्ये बालमजूरांच्या बाबतीत राज्य सरकारने कडक मोहीम स्वीकारली आहे. त्यासाठी आपण टास्क फोर्स देखील गठित केलेला आहे आणि त्या माध्यमातून गृह विभाग, कामगार विभाग, महिला व बालकल्याण विभाग आणि महानगरपालिका अशा सर्वांना एकत्र करून येत्या वर्षभरामध्ये या बाबतीत ही कडक मोहीम आपण स्वीकारली आहे. अशा पद्धतीने जे बाल मजूर ठेवतात त्या मालकांवर आपण काय कारवाई करतो असाही एक प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारला आहे त्याबाबत मी सांगू इच्छितो की, त्यांचेवर कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश आपण विभागाला दिलेले आहेत.

श्री. विलास अवचट : सभापती महोदय, त्या दिवशी आपण हा प्रश्न राखून ठेवला होता तेव्हा बालकामगार आणि बाल गुन्हेगार असा प्रश्न उपस्थित झालेला होता. बालमजुरांच्या बाबतीत आपण नवीन धोरण स्वीकारले आहे त्याबद्दल स्वागतच आहे. परंतु या बालमजुरांची सुटका करून त्यांची पर्यायी व्यवस्था जेथे केली जाते त्या ठिकाणी बालगुन्हेगारही आहेत आणि त्यांच्या बरोबर असल्यामुळेच 31 डिसेंबरला जी दंगल झाली होती त्याबाबतीत आपण उत्तर दिले की, असे काहीच घडलेले नाही. तेव्हा बालकामगार आणि बाल गुन्हेगार यांच्यासाठी वेगळ्या बरॅक्स ठेवणे आवश्यक होते. तसे न झाल्यामुळेच ती दंगल झाली हे खरे आहे काय ? ..... पी 3 ..



KBS/MAP/D. श्री. सांगळे नंतर --- 12.00

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, 31 डिसेंबरला जो प्रकार घडला त्याची माहिती हा प्रश्न पहिल्यांदा आला त्यावेळी माननीय राज्यमंत्र्यांनी दिलेली आहे आणि आताच्या लेखी उत्तरामध्ये देखील ती माहिती दिलेली आहे. परंतु या बाबतीत सन्माननीय सदस्य सांगतात ती गोष्ट खरी आहे. ज्यावेळेस अशी काही मुले बालगृहामध्ये ठेवली हाती त्यातील काही मुले गुन्हेगारी प्रवृत्तीची होती त्यामुळे तेथे लाईट फोडण्यात आले. ...

( यानंतर श्री. सरफरे .... क्यू 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 14130...

श्री. हर्षवर्धन पाटील...

त्याबाबत आपण विचार करुन असे ठरविले आहे की, अशाप्रकारची मुले रिमांड होममध्ये आणली जातात त्यामध्ये गुन्हेगारी स्वरुपाची मुले असतील तर त्यांच्यासाठी वेगळी व्यवस्था करु.

श्रीमती कांता नलावडे : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी या मुलांची वेगळी व्यवस्था करु असे सांगितले. परंतु ही व्यवस्था आधीपासून कां केली नाही? बाल मजूर आणि बाल गुन्हेगारांना एकत्र ठेवल्यामुळे हे प्रकरण घडले. आजही चिल्ड्रेन्स एड सोसायटी व डोंगरी येथे दोन्ही वर्गातील मुलांना एकत्र ठेवले जात आहे याची आपण नोंद घेणार काय?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, गृह विभागामार्फत रेड टाकल्यानंतर त्यामध्ये जी मुले सापडतात त्यांना पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदविण्यासाठी पाठविले जाते. त्यांची नोंदणी झ ााल्यानंतर गृह विभागामार्फत महिला व बाल कल्याण विभागाला या सापडलेल्या मुलांची व्यवस्था करण्याबाबत कळविण्यात येते. परंतु या मुलांमध्ये बाल कामगार किती व बाल गुन्हेगार किती आहेत याची माहिती नसते. यापुढे ही मुले ताब्यात घेतांना गृह विभागाकडून या मुलांची पूर्णपणे चौकशी करण्यात येईल. आणि त्यामध्ये जर बाल कामगार व बाल गुन्हेगार मुले असल्याचे आढळले तर त्यांची व्यवस्था कोणत्या रिमांड होममध्ये करावयाची यासंबंधी निश्चितपणे विचार करु.

श्री. मुजफ्फर हुसेन : सभापती महोदय, बाल मजुरांची सुटका केल्यानंतर त्यांच्या पालकांपर्यंत त्यांना पोहोचविण्याची व्यवस्था करण्यात येते. पकडण्यात आलेल्या मुलांमध्ये इतर राज्यातील मुलांची संख्या जास्त असल्यामुळे त्यांच्या पालकांच्या ताब्यात देतांना त्यांना शासनातर्फे समज देण्यात येते काय? तसेच, त्यांच्या पालकांवर कारवाई करण्याचे शासनाने ठरविले आहे काय?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सापडलेल्या मुलांना आपण जेलमध्ये टाकले पाहिजे अशापध्दतीची शासनाची भूमिका नाही.त्यासाठी आपल्याकडे रिमांड होम आहेत. गृह विभागाकडून रेड टाकल्यानंतर व त्यामध्ये मुले सापडल्यानंतर त्यांची व्यवस्था करण्याबाबत महिला व बाल कल्याण विभागाला सांगण्यात येते. ज्यावेळी ही मुले आमच्या विभागामार्फत ताब्यात घेण्यात येतात त्यावेळी त्या मुलांच्या पालकांना बोलावून त्यांच्या ताब्यात मुले दिली जातात. त्याचप्रमाणे ज्या मुलांचे पालक नसतील तर त्यांची व्यवस्था करण्याबाबत आपल्याकडे एक कमिटी आहे. तसेच,

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

24-03-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) Q 2

DGS/ MHM/ KGS/ 12:05

ता.प्र.क्र. 14130...

श्री. हर्षवर्धन पाटील...

रेडमध्ये सापडलेल्या गुन्हेगारी प्रवृत्तीच्या बालकांची वेगळी व्यवस्था करण्यासाठी आम्ही इमारतीचे बांधकाम सुरु केले आहे. ते पूर्ण झाल्यानंतर अशा मुलांसाठी वेगळी व्यवस्था केली जाईल.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, बाल मजुरांना पकडण्याची कारवाई फक्त मुंबई शहरामध्ये सुरु आहे. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये असलेल्या मोठया शहरांमध्येही बाल मजुरांचे प्रमाण जास्त आहे. त्या ठिकाणी शासनातर्फे बाल मजुरांची सोडवणूक करण्यासाठी कठोर कारवाई केली जाईल काय? दुसरा प्रश्न असा की, बाल कामगार आणि बाल गुन्हेगारांना एकत्र ठेवल्यास बाल मजुरांच्या मनावर गुन्हेगारीचा प्रभाव पडतो म्हणून बाल कामगार आणि बाल गुन्हेगारांची स्वतंत्रपणे वेगळी व्यवस्था केली जाईल काय? तिसरा प्रश्न असा की, जे अनाथ बाल मजूर आहेत त्यांची व्यवस्था करण्यासंदर्भात शासन काही ठोस कारवाई करणार आहे काय?

श्री. हर्षवर्धन पाटील : राज्य सरकारच्या वतीने बाल मजुरांना व बाल गुन्हेगारांना पकडण्याची धडक मोहीम हातामध्ये घेण्यात आली आहे. अशाप्रकारे रेड टाकण्यात आली व त्यामध्ये काही मुलांना पकडण्यात आले आहे त्याचे वृत्त आजच्या टाईम्स ऑफ इंडिया वर्तमानपत्रामध्ये छापून आले आहे. गेल्या 9 ते 10 महिन्याच्या काळात 15 हजारापेक्षा अधिक बाल मजुरांची शासनाने मुक्तता केली आहे. त्यामुळे जे मालक अशाप्रकारे बेकायदेशीर कृत्य करीत आहेत त्यांच्यावर एकप्रकारे वचक बसला आहे. पकडण्यात आलेल्या 10 ते 12 हजार बाल मजुरांना परत पाठविण्याचे काम झाले आहे. विशेष करुन मुंबई व ठाणे या दोन शहरांमध्ये बाल मजुरांना परत पाठविण्याच्या संदर्भात मोठया प्रमाणात काम केले आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.14130 ( पुढे सुरु.....

श्री.हर्षवर्धन पाटील (पुढे सुरु...

त्यादृष्टीने कडक कारवाई आणि धडक मोहीम विभागाच्या माध्यमातून आम्ही सुरु केलेली आहे.

डॉ.अशोक मोडक : सभापती महोदय, माझा प्रश्न डोंगरी येथील बाल सुधारगृहाच्या संबंधात आहे. डोगरी येथील बाल सुधारगृहातून 31 डिसेंबरला 35 मुले पळून गेली, असे आपणच कबूल केलेले आहे. मुळामध्ये ती मुले पळून गेलेली आहेत, हे 1 जानेवारीला लक्षात आले, हे खरे आहे काय ? या संबंधाने ज्यांच्याकडून स्पष्टीकरण मागविलेले आहे, ते मिळालेले आहे काय ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, एक तर मुले पळून गेली, हाच प्रश्न महत्वाचा आहे. बाल सुधारगृहामध्ये रेडमध्ये सापडलेल्या मुलांना आणून ठेवतो. 31 डिसेंबरला जो प्रकार घडला, त्यावेळेस रात्री 8-00 ते 8-30 च्या सुमारास 35 मुलांपैकी काही मुलांनी लाईटस् फोडल्या. त्यामुळे तेथे अंधार झाला. त्याबाबत तेथील अधिक्षकांनी याबाबत पोलीस स्टेशनमध्ये कळविले. त्यानंतर एक तासांनी पोलीस त्या ठिकाणी आले. त्यांनी कंपाऊंडच्या बाहेरुन पहाणी केली. ते कंपाऊंडच्या बाहेर होते. या मुलांपैकी काही मुले ही गुन्हेगारी स्वरुपाची होती. 31 डिसेंबरला संध्याकाळी 35 मुले अंधाराचा फायदा घेऊन निघून गेली. त्यानंतर 1 जानेवारीला रितसर पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदविली. ज्या 35 मुलांपैकी परत आलेल्या मुलांची संख्या 24 आहे. राजस्थान कलकत्ता बिहार, गुजरात, झारखंड, उत्तर प्रदेश येथील काही मुले होती. तसेच काही मुले ही व्यसनी होती. त्यांनी या ठिकाणी दारु उपलब्ध होईल काय, अशाप्रकारची विचारणा केली. त्यामधून काही प्रकार घडले, म्हणून अधीक्षकांनी त्या ठिकाणी पोलीस स्टेशनकडून संरक्षण मागितले. तेथील काही कर्मचाऱ्यांकडून हलगर्जीपणा झाला, म्हणून त्यांना आम्ही शो-कॉज नोटिसा दिलेल्या आहेत. अशाप्रकारे 31 तारखेला घडलेली घटना 1 तारखेलाच या सदर्भातील कारवाई करण्यात आली.

डॉ.अशोक मोडक : आपल्याकडे स्पष्टीकरण आलेले आहे ना? असे असतांना "कर्मचाऱ्यांकडून स्पष्टीकरण मागविण्यात आलेले आहे" अशाप्रकारचे उत्तर दिलेले आहे. सभापती महोदय, वारंवार विचारावेसे वाटते की,मंत्री महोदयांकडे ब्रिफिंग होत असेल, तेव्हा दिलेले उत्तर पहातात की नाही ?

**सभापती** : पाहिलेच जाते.

डॉ.अशोक मोडक : मग हे उत्तर बदलावयास नको काय ?

**सभापती** : असा आक्षेप घेणे बरोबर नाही.

24-03-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) R-2

SKK/ KGS/ MHM/

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.अशोक मोडक : स्पष्टीकरण आलेले आहे, अशाप्रकारचा खुलासा केला असता, तर आमचे काही म्हणणे नव्हते. असे वारंवार घडत, म्हणून मी विचारलेले आहे.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, अधीक्षक श्री.गोरड यांनी सुरक्षा यंत्रणेत त्रुटी व मादक पदार्थ संस्थेत पोहोचविले जातात त्याबाबत बऱ्याचवेळा तेथील कर्मचारी बेसावध असण्याबाबत, कळविलेले आहे. त्याचप्रमाणे गृहपाल श्री.मिसाळ त्याचप्रमाणे सफाई कामगार श्री.हिरालाल सरदार आणि चार रक्षक श्री.राजाराम पवार, श्री.विलास कांबळे, श्री.शांताराम घडशी आणि श्री.उदयसिंग शिंदे या सगळयांवर 31-12-2005 रोजी घटना घडली त्या संदर्भात त्यांच्यावर कारवाई सुरु केलेली आहे.

श्रीमती संजीवनी रायकर : ही मुले पळून जाऊ नयेत, म्हणून उंच कंपाऊंड वॉल बांधण्याची काळजी घेतलेली आहे काय ? धडक मोहीम घेतलेली आहे, त्याबाबतीत टीव्हीवर मी बातमी पाहिलेली आहे. काही मुलांचे आईवडील असतांनाही त्या मुलांना त्या ठिकाणी नेलेले आहे. त्यानंतर बिचारे आईवडील ओरड येऊन आमच्या मुलाला आमच्याकडे द्यावे असे म्हणत होते परंतु चौकशी करुन मग देऊ, असे सांगण्यात आले. तसे करण्यापेक्षा ज्यांचे आई-वडील येतील त्यांना तातडीने लगेचच्या लगेच ती मुले त्यांच्या ताब्यात देऊ शकाल काय ? की एक दिवस त्या मुलांना थांबवून नंतर त्या मुलांना त्यांच्या ताब्यात दिले जाणार आहे ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, त्या ठिकाणी अगोदरच वॉल कंपाऊंड आहे. त्या वॉल कंपाऊडवरुन उड्या मारुन ती मुले पळून गेलेली आहेत.

श्रीमती संजीवनी रायकर : त्या ठिकाणी काचा आहेत काय ?

श्री.हर्षवर्धन पाटील : तशा प्रकारची दक्षता निश्चित घेतली जाईल. जी ॲक्टप्रमाणे तरतूद आहे, त्याप्रमाणे मुलांना त्यांच्या पालकांकडे हस्तांतर करण्याची कारवाई आपण करतो.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, काल बाल मजुरांना पकडण्यात आलेले आहे. शासनाचे अभिनंदन करतो की, शासन चांगले पाऊल उचलत आहे. परंतु एक विदारक दृश्य समोर आले, त्या संबंधातील माझा प्रश्न आहे. एका मुलाला विचारण्यात आले की, तू हे काम का करतोस, त्यावर तो म्हणाला, मी या कष्टातून बहिणीचे लग्न करेन, आई-वडिलांचे ऋण फेडेन. त्यामधून एक गोष्ट लक्षात येते की, ही निराधार मुले आहेत, त्यांच्यातील टॅलेंट मुले पाहून, त्यांची

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (पुढे सुरु...

झेप पाहून, शासन त्यांचे पुनर्वसन करणार आहे काय ? कारण ही मुले पुढे बुध्दीने वेगवेगळया क्षेत्रात मोठी होऊ शकतात. त्यांची टॅलेंट टेस्ट घेऊन त्यांचे पुनर्वसन करणार आहात काय ?

यानंतर श्री.बरवड......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 14130 .....

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, लोकसंख्या वाढल्यामुळे आणि बेकारीचा प्रश्न निर्माण झाल्यामुळे अशा पध्दतीने बाल मजुरांचे आणि बाल गुन्हेगारीचे प्रमाण काही ठिकाणी वाढत आहे. विशेषकरुन मुंबई शहरामध्ये बिहार, झारखंड, उत्तरप्रदेश या ठिकाणाहून मुले येतात. बेकारी, गरिबी, भूक हे त्याचे कारण आहे. त्यासंदर्भात पुनर्वसन करण्याची योजना आपल्या विभागाने तयार केलेली आहे. बाल मजुरांना रिमांड होममध्ये शॉर्ट कोर्सेस उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात चिड्रन एड सोसायटीमध्ये आपले राज्यमंत्री, अधिकारी तीन वेळा जाऊन आले. त्या ठिकाणी बैठका घेतल्या. त्या बाल मजुरांचे वेगळ्या पध्दतीने शिक्षण देऊन त्यांचे पुनर्वसन करणे, ज्यांचे कोणीही नाही, जे अनाथ आहेत त्यांच्या बाबतीत राज्य सरकारची पुनर्वसनाची योजना आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

-----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MHM/

( तारांकित प्रश्न )

**सांगली जिल्ह्यातील दुष्काळामुळे वाळलेल्या द्राक्ष बागांच्या कर्जाचे व्याज माफ करणेबाबत**

**(1) * 12941 प्रा. शरद पाटील , श्री. जयंत पाटील** : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) सन 2003-2004 या आर्थिक वर्षात अवर्षणामुळे वाळलेल्या सांगली जिल्ह्यातील द्राक्ष बागांसाठी काढलेल्या कर्जावरील व्याज माफ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या संबंधीचा निर्णय सर्वसाधारणपणे केव्हा होण्याची शक्यता आहे ?

**श्री. जयप्रकाश दांडेगावकर, डॉ.पतंगराव कदम यांच्याकरिता** : (1) सन 2002-2003, 2003-2004 या आर्थिक वर्षात अवर्षणामुळे राज्यातील फलोत्पादन पिकांचे (रोजगार हमी योजनेअंतर्गत येणारी फळपिके वगळून) संपूर्ण नुकसान झालेले आहे. अशा शेतकऱ्यांनी फलोत्पादन पिकांसाठी घेतलेल्या मध्यम मुदत कर्जावरील व्याज तसेच सदर फळबागा जोपासण्यासाठी घेतलेल्या कर्जावरील व्याज शासनाच्या वतीने भरणा करण्याचा निर्णय अनुक्रमे दिनांक 25.01.2006 व दिनांक 03.03.2006 रोजी घेण्यात आला आहे.

(2) प्रश्न उद्‌भवत नाही.

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, शेतकऱ्यांनी घेतलेल्या कर्जावरील व्याज शासनाच्यावतीने भरणा करण्याचा निर्णय अनुक्रमे दिनांक 25.1.2006 व दिनांक 3.3.2006 रोजी घेण्यात आला आहे. किती शेतकऱ्यांना याचा लाभ मिळणार आहे आणि एकूण वाटपाची रक्कम किती आहे ? दुसरा प्रश्न असा की, जिल्हा मध्यवर्ती बँकांकडून घेतलेल्या कर्जावरील व्याजाची रक्कम शासन भरणार आहे. त्याचप्रमाणे राष्ट्रीयकृत बँकेचे, नागरी सहकारी बँकेचे कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांना याचा लाभ देण्याचा शासनाचा विचार आहे काय ?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, यामध्ये दोन प्रकारची कर्ज आहेत. मध्यम मुदतीच्या कर्जावरील व्याज तसेच फळबागा जोपासण्याची घेतलेल्या कर्जावरील व्याजाच्या बाबतीत जिल्हा मध्यवर्ती बँकेबरोबरच राष्ट्रीयकृत बँकेचे सुध्दा पैसे आपण भरणार आहोत. याची सन 2002-03 मधील रक्कम 19 कोटी 14 लाख रुपये आहे तसेच सन 2003-04 मधील रक्कम 18 कोटी 55 लाख रुपयांच्या जवळपास आहे. नागरी सहकारी बँकांच्या बाबतीत त्यांनी कृषी फायनान्स करणे हे त्यांच्या मनावर आहे. आपण राष्ट्रीयकृत बँक आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MHM/

ता. प्र. क्र. 12941 ..... श्री. जयप्रकाश दांडेगावकर .....

घेतलेले जे मध्यम मुदतीचे कर्ज आहे त्याच्या बाबतीत निर्णय घेतलेला आहे. कृषीच्या संदर्भात निर्णय करीत असताना नागरी बँकांच्या बाबतीत कोणताही निर्णय घेतलेला नाही.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, एकूण किती जिल्ह्यांमध्ये शेतकऱ्यांना ही नुकसानभरपाई देण्यात येणार आहे ? जिल्हावार ही नुकसानभरपाई किती आहे ? नुकसानभरपाई देत असताना त्या त्या बँकांना कळविले होते काय ?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, साधारणत: 10 जिल्ह्यांमध्ये हे वाटप आहे. त्या त्या बँकांना कळविले होते. यामध्ये सोलापूर, सातारा, सांगली, उस्मानाबाद, नाशिक, पुणे, लातूर, औरंगाबाद, जालना आणि बीड येथील बँकांना कळविले आहे आणि सहकार खात्याकडून सुध्दा त्या याद्या घेतलेल्या होत्या.

श्री. विलासराव शिंदे : सभापती महोदय, सांगली जिल्ह्याच्या संदर्भातील हा प्रश्न आहे. अवर्षणामुळे हा निर्णय शासनाने घेतलेला आहे. त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. सातत्याने चार वर्षे सांगली जिल्ह्यामध्ये अवर्षणाची परिस्थिती आहे. यामध्ये दोन वर्षाचा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्याबाबतीत शासन फेरविचार करणार काय ? दुसरा प्रश्न असा की, शासन व्याज भरणार परंतु मध्यम मुदतीच्या आणि दीर्घ मुदतीच्या पीक कर्जाची शेतकऱ्यांची जी थकबाकी झालेली आहे त्याचे हप्ते दिल्याशिवाय त्यांना पुन्हा कर्ज मिळणार नाही. याबाबतीत शासन निर्णय घेणार आहे काय ? तिसरा प्रश्न असा की, रोजगार हमी योजनेअंतर्गत ज्या फळबागा उभ्या केलेल्या आहेत त्यासाठी बँकेकडून पीक कर्ज घेतलेले आहे. त्या पीक कर्जाच्या व्याजाचा शासन विचार करणार काय ?

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 12941...)

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : रोजगार हमी योजने अंतर्गत घेतलेल्या फळबागा सोडून हा निर्णय घेतलेला आहे. कारण रोजगार हमी योजनेअंतर्गत शासनातर्फे काही अनुदान दिले जाते.म्हणून त्याबाबतीत विचार केलेला नाही. 2002-2003 आणि 2003-2004 मधील हंगामापुरता हा निर्णय आहे. ज्या फळबागा रोजगार हमी योजनेअंतर्गत नाहीत त्यासाठी ही योजना आहे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : कोकणातील आंब्याचे पीक हे देखील निसर्गावर अवलंबून असते. त्याठिकाणी रोजगार हमी योजने अंतर्गत आंब्याची लागवड केलेली असली तरी अशा किती शेतक-यांनी आंब्यासाठी कर्ज घेतलेले आहे आणि किती शेतक-यांचे कर्ज माफ केलेले आहे ?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : मी सांगितल्या प्रमाणे रोजगार हमी योजनेअंतर्गत घेतलेल्या फळबागांसाठी ही योजना नाही. आंबा हे फळ पीक रोजगार हमी योजनेअंतर्गत येते.

प्रा. शरद पाटील : ज्या शेतक-यांचे तीन-चार वर्षे दुष्काळामुळे कर्ज थकलेले आहे अशा शेतक-यांच्या कर्जाचे पुनवर्सन करणार काय ? द्राक्ष बागांसाठी किंवा द्राक्ष बागांच्या व्यवस्थापनासाठी ज्या शेतक-यांनी नागरी सहकारी बँकाकडून मध्यम मुदतीचे कर्ज घेतलेले आहे, अशा शेतक-यांना सुध्दा या सवलतीचा फायदा मिळणार आहे काय ?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : यामध्ये मोठी आर्थिक बाब येत असल्यामुळे तपासून निर्णय घेण्यात येईल.

श्री. जयंत प्र. पाटील : शासनाची योजना जाहीर होण्यापूर्वी ज्या शेतक-यांनी कर्जाची परत फेड केलेली आहे त्यांना व्याज परत देण्यात येईल काय ?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर ही मदत दिलेली आहे. या मुदतीत असेल तर करण्यात येईल.

---

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MHM/ KGS/ पूर्वी श्री. बरवड 12:20

**चितळी (ता.खटाव,जि.सातारा) येथील येरळा नदीच्या पात्रात**
**जलसेतू कोसळून झालेला अपघात**

**(२) * १४४४६ श्रीमती कांता नलावडे , श्री. रामनाथ मोते , श्री. गुरुमुख जगवानी , डॉ. अशोक मोडक , श्री. नितीन गडकरी , श्री. गोविंदराव आदिक , श्री. संजय दत्त , श्री. सुधाकर गणगणे , श्री. रमेश निकोसे , श्री. धनाजी साठे** : सन्माननीय **जलसंपदा ( कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चितळी (ता.खटाव,जि.सातारा) येथील येरळा नदीवरील बांधण्यात येत असलेल्या टेंभू योजनेचा जलसेतू येरळा नदीच्या पात्रात दिनांक २४ डिसेंबर,२००५ रोजी कोसळून २ जण ठार व ७ जणजखमी झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, अपघाताची कारणे काय आहेत व त्यादृष्टीने जलसेतूचे उर्वरित काम करताना खबरदारी घेणेबाबत कोणती उपाययोजना केली आहे ?

**डॉ. सुनील देशमुख, श्री. रामराजे नाईक-निंबाळकर यांच्याकरिता** : (१) नाही. तथापि, दिनांक २४.१२.२००५ रोजी संधानक कामासाठी पायाड उभे करतांना झालेले पायाड कोसळून एक मजूर मयत झाला व सात मजूर जखमी झाले.

(२) याबाबत प्राथमिक चौकशी केली आहे.

(३) दिनांक २४.१२.२००५ रोजी झालेली घटना ही अपघात नसून नैसर्गिक कारणामुळे झालेली आहे. आवश्यक खबरदारी घेऊन येरळा जलसेतूचे उर्वरित संधानकाचे काम पूर्ण करण्यांत आलेले आहे.

----------

श्रीमती कांता नलावडे : पायाड कोसळून एक मजूर ठार झाला, असे उत्तरामध्ये म्हटलेले आहे. त्या मजुराचा पायाडाखाली सापडून मृत्यू झाला काय ? हा अपघात नसून नैसर्गिक कारणामुळे घडलेली ही घटना आहे असेही उत्तरामध्ये म्हटलेले आहे. तेव्हा हे नैसर्गिक कारण कोणते आहे ?

डॉ. सुनील देशमुख : जलसेतूचे काम सुरु करीत असताना त्याला लोखंडाचे फाऊंडेशन दिले जाते. तेथे पायाड उभारण्याचे काम सुरु होते. वा-याच्या झोतामुळे पायाड कोसळून ते मजुराच्या डोक्यावर पडल्यामुळे त्याचा मृत्यू झाला. त्याबाबतीत अपघाती मृत्यू अशी नोंद झालेली आहे.

श्री. रामनाथ मोते : टेंभू योजनेअंतर्गत तयार होत असलेल्या जलसेतूच्या ठिकाणी ही घटना घडलेली आहे. या प्रकल्पाचे काम किती वर्षापासून सुरु आहे ? आतापर्यन्त या प्रकल्पाच्या कामावर किती कामगारांचा मृत्यू झाला ? अपघाताचे नैसर्गिक कारण कोणते ? तसेच उत्तरामध्ये

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र.14446...) (श्री. रामनाथ मोते...)

आवश्यक खबरदारी घेऊन काम पूर्ण करण्यात आलेले आहे असे म्हटलेले आहे. तेव्हा आवश्यक खबरदारी कोणती घेतलेली होती ?

डॉ. सुनील देशमुख : टेंभू योजनेच्या येरळा जलसेतूचे काम 1.10.1999 पासून सुरु केलेले होते. मे.प्रसाद कंपनी, हैद्राबाद यांच्याकडे हे काम होते. 2001 ते 2004 पर्यन्त निधी अभावी हे काम बंद होते.

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 14446 पुढे सुरु...

डॉ. सुनील देशमुख ...

सभापती महोदय, टंचाई निवारण टप्पा 2 मध्ये सप्टेंबर 2004 पासून या कामाला सुरुवात झालेली आहे. या कामाच्या दरम्यान जे अपघात झाले त्यामध्ये 4.8.05 मध्ये वेल्डींग करताना एका कामगाराचा मृत्यू झाला. 5.11.05 मध्ये भरावाचे टिप्पर मागे येताना एका मजुराचा मृत्यू झाला आणि आता 22.11.05 मध्ये जलसेतूच्या वरच्या भागावर काम करताना एका मजुराचा मृत्यू झाला.

श्री. गोविंदराव आदिक : सभापती महोदय, ज्या मजुरांचा मृत्यू झालेला आहे आणि जखमी झालेले आहेत त्यांना शासनाच्या वतीने काही मदत केलेली आहे काय आणि केली असेल तर किती मदत केलेली आहे

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, जो ठेकेदार होता त्याच्याशी झालेल्या कराराप्रमाणे ठेकेदारालाच याची नुकसान भरपाई द्यावयाची होती. अडीच लाख रुपये नुकसान भरपाई दिलेली आहे. लेबर कोर्टामध्ये केस दाखल केली आहे. लेबर कोर्टाचा निकाल मान्य करावा लागेल असे ठेकेदाराने लिहून दिल्यामुळे लेबर कोर्टाचा निकाल लागून जेवढे पैसे देय होतील तेवढे पैसे त्यांना देण्यात येतील.

श्रीमती कांता नलावडे : सभापती महोदय,मुळातच या जलसेतूचे जमिनीपासून 90 फुटावर काम चालू आहे आणि जो मुरुमाचा भराव घातलेला आहे तो बरोबर झालेला नाही आणि त्याची लेव्हलही बरोबर नाही. त्याच्यामुळे तो कोसळला. ज्या बाजूला पायाड होते तेथे एक विहिर होती आणि ती विहिर काम चालू असताना त्याच्यावर झाकण घालून बंद ठेवणे आवश्यक होते. ती केली नाही. जे कामगार विहिरीत कोसळले ते वाचले. एक कामगार कठडयावर आपटून मृत पावला आणि दुसरा सांगाडयात अडकून मृत पावला असे दोन मृत्यू झालेले आहे. त्यांची नांवे माझ्याकडे आहेत. जेव्हा अपघात सकाळी 10.00 वा झाला तेव्हा उपअभियंता घटनास्थळी नव्हते ही गोष्ट खरी आहे काय ? या घटनेमध्ये दोघांचा मृत्यू झालेला आहे एक कठडयावर आपटून आणि एक सांगाडयात अडकून हे खरे आहे काय ?

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, ज्या जलसेतूचे काम सुरु होते त्याच पध्दतीचे 18 जलपेट्यांचे काम याआधीच पूर्ण झालेले आहे. 19 व्या जलपेटयाचे काम सुरु होते. पहिल्या 18 मध्ये काहीही अपघात झालेला नाही. याचे इरेक्शनचे काम सुरु होते. वाऱ्याच्या झोतामुळे हा भाग

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 14446 पुढे सुरु..,

डॉ. सुनील देशमुख ...

कोसळला आणि एका कामगाराचा मृत्यू झाला. तरी सुध्दा माननीय सदस्य सांगतात त्याप्रमाणे दोन मजुराचा मृत्यू झालेला आहे हे खरे मानून याची पुन्हा एकवार चौकशी करण्यात येईल आणि ती माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

------

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## हिरा बंबई बृहत लघु पाटंबधारे प्रकल्पाचे बांधकाम

**(३) * १३१२२ प्रा. बी. टी. देशमुख , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , श्री. वसंतराव खोटरे , श्री. नानासाहेब बोरस्ते , श्री. जी. एल. अैनापूरे , श्री. राजेंद्र जैन , श्री. जितेंद्र आव्हाड : तारांकित प्रश्न क्रमांक ९५०० ला दिनांक ६ डिसेंबर, २००५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) लाभक्षेत्र विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यामध्ये अंदाजे ६९९ हेक्टरची सिंचनक्षमता निर्माण करु शकणाऱ्या हिरा बंबई बृहत लघुपाटंबधारे प्रकल्पाचे सर्व्हेक्षण पूर्ण झालेले असल्याने उक्त प्रकल्पास प्रशासकिय मान्यता प्रदान करण्याच्या प्रश्नाची सद्य:स्थिती काय आहे,
(२) सदर प्रकल्पास प्रशासकीय मान्यता केंव्हा प्रदान करण्यात आली आहे,
(३) नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुनील देशमुख, श्री. अजित पवार यांच्याकरिता** : (१) प्रकल्पाचे सखोल सर्वेक्षण पूर्ण झाले असून सांडवा कालवा व उपसिंचन योजने करीता विविध संकल्पने तपासून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात येत आहे.
(२) नाही.
(३) सदर प्रकल्प मेळघाट क्षेत्रातील दऱ्याखोऱ्यात प्रस्तावित असल्यामुळे या ठिकाणी सांडव्याचे संकल्पनासाठी योग्य जागा मिळण्यास अडचण येत आहे. तसेच कालव्याद्वारे सिंचन करणेस्तव योग्य संरेखा मिळत नसल्यामुळे खालील बाजूस उन्नयी बंधारे बांधून उपसा सिंचन केल्यास त्याचा खर्च जास्त येवून योजना असफल ठरत असल्यामुळे पर्यायी अभ्यास करण्यात येत आहे.

श्री. जी.एल. अैनापूरे : सभापती महोदय, प्रश्नाच्या उत्तरात म्हटले आहे की, विविध संकल्पने तपासून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात येत आहे. सदरहू अहवाल सादर करण्यासाठी शासनाने काही विशिष्ट कालावधी ठरवून दिला आहे काय ?

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, दीड महिन्याच्या आत सर्वेक्षण पूर्ण करुन प्रकल्प अहवाल ऑक्टोबर-नोव्हेंबरपर्यंत शासनाच्या मान्यतेसाठी पाठविण्यात येईल्.

---

....४



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 15848

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित )

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, कापसासारख्या महत्वाच्या विषयावर हा प्रश्न होता. तरीसुध्दा माननीय सदस्य अनुपस्थित आहेत. विषय महत्वाचा आहे. राज्य सरकारची भूमिका समजून घेणे आवश्यक होते. आम्ही तयारी करुन माहिती गोळा केली होती.

**सभापती** : माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी मला लेखी पत्र दिले असून ते माननीय राज्यपालांना भेटण्यासाठी जात असल्यामुळे उशीर होईल असे कळविले आहे.

---

यानंतर श्री.भारवि.

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**हडपसर (जि. पुणे) मगरपट्टयातील मजुरांच्या झोपडयांना लागलेली आग**

**(५) * १३१६१ डॉ. निलम गोऱ्हे , श्री. विलास अवचट :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील हडपसर मगरपट्टा येथील मजुरांच्या झोपडयांना दिनांक २४ जानेवारी,२००६ रोजी वा त्या सुमारास भीषण आग लागली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या आगीत दोन लहान मुलींसह एक महिला जळुन मरण पावली हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या आगीत किती झोपडया भस्मसात झाल्या आहेत,
(४) तसेच सदर ही आग लागण्यामागची कारणे काय आहेत,
(५) आग नुकसानग्रस्तांना शासनाने काही आर्थिक मदत केली आहे काय,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. पतंगराव कदम** : (१) होय. दिनांक २५ जानेवारी, २००६ रोजी आकस्मिक आग लागलेली होती.
(२) होय.
(३) सदर आगीत १२५ झोपड्या जळाल्या आहेत.
(४) सदरची आग आकस्मिकरित्या लागलेली असून आगीचे कारण अद्याप समजलेले नाही.
(५) व (६) सदर आगीने बाधीत झालेली कुटुंबे परराज्यातील असून बांधकाम व्यावसायीकाकडे तात्पूरते घर बांधून रहात आहेत. सदर बाधीत कुटुंबियाची संबंधित बांधकाम व्यावसायिकाने व्यवस्था केली असून सदरहू आपदग्रस्तांना मदत देय नसल्याने शासकीय मदत देण्यात आलेली नाही.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, पुणे येथील हडपसर परिसरामध्ये साधारणत: थंडीच्या मौसमात म्हणजे डिसेंबर- जानेवारी महिन्यामध्ये झोपडपट्टयांना आगी लागतात. या झोपटया गवताच्या असतात. अशा घटनांमुळे काही लोक मृत्युमुखी देखील पडतात. हडपसर मगरपट्टयातील झोपडपट्टयांना लागलेल्या आगीत दोन लहान मुलीसह एक महिला जळून मरण पावली आहे. सदरहू आपदग्रस्तांना मदत देय नसताना देखील या कुटुंबाचे पुनर्वसन झाले पाहिजे व त्यांना मदत केली पाहिजे. पुणे जिल्हयामध्ये आपत्ती व्यवस्थापन आराखडा आहे. त्यामुळे भविष्यात अशा आगी लागू नयेत म्हणून प्रतिबंधात्मक उपाय योजणे आवश्यक आहे. तसेच पुण्यामध्ये मोठया प्रमाणावर बांधकाम होत आहे. त्यासाठी ठेकेदार मजुरांना घेऊन येतात. सदर आग कशामुळे लागली आहे याचे कारण अद्याप समजले नाही असे शासनाने उत्तर दिलेले आहे. माझ्या माहितीप्रमाणे शॉर्टसर्किट झाल्यामुळे या झोपडयांना आगी लागल्या आहेत. ..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13161 ...

डॉ.नीलम गोऱ्हे...

तेव्हा या झोपडयांना आग कशामुळे लागली यासंबंधीची माहिती शासनाने घेतली आहे काय ? तसेच भविष्यात अशा आगी लागू नयेत म्हणून प्रतिबंधात्मक उपययोजना करण्यासाठी शासनाने सूचना दिल्या आहेत काय ? सभापती महोदय, गेल्या वर्षीसुध्दा कासेवाडी येथील झोपडयांना आग लागली होती. सभागृहामध्ये पुण्याचे पालकमंत्री देखील येथे बसलेले आहेत. तेव्हा त्यांनीसुध्दा याकडे लक्ष द्यावे.

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, हडपसर येथील मगरपट्टयातील मजूर हे कंत्राटदाराने परराज्यातून मजुरीकरिता आणले होते. त्यांच्या झोपडयांना आग लागल्यानंतर या मजुरांची तातडीने तात्पुरती व्यवस्था तेथे असलेल्या एका विद्यालयामध्ये करण्यात आली. तद्नंतर कंत्राटदाराने त्या मजुरांचे पर्यायी पुनर्वसन केलेले आहे.

श्री.विलास अवचट : सभापती महोदय, हडपसर येथे ज्या झोपडयांना आग लागली आहे,त्या झोपडया गवताच्या होत्या. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी पुणे येथे अनेक वेळा आगीच्या घटना घटतात असे सांगितले आहे. तेव्हा असे प्रकार का घडत आहेत यासंबंधीची माहिती शासनाने घ्यावी. मजुरांच्या झोपडया हया पक्क्या नसतात. त्यांच्या झोपडीचे छत गवताचे किंवा पत्र्याचे असते. तेव्हा जेथे मजूर राहतात, तेथे त्यांची हानी होऊ नये म्हणून निश्चित अशा सूचना कंत्राटदाराला शासन देणार आहे काय ?

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, कंत्राटदाराने परराज्यातून मजूर आणलेले आहेत. त्यांची व्यवस्था करण्याची जबाबदारी ही ठेकेदाराची असल्यामुळे तत्संबंधीच्या सूचना त्यांना देण्यात येतील.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, या घटनेमुळे जीवित आणि वित्तीय हानी झालेली आहे. या घटनेतील 'आपदग्रस्तांना मदत देय नसल्यामुळे शासकीय मदत देण्यात आली नाही', असे लेखी उत्तरामध्ये म्हटले आहे म्हणून मी आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीतील अनुक्रमांक 20 वरील लेखी उत्तराकडे शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. त्यात नमूद करण्यात आले आहे की, वित्त हानी झाली असून कोणत्याही प्रकारची जीवित हानी झाली नाही. तरी सुध्दा आपदग्रस्तांना रुपये 2,94,000/- इतके सानुग्रह अनुदानाचे वाटप करण्यात आलेले आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13161..

श्री.रामनाथ मोते...

परंतु, हडपसर येथील घटनेमध्ये जीवित आणि वित्त हानी झाली असतानासुध्दा शासनाने संबंधितांना कोणत्याही प्रकारची मदत न करण्याचे कारण काय आहे ?

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13161....

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, ठेकेदारांनी मजूर आणल्यामुळे त्या मजुरांना भरपाई देण्याची जबाबदारी त्या ठेकेदारांची असते. शासन मजुरांना नुकसान भरपाई देण्यासाठी ठेकेदारांना आदेश देऊ शकते. परंतु हडपसर येथील केसच्या संदर्भात "खास बाब" म्हणून जे मजूर मृत पावले आहेत त्यांच्या कुटुंबियांना शासनाकडून मदत दिली जाईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सन्माननीय मंत्री महोदयांनी माझ्या पहिल्या प्रश्नाच्या अनुषंगाने मृत मजुरांच्या कुटुंबियांना मदत देण्याचे जाहीर केले ही खरोखरच चांगली गोष्ट आहे. परंतु कासेवाडी येथे पूर्वी आग लागली होती. खरे म्हणजे हा वेगळा प्रश्न आहे. परंतु महत्वाचा प्रश्न असल्यामुळे मी विचारु इच्छिते की, त्या आगीमध्ये ज्या मजुरांच्या झोपडया जळून खाक झाल्या, त्यांचे किती दिवसांत पुनर्वसन केले जाणार आहे ? पुनर्वसन करण्याबाबतची कालमर्यादा माननीय मंत्री महोदय सांगतील काय ?

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, पुनर्वसनाच्या बाबत वेगवेगळया कॅटॅगिरी असतात. ठेकेदार जे मजूर घेऊन येतात त्यांचे पुनर्वसन ठेकेदाराकडून केले जावे ही सर्वसाधारण अपेक्षा आहे. ज्यावेळी हडपसर येथील मजुरांच्या झोपडयांना आग लागली त्यावेळी त्या ठेकेदाराने या मजुरांचे पुनर्वसन सर्वप्रथम शाळेमध्ये केले आणि त्यानंतर त्यांना सेमी-परमनंट झोपडया बांधून त्यांचे पुनर्वसन केले

-------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मु.पो. दातिवरे (ता. पालघर, जि. ठाणे) येथील बंधाऱ्याची दुरुस्ती करणेबाबत**

**(६) * १६६१४ डॉ. अशोक मोडक , श्री. मधुकर चव्हाण , श्रीमती संजीवनी रायकर , श्रीमती कांता नलावडे :** सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) लाभक्षेत्र विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मु.पो. दातिवरे (ता. पालघर, जि. ठाणे) या गावामध्ये वैतरणा नदीच्या पाण्याचा गावाला धोका पोहचू नये म्हणून ग्रामस्थांनी श्रमदानातून १९५५ मध्ये एक बंधारा बांधला होता, हे खरे आहे काय,

(२) सदर बंधारा नदीच्या व समुद्राची भरती येते त्या पाण्याने इतक्या वर्षात फुटल्याने पावसाळ्यात व समुद्राच्या भरतीच्या वेळी गावात पाणी शिरुन ग्रामस्थांचे वेळोवेळी नुकसान होते, हे खरे आहे काय,

(३) सदर बंधाऱ्याची डागडूजी त्वरीत करुन त्याचे मजबूतीकरण करावे अशी मागणी दातीवरे ग्रामपंचायत, सोसायटी ह्यांनी अनेक वेळा शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(४) दातीवरे गावाच्या उत्तरेस बांधण्यात आलेल्या कोळंबी प्रकल्पामुळे नदीचे पाणी अडले जात असून गावात नदीचे व समुद्राचे पाणी पूर्वीपेक्षा जास्त प्रमाणात येते, हे खरे आहे काय,

(५) ग्रामपंचायतीने व ग्रामस्थांनी वेळोवेळी दिलेल्या तक्रारीबाबत काय निर्णय घेण्यात आला वा येत आहे, नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ.सुनील देशमुख**, **श्री.अजित पवार यांच्याकरिता** : (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) नाही.

(५) या प्रकरणी बंधारा दुरुस्तीची आवश्यक कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर करण्यात येत आहे.

डॉ.अशोक मोडक : सभापती महोदय, या प्रश्नाच्या अनुषंगाने विचारण्यात आलेल्या पाच प्रश्नांचे मी दोन भाग करु इच्छितो.

खरे म्हणजे या गावात सातत्याने खाडीचे आणि समुद्राचे पाणी येत असल्यामुळे, घरांचे फाऊंडेशन कमकुवत होत आहे. त्या गावात मच्छिमारांना मासळी सुकविण्यासाठी देखील जागा राहिली नाही. तसेच जमीन नापिकी होण्याबरोबर, नैसर्गिक पाण्याचा स्त्रोत हिरावून गेल्यामुळे तेथील ग्रामस्थांना जीवन जगण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागत आहे. गेल्या 12 वर्षापासून हा प्रश्न त्यांना भेडसावत आहे. आपण प्रश्नाच्या अनुषंगाने उत्तर दिले आहे की, "या प्रकरणी बंधारा दुरुस्तीची आवश्यक कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर करण्यात येत आहे." त्यामुळे या प्रश्नांसंदर्भात स्थानिक नागरिकांनी वा ग्रामपंचायतीने आपल्याकडे तक्रार केली आहे काय ? असल्यास, या तक्रारीचे निवारण करण्यासाठी आतापर्यंत शासनाने काय उपाययोजना केल्या

आहेत ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.16614....

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, या बंधाऱ्याच्या दुरुस्तीसाठी 4.19 लाख रुपये खर्च करुन, दीड महिन्याच्या आत दुरुस्तीचे काम पूर्ण केले जाईल. पुन्हा असा प्रश्न ग्रामस्थांसमोर उपस्थित होणार नाही याबाबत काळजी घेतली जाईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या प्रश्नामध्ये प्रश्न क्र.4 च्या अनुषंगाने असे विचारण्यात आले होते की, "दातीवरे गावाच्या उत्तरेस बांधण्यात आलेल्या कोळंबी प्रकल्पामुळे नदीचे पाणी अडले जात असून, गावात नदीचे व समुद्राचे पाणी पूर्वीपेक्षा जास्त प्रमाणात येत आहे हे खरे आहे काय ?" या प्रश्नाला शासनाकडून "नाही" असे उत्तर देण्यात आले आहे. माझा मुख्य प्रश्न असा आहे की, कोळंबी प्रकल्प हा खाजगी जागेमध्ये आहे की, सरकारी जागेमध्ये आहे ? कारण हा प्रकल्प जर सरकारी जमिनीवर असेल तर, ज्यावेळी या प्रकल्पासाठी सरकारने जागा दिली असेल त्यावेळी, या गावच्या ग्रामपंचायतीचे किंवा ग्रामस्थांचे "ना-हरकत-प्रमाणपत्र" घेतले होते काय ?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, कोळंबी प्रकल्प हा त्या दातिवरे गावाच्या जवळ आहे. या प्रकल्पामुळे नदीचे पाणी अडून, गावामध्ये येते असे जे काही बोलले जात आहे तसे काही घडलेले नाही. 1955 साली दातिवरे गावातील नागरिकांनी श्रमदानातून बंधारा बांधला होता. हा बंधारा बराच जुना असल्यामुळे तो नंतर कमकुवत होत गेला ही वस्तुस्थिती आहे. आताच सन्माननीय राज्यमंत्री डॉ.सुनील देशमुख यांनी सांगितल्यानुसार या बंधाऱ्याच्या दुरुस्तीचे काम साडे-चार लाख रुपये खर्च करुन, एप्रिल अखेर अथवा 15 मेपर्यंत पूर्ण केले जाईल. या गावाला पुढे अशा प्रकारचा धोका होणार नाही याबाबत काळजी घेतली जाईल.

डॉ.अशोक मोडक : महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांनी या बंधाऱ्याची दुरुस्ती करण्यासाठी दीड महिन्याची कालमर्यादा दिली ही अभिनंदनीय बाब आहे. परंतु दिवे आगर येथे देखील अशाच प्रकारचा प्रश्न उद्भवलेला आहे.

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नंतर श्री.कांबळे....

**<u>ता.प्र.क्र.16614 ....</u>**

डॉ. अशोक मोडक ....

सभापती महोदय, कोळंबी प्रकल्प उभारल्यामुळे त्या गावात पाणी शिरण्याचा धोका उत्पन्न झाला आहे. या दातिवरे भागातसुध्दा कदाचित त्या घटनेची पुनरावृत्ती होऊ शकते, अशी माझी माहिती आहे. तरी, या संदर्भात पुन्हा आपण अधिक पडताळणी कराल काय ?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, संबंधित ठिकाणी टेक्निकल लोकांना पाठवून त्या संदर्भातील संपूर्ण माहिती घेतली जाईल आणि तशा प्रकारची कोणतीही अडचण होणार नाही याची खबरदारी घेतली जाईल.

----

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील विशेषत: ठाणे जिल्ह्यातील पडीत जमीन रो.ह.यो.फलोद्यान विकास कार्याक्रमातंर्गत जेटरोपा आणि करंज लागवड करण्याबाबत**

**(७) * १३२३५ श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. रमेश निकोसे , श्री. धनाजी साठे :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत: ठाणे जिल्ह्यातील पडीत जमिन विकास करण्याविषयी रोजगार हमी योजनेच्या फलोद्यान विकास कार्यक्रमातंर्गत जेटरोपा आणि करंज लागवड कार्यान्वित करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे दिनांक १५ जानेवारी, २००६ वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बाबतीत कोणता निर्णय घेण्यात आला वा घेण्याचे ठरविले आहे,

(३) सदर कार्याक्रमातंर्गतच्या उपायोजनेखाली प्रशासनाकडून कोणता ठोस कृती कार्यक्रम आखला गेला आहे,

(४) अद्याप, निर्णय घेण्यात आला नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत, सदर बाबतीत निर्णय किती कालावधीत अपेक्षित आहे ?

**श्री. राणा जगजितसिंह पाटील, श्री.हर्षवर्धन पाटील यांच्याकरिता** : (१) श्रमजीवी संघटना, महाराष्ट्र ठाणे यांचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) रोहयो अंतर्गत औषधी व सुगंधी वनस्पीती म्हणून करंज लागवडीचा समावेश यापूर्वीच या कार्यक्रमांतर्गत करण्यात आलेला आहे, आता जट्रोफाचा देखील समावेश करण्याचा धोरणात्मक निर्णय शासनाने दिनांक ८ डिसेंबर,२००५ च्या उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या शासन निर्णयाद्वारे घेतला आहे.

(३) जट्रोफा व करंज व तत्सम अखाद्य तेलबिया उत्पादन वनस्पतींची बायोडिझेल करिता लागवड रोहयो अंतर्गत फळझाड लागवड कार्यक्रमांतर्गत करण्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. गोविंदराव आदिक : सभापती महोदय, या ठिकाणी जट्रोफाची लागवड रोजगार हमी योजनेंतर्गत करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे ही एक अतिशय चांगली बाब आहे. तरी, त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. शासन एका बाजुला उत्तरामध्ये असा निर्णय घेतल्याचे सांगत आहे की, " जट्रोफा, करंज व तत्सम अखाद्य तेलबिया उत्पादन वनस्पतींची बायोडिझेलकरिता लागवड रोजगार हमी योजनेंतर्गत फळझाड योजनेंतर्गत करण्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे " सभापती महोदय, या दोन गोष्टीचा मेळ लागत नाही. एका बाजूला आपण असे म्हणत आहात की, निर्णय घेतला आहे, रोजगार हमी योजनेंतर्गत जट्रोफाची लागवड आता फळझाडांसारखीच करता येईल. पण दुसऱ्या बाजुला आपण त्यासंबंधी काही तरी कार्यवाही होणार आहे, असे म्हणत आहात. याचा नेमका अर्थ काय आहे ? कार्यवाही प्रत्यक्षात सुरु झाली आहे का ?

..3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र 13235**

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय सन 2001 साली करंजाच्या बाबतीत आपण निर्णय घेतलेला होता. आजपर्यंत साधारणत: 4 हेक्टरपर्यंतच लागवड होऊ शकली आहे. आपण दिनांक 8 डिसेंबर, 2005 ला " अपारंपारिक उर्जा स्त्रोत कार्यक्रम एकत्रित धोरण " असे धोरण जाहीर केले आहे. त्या अनुषंगाने जट्रोफासुध्दा रोजगार हमी योजनेत इन्क्लुड करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचप्रमाणे साधारणत: 3 लाख हेक्टर पडीक जमीन महाउर्जाकडे उपलब्ध करुन द्यायची, प्रत्येक रेव्हेन्यू सर्कलमध्ये सन 2006-2007 मध्ये, 10 हजार हेक्टर जमिनीवरती करंज, जट्रोफा व तत्सम अशा तेल बियाणांच्या वनस्पतींची लागवड करायची असा आपला निर्णय झालेला आहे. आता सद्य: परिस्थिती अशी आहे की, रोजगार हमी योजनेचे कॉस्ट नॉर्म्स ठरण्याचे फक्त बाकी आहे. तरी, येत्या आठवड्यामध्ये याबाबतचा निर्णय होईल. कारण तीन बाय दोनची लागवड, दोन बाय दोनची लागवड यांसाठी रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून अनुदान किती द्यायचे हे देखील ठरत आहे. तरी, या संदर्भात येत्या आठवड्यामध्ये निर्णय घेऊन लोकांना कळविला जाईल.

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, श्रमजीवी संघटनेकडून आपल्याला निवेदन प्राप्त झाले असल्याचे आपण म्हटले आहे. सभापती महोदय, माननीय खासदार श्री. दामू शिंगडा यांचेही पत्र आपल्याला मिळाले आहे. त्याची कॉपी माझ्याकडे आहे. तरी, या संदर्भात आपण खुलासा करणे आवश्यक आहे. कारण लोकप्रतिनिधीच्या पत्राला एक विशेष स्थान असते. त्याचप्रमाणे श्रमजीवी संघटनेने काही अपेक्षा व्यक्त केलेल्या आहेत. त्या अपेक्षा आपण पूर्ण करणार का ? आणि त्या अपेक्षा कोणत्या आहेत ? रोपांची उपलब्धता करणे, शेतकऱ्यांच्या जमिनीवर खड्डे खोदणे, पालापाचोळा व शेणखत भरणे, सेंद्रिय खत टाकण्यासाठी खड्डा करणे, झाडे लावणे, तणांचे निर्मुलन करणे, पावसाळ्यानंतर झाडांना पाणी देणे इत्यादी विविध कामांमधून रोजगार निर्मिती होणार आहे आणि त्यातून स्थानिक लोकांच्या बेकारीचा प्रश्न सुटणार आहे. खासदार श्री. दामु शिंगडा यांचे पत्र मिळाले की नाही ? मिळाले असेल तर, त्याचे उत्तर येथे का मिळाले नाही ? आणि श्रीमती विद्युलता पंडितांच्या पत्राबाबतही येथे उल्लेख आलेला नाही. तरी, याचा खुलासा करण्यात यावा. माझ्या या दोन प्रश्नांची उत्तरे आपण जरुर द्याल अशी मला खात्री आहे.

..4

**ता.प्र.क्र 13235**

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, खासदार साहेबांच्या पत्राचा उल्लेख येथे नाही ही वस्तुस्थिती आहे. तरी, या संदर्भातील माहिती घेऊन मी सदनापुढे ठेवीन. मार्गदर्शक सूचनाच्या संदर्भात मी आताच सांगितले की, आठवडाभरामध्ये आम्ही त्या मार्गदर्शक सूचना जारी करु. तिसऱ्या प्रश्नासंदर्भात मी आपणास असे सांगू इच्छितो की, ही इलेक्टीव्ह प्रोसिजर आहे. समजा एखाद्या शेतकऱ्याला किंवा जमीन धारकाला रोजगार हमी योजनेच्या माध्मातून त्याच्या क्षेत्रावर जट्रोफाची लागवड करायची असेल आणि त्यांनी जर तशाप्रकारे ते मान्य केले तर आपण ते रोजगार हमी योजनेच्या नॉर्म्समध्ये बसवून ती लागवड करुन घेऊ. सभापती महोदय, त्यामध्ये वेगवेगळ्या गोष्टी अंतर्भूत होतील. टेंपररी इरिगेशनची सोय, रोपांचे व फर्टिलायझरचे वाटप या सर्व गोष्टींच्या अनुषंगाने आपण धोरण जाहीर करु.

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13235....

श्री. रमेश निकोसे : सभापती महोदय, श्रमजीवी संघटना ठाणेच्या अध्यक्षा श्रीमती विद्युल्लता पंडीत यांनी दिनांक 02.02.2006 रोजी पत्र लिहिले त्यानंतर दुसरे पत्र दिनांक 26.12.2005 रोजी पाठविलेले आहे, त्यानंतर 15 जानेवारी, 2006 रोजी माननीय श्री.दामू शिंगडा खासदार यांनी पत्र पाठविलेले आहे. या पत्रांची नोंद घेऊन ठाणे जिल्हयातच नव्हे तर महाराष्ट्रातील कोणकोणत्या जिल्हयामध्ये ही योजना राबविण्यात येत आहे व त्या संदर्भातील शासनाचे धोरण काय राहणार आहे ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगितले की, प्रत्येक महसूल विभागामध्ये 10 हजार हेक्टरपर्यंत जेट्रोफाची लागवड पहिल्या वर्षात करावयाची आहे. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये सरासरी 3 लाख हेक्टर क्षेत्रावर लागवड करण्याचे धोरण शासनाचे आहे.

श्री. गोविंदराव आदिक : सभापती महोदय, जेट्रोफा हा विषय महाराष्ट्रातच नाही तर आता संपूर्ण देशामध्ये जिव्हाळयाचा विषय बनलेला आहे. इंधनाचा तुटवडा आणि वाढत्या किंमती लक्षात घेता जैविक इंधन वाढविण्याच्या दृष्टीने जेट्रोफाची लावगड मोठया प्रमाणात होणे आवश्यक आहे. परंतु दर एकरी जेट्रोफाचे उत्पन्न किती येते, यासंदर्भात एकमत झालेले नाही. जोपर्यंत प्रति एकरी किंवा प्रति हेक्टरी किती जेट्राफा बी मिळू शकते व त्यापासून किती तेल मिळेल आणि ते आपणास किफायतशीर ठरु शकते किंवा नाही याचा अंदाज आल्या शिवाय जेट्रोफाची लागवड मोठया प्रमाणात करण्याबाबत निर्णय घेऊन भागणार नाही. यासंदर्भात शासनाचा अभ्यास झालेला आहे काय ? जेट्रोफाची बागायती लावगड आणि जिरायती लागवड केली तर यातून किती उत्पन्न मिळू शकते यासंदर्भात सुध्दा माहिती घेणे आवश्यक आहे, यासंदर्भातील अभ्यास शासनाकडून इ ाालेला आहे काय ? यासंदर्भात सर्वेक्षण केलेले आहे काय ? शासनाकडे याबाबतीत काही निष्कर्ष आलेले आहेत काय ? असे असेल तर यासंदर्भात शासनाने काय धोरण ठरविलेले आहे ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अत्यंत महत्वाचा प्रश्न विचारलेला आहे. यासंदर्भात राज्यमंत्री महोदयांनी उत्तर देतांना सांगितले आहे की, "National Mission for bio-diesel - Bio- fuel through jetropha plantation" हे एक मिशन आपण आता हातामध्ये घेतलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री. गोविंदराव आदिक यांनी यापासून

......2....

श्री. हर्षवर्धन पाटील...

किती उत्पन्न होईल असा प्रश्न उपस्थित केलेला आहे. याबाबत आमच्याकडे प्राथमिक अंदाज असा आलेला आहे की, हेक्टरी अडीच मॅट्रीक टन इतके उत्पन्न होईल. गुजरात राज्यात तसेच दापोली कृषी विद्यापीठाने आपण कृषीमंत्री असातांनाच्या काळात एक अभ्यास गट गठीत केलेला होता. सन्माननीय लोकप्रतिनिधी व इतर काही संस्थांनी आमच्याकडे पत्राद्वारे ज्या शिफारशी केलेल्या आहेत त्या सर्वांचा विचार करुन लवकरच शासनाचे धोरण ठरविण्यात येत आहे. राज्यमंत्री महोदयांनी सांगितल्याप्रमाणे यासंदर्भातील निकष आम्ही लवकरात लवकर ठरवून जी.आर. काढणार आहोत. तसेच यामध्ये शासकीय पडीक जमिनींवर काही तरुण मुलांना जॉईंट कल्टीवेशन या नावाखाली किंवा त्यांनी तयार केलेले बायोडिझेल... मेनाच्या मार्फत सुध्दा आपण एक प्रस्ताव तयार करीत आहोत. नॉन कन्व्हेशन एनर्जीच्या माध्यमातून आज आपल्या देशामध्ये जवळपास 38 दशलक्ष टन डिझेलचा वापर होतो. भविष्य काळामध्ये पेट्रोल व डिझेलला पर्याय बायोडिझेलच्या माध्यमातून निर्माण होणार आहे. यासाठी हा सर्व अभ्यास होत आहे. ज्यावेळी आपण प्लँटेशन करण्यास परवानगी देऊ त्यावेळी त्याचे मार्केटिंग सुध्दा होणे अत्यंत आवश्यक आहे. एका बाजूला प्लँटेशन वाढवावयाची व दुसऱ्या बाजूला जर मार्केटिंगचा प्रश्न निर्माण झाला तर... म्हणून या सगळया गोष्टींचा विचार करण्यात येत आहे. तत्वत: सरकारने मान्यता दिलेली आहे. तरुण व सुशिक्षित मुलांना काम उपलब्ध करुन देणे तसेच त्याच भागातील शेतकऱ्यांसाठी एक योजना आपण तयार करीत आहोत, याबाबत सर्व निकष ठरवून येत्या 8 दिवसांमध्ये शासन निर्णय काढण्यात येईल.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, अत्यंत महत्वांच्या विषयावर चर्चा सुरु आहे. परवाच यशवंतराव चव्हाण सेंटरमध्ये सीएमडीव्ही ने एक सेमिनार आयोजित केला होता. याबाबतीत काही राज्य आपल्यापुढे गेलेली आहेत. छत्तीसगड येथील मुख्यमंत्री आपली गाडी बायोडिझेलवर चालवितात, त्यांच्याकडे डिझेल तयार नव्हते तर आमच्या नागपूर येथील प्लँटमधून त्यांनी 500 लिटर बोयोडिझेल नेले व त्यावर त्यांनी गाडी सुरु केली. आणि आज छत्तीसगड राज्य आपल्या राज्यापेक्षा खूप पुढे गेलेले आहे. हा एक विषय 50 लाख तरुणांना रोजगार देऊ शकतो.

.......3....

श्री. नितीन गडकरी......

"Co-generation, bio-gasification, solar energy and non-conventional energy" या चार विषयावर दोन्हीकडील सदस्य मिळून एक चांगला ठराव घ्यावा. यावर विस्तृत अशी चर्चा व्हावी हा एक विषय असा आहे की तो महाराष्ट्रातील गरिबी दूर करु शकतो. मंत्री महोदयांना मी एकच विनंती करतो की, डॉ. लिना मेंहदळे हया सामान्य प्रशासन विभागाच्या प्रधान सचिव आहेत त्यांनी केंद्र सरकारच्या पेट्रोलियम रिसर्च इन्स्टिटयूटच्या डायरेक्टर म्हणून गेल्या दोन-तीन वर्षामध्ये या क्षेत्रात देशातील उत्तम काम केलेले आहे.

यानंतर श्री. सांगळे...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MJS/ KGS/ MHM/ प्रथम श्री.विठ्ठल खर्चे ... 12:50

ता.प्र.क्र.13235 ...

श्री.नितीन गडकरी ...

सामान्य प्रशासन विभागामध्ये प्रधान सचिव पदावर कार्यरत असलेल्या श्रीमती मेहंदळे आय.ए.एस. कॅडरमधील आहेत. या संदर्भात माननीय अपारंपारिक मंत्री श्री.विनय कोरे यांना सुध्दा यामध्ये काम करण्याची इच्छा आहे. म्हणून महाराष्ट्रामध्ये जेवढया प्रमाणात वेस्ट लॅन्ड उपलब्ध आहेत तेवढया प्रमाणात रोजगार हमीतून कामे करायला पाहिजेत, परंतु याबाबत आवश्यक ती गती मिळालेली नाही. म्हणून माझी माननीय मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, याबाबतीत ॲक्शन प्लॅन तयार करण्याच्या बाबतीत काहीतरी टाईमबाऊंड करणे आवश्यक आहे. मी थोडया वेळापूर्वी चार एनर्जींची नावे सांगितलेली आहेत. यामध्ये बायो फ्युएल आहे, ज्यामध्ये बायो डिझेल येते. को-जनरेशनमध्ये वीज येते, या संदर्भात गावागावांमध्ये वीज प्रकल्प झाल्यास त्या ठिकाणी असलेला विजेचा प्रश्न सुटू शकेल व लाखो लोकांना रोजगार मिळू शकेल. त्याचबरोबर बायो-गॅसीफिकेशन व सोलर एनर्जी अशा चारही नॉन कन्व्हेशनल एनर्जीचे एकत्रित करुन, त्याबाबत अभ्यासगट स्थापन करुन, याबाबतचा ॲक्शन प्लॅन जाहीर करण्याच्या दृष्टीने शासनाने कार्यवाही करुन योग्य निर्णय घ्यावा अशी माझी शासनाला विनंती आहे.

श्री.हर्षवर्धन पाटील : या विषयी सभागृहामध्ये विस्तृतपणे चर्चा करण्याची शासनाची तयारी आहे. हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांना मी सांगू इच्छितो की, आपण दि.8/12/2005 रोजीचा जी.आर. वाचला तर त्यामध्ये अपारंपारिक उर्जा स्त्रोत एकत्रिकरणाचे धोरण तत्वत: मंत्रिमंडळाने मान्य केलेले आहे. या योजनेमध्ये लाखोंच्या संख्येने तरुणांना रोजगार उपलब्ध करुन देऊ शकतो, ही काळाची गरज आहे.

श्री.श्रीकांत जोशी : ज्या ठिकाणी कृषि खाते व रोजगार हमी योजना एकत्र आली अशा प्रकारच्या 90 टक्के भागांमध्ये दरडोई उत्पन्नामध्ये काहीच वाढ झालेली नाही. म्हणून मी या संदर्भात माननीय मंत्रिमहोदयांना मी दोन स्पेसिफिक प्रश्न विचारणार आहे. माझा पहिला प्रश्न आहे की, लागवडीचे क्षेत्र निश्चित होण्यापूर्वी पाण्याची उपलब्धता तपासली जाणार आहे काय ? तसेच ही पडीक जमीन खाजगी की सरकारी याबाबतचे निकष ठरविण्यात येणार आहेत काय ? तसेच जेट्रोफाच्या बीया गोळा करण्याचे अधिकार कोणाकडे असतात ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MJS/ KGS/ MHM/ प्रथम श्री.विठ्ठल खर्चे ... 12:50

ता.प्र.क्र.13235 ...

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, मी मघाशी सांगितल्याप्रमाणे या संदर्भात दोन प्रकारच्या कॅटेगरी ठरवण्यात येत आहेत. पहिली कॅटेगरी म्हणजे तरुण, सुशिक्षित बेकारांना शासकीय पडीक जमिनी देण्याचा कार्यक्रम राबवायचा. दुसरी कॅटेगरी म्हणजे ज्या शेतक-यांच्या जिरायती पट्टयात, डोंगरी भागात जमिनी आहेत, त्यांचे माती परीक्षण केल्यानंतर त्याचे कोणकोणत्या विभागामध्ये प्लॅटींग होऊ शकेल याबाबतचा निकष तयार करण्यात येत आहे. या विषयाच्या संदर्भात माननीय राज्यमंत्री महोदयांनी सांगितल्याप्रमाणे याबाबतचा एका आठवडयामध्ये जी.आर. इश्यु करु व त्यानंतर याबाबतची अंमलबजावणी करण्यास सुरुवात होईल.

-------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मध्ये दुरुस्ती करण्याबाबत**

**(८) * १४६५४ श्री. जितेंद्र आव्हाड , प्रा. जोगेंद्र कवाडे , श्री. लक्ष्मण जगताप , श्री. राजेंद्र जैन , श्री. जगन्नाथ शेवाळे , श्री. सदाशिवराव पोळ , प्रा. फौजीया खान , श्रीमती मंदा म्हात्रे , श्री. वसंतराव चव्हाण , डॉ. वसंत पवार : दिनांक १४ डिसेंबर, २००५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या दुसऱ्या यादीतील प्र.क्र. ५९२८ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांना कर्जाची सक्तीची वसुली, जप्ती, लिलाव थांबविण्यात येऊन व्याज दामदुपटीने घेऊ नये यासंदर्भात महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मध्ये दुरुस्ती करणेसाठी विधी व न्याय विभागामार्फत करण्यात येत असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, कार्यवाहीचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार पुढे कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) उक्त प्रश्न (१) मधील प्रकरणी अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ.पतंगराव कदम** : (१) होय.

(२) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम ४४ क मध्ये अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्याबाबतच्या विधेयकास मा.राज्यपाल यांनी संमती दिली असून "महाराष्ट्र शासन राजपत्रात'' दिनांक २५ ऑगस्ट २००५ रोजी "सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१'' प्रसिध्द करण्यात आला.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, मी माननीय सहकार मंत्र्यांना धन्यवाद देतो की, राज्यातील शेतक-यांना कर्जाची सक्तीची वसुली, जप्ती, लिलाव थांबविण्यात येऊन व्याज दामदुपटीने घेऊ नये यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, 1960 मधील कलम 44(क) मध्ये अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्याबाबतच्या विधेयकास माननीय राज्यपालांनी संमती दिली आहे. याबाबत महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.25 ऑगस्ट, 2005 रोजी सन 2005 चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक 41 प्रसिध्द करण्यात आला. परंतु अशाप्रकारची सुधारणा झाल्यानंतर सुध्दा राज्यातील शेतक-यांनी घेतलेल्या कर्जाचे सक्तीने वसुली, जप्ती, लिलाव व दामदुपटीने व्याज घेण्याचे प्रकार सातत्याने घडत आहेत. ही बाब खरी आहे काय, अशाप्रकारे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमामध्ये दुरुस्ती केल्यानंतर सुध्दा असे प्रकार घडत असतील तर हे प्रकार थांबवण्यासाठी शासन कठोरपणे कारवाई करणार आहे काय ?

( यानंतर श्री.सुंबरे ....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.14654 ...

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, कायद्यातील या दुरूस्तीनंतर देखील काही बँका किंवा काही वित्तीय संस्था अशा पद्धतीने कारवाई करीत असतील तर त्यासंबंधात कठोर निर्णय घेतला जाईल.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, या ठिकाणी शेतीवरील कर्जावरच ही सवलत लागू आहे की, शेतीच्या पूरक व्यवसायांसाठीच्या कर्जांवर देखील ही सवलत लागू आहे ?

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, शेती विषयी आणि शेतीच्या पूरक विषयीसुद्धा ही सवलत लागू राहील.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, आता मंत्री महोदयांनी सांगितले की, 25 ऑगस्ट 2005 रोजी हा अधिनियम अस्तित्वात आला आहे. तर तेव्हापासून अशा पद्धतीने काम करणाऱ्या किती लोकांवर कारवाई झालेली आहे की जे दामदुपटीने कर्ज वसूल करून घेत होते ?

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, तेव्हा पासून यासंबंधात कोणाकडूनही तक्रार आलेली नाही. तक्रार आल्यास जरूर कारवाई करू.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, कापसाचे पॅकेज जाहीर झाले त्यातील एक कलम पीक कर्जाच्या बाबतीत होते. आता या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना नामदार मंत्र्यांनी सांगितले की, शेतीविषयक तसेच शेतीच्या पूरक उद्योगांसाठी देखील हे लागू आहे. त्याचा जी.आर.देखील माझ्याकडे आहे. परंतु बँकांमध्ये चौकशी केली तर या जीआरच्या बाबतीत अजूनही त्यांच्याकडून कारवाई केलेली नाही वा करीत नाहीत. तेव्हा माझी आपल्याला हात जोडून नम्र विनंती आहे. सभापतींनी देखील आपल्याला सुचविले होते त्याप्रमाणे तुम्ही समिती नियुक्त केली होती. तेव्हा माझी आपणास विनंती आहे की, आपण कृपा करून या कामासाठी थोडा अधिक वेळ द्यावा. तुमचे निश्चितपणे महाराष्ट्रात नाव होईल. निश्चितपणे आपण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व्हाल. महाराष्ट्राचे शेतकरी तुम्हाला विसरणार नाहीत. आपण दिल्लीला देखील जाल. सहकार क्षेत्रातील वित्तीय संस्था शेतकऱ्यांकडून दामदुपटीने आज देखील कर्ज वसुली करीत आहेत. तेव्हा या संबंधातील सर्वंकष असे धोरण हे अधिवेशन संपण्यापूर्वी आपण जाहीर करावे. तसे केल्यास, लाखो शेतकरी आत्महत्या करण्यापासून वाचतील. तेव्हा अत्यंत गंभीरपणे आपण हे धोरण जाहीर कराल का ?

...... एए 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, नागपूरच्या अधिवेशनामध्ये हा प्रश्न या विधान परिषदेमध्येच चर्चेला आला असताना मी निरनिराळ्या पक्षाच्या नेत्यांची एक समिती नेमली होती आणि त्याचाच परिपाक म्हणून शेतकऱ्यांना 6 टक्के व्याजाने कर्ज देण्याचा निर्णय त्या समितीमध्ये घेण्यात आला. सन्माननीय सदस्य श्री. गडकरी साहेब त्या बैठकीमध्ये नव्हते, पण सन्माननीय सदस्य श्री.अवचट साहेब होते. तेव्हा खरीप हंगामापासून शेतकऱ्यांना 6 टक्के दराने कर्ज दिले जाईल असा अतिशय धोरणात्मक आणि पुरोगामी निर्णय या समितीमध्ये घेऊन तो आपण जाहीर केलेला आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, विदर्भ-मराठवाड्यात आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या आणि परिस्थिती पाहिल्यानंतर हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आणि मौलिक आहे यात शंका नाही. आता माननीय मंत्री महोदय मुख्यमंत्री कधी होणार वगैरे भाग वेगळा आहे. अर्थात ते मुख्यमंत्री झाले तर आम्हाला आनंद आहेच आणि आमच्या सर्वांच्या त्यासाठी आपल्याला सदिच्छा जरूर आहेत. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.कवाडे साहेबांनी बरोबर प्रश्न विचारला होता. त्यांनी विचारले होते की, राजपत्रात आपला हा आदेश निघाल्यानंतरही काही बँका दामदुपटीने वसुली करीत आहेत. तेव्हा याबाबत तक्रारी आल्या नाहीत, आल्यास आम्ही दखल घेऊ अशा प्रकारची जी उत्तरे आपण दिली तशी उत्तरे कृपा करून आपण देऊ नयेत. शासनाकडून प्रत्येक वेळी अशीच उत्तरे दिली जातात. आत्महत्येसंबंधात प्रश्न विचारला तरी त्याबाबत तक्रार आली नाही, सावकारांच्याबाबतीत विचारले तरी त्याबाबत तक्रार आलेली नाही असे उत्तर दिले जाते. पण शेवटी सरकार म्हणून आपण सू मोटो काही कारवाई करीत नाही तोपर्यंत लोकांनाही दिलासा मिळणार नाही. यवतमाळमध्ये आपल्याच पक्षाच्या एका प्रबळ नेता आहे तो लोकांना तक्रार करू देत नाही. तेव्हा आता आपण जाहीर केल्याप्रमाणे 2-4 नावे सांगा आणि त्याबाबत कोणती कडक कारवाई करणार ते नेमके सांगा.

( यानंतर श्री.सरफरे .... बीबी 1 ..

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्रक. 14654...

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, यासंबंधीचा प्रश्न या विधान परिषदेमध्ये उपस्थित झ ााल्यामुळे शासनाने हा महत्वाचा निर्णय घेतलेला आहे. सन्माननीय सदस्य व भारतीय जनता पार्टीचे अध्यक्ष श्री. नितीन गडकरी व शिवसेनेचे नेते माननीय श्री.दिवाकर रावते यांनी केलेल्या सूचनेप्रमाणे आढावा बैठक घेण्यात येईल. तसेच, दोन्ही नेत्यांची एकत्र बैठक घेण्यात येईल. सहा टक्के व्याजाचा निर्णय येत्या खरीप हंगामापासून अंमलात आणण्यात येणार आहे. तसेच, ज्या बँकांनी शासनाच्या जी.आर. ची अंमलबजावणी केली नसेल तर त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, महाराष्ट्राच्या सहकार खात्याने शेतकऱ्यांसाठी हा जो 6 टक्क्के व्याजाचा क्रांतिकारक निर्णय घेतला आहे त्याबद्दल महाराष्ट्रातील जनता या शासनाला निश्चितपणे धन्यवाद देईल. कायद्यामध्ये दुरुस्ती झाल्यानंतरही दामदुपटीने व्याजाची वसूली करण्याचे प्रकार होऊ नयेत यासाठी आपण भू विकास बँक व इतर बँकांना आदेश दिले आहेत कां? आदेश दिले असतील तर ते केव्हा दिले? त्या आदेशाचे पालन बँका करीत आहेत की नाहीत?

डॉ. पतंगराव कदम : बँकानी या कायद्यातील दुरुस्तीचे पालन करावे यासाठी आदेश काढले जातील. आणि ज्यांनी पालन केले नसेल तर त्यांच्याविरुध्द कारवाई केली जाईल.

श्री. विजयराव शिंदे : सभापती महोदय, शासनाने 6 टक्के व्याज दराने कर्ज देण्याचे मान्य केल्याबद्दल अभिनंदन करतो. दामदुपटीच्या व्याजाच्या बाबतीत विचार करीत असतांना जे पिक कर्ज घेण्यात आले त्याबाबतही विचार केला जावा. ज्या शेतकऱ्यांनी इतर बँकाकडून मध्यम व दीर्घ मुदतीची कर्जे घेतली आहेत. विशेषत: सिंचन योजनेसाठी कर्ज घेतले आहे अशा कर्जाच्या बाबतीत बँकाकडून आपल्या आदेशाची अंमलबजावणी केली जात नाही. त्याबाबत शासन निर्णय घेईल काय?

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, ही बाब तपासून निर्णय घेण्यात येईल.

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, 1 लाखापर्यंतच्या कर्जावर दामदुपटीपेक्षा जास्त व्याज घेऊ नये अशाप्रकारची दुरुस्ती कायद्यात केली आहे. ज्या छोटया शेतकऱ्यांनी एकत्र येऊन पाणी पुरवठा सहकारी संस्था निर्माण केल्या आहेत व पाणी पुरवठा योजनेसाठी त्यांनी कर्ज घेतले आहे. अशा शेतकऱ्यांचे एकत्रित कर्ज 1 लाखापेक्षा अधिक होते.परंतु प्रत्येकाचा हिस्सा विचारात घेतला तर तो 1 लाखाच्या मर्यादेपर्यत येऊ शकतो. आणि म्हणून अशा छोटया शेतकऱ्यांनी एकत्र येऊन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्रक. 14654...

प्रा. शरद पाटील...

संस्था निर्माण करुन पाणी पुरवठा योजनेसाठी घेतलेल्या कर्जावरील व्याज मुद्दलापेक्षा जास्त आकारता येणार नाही अशाप्रकारचा निर्णय आपण घेणार काय?

डॉ. पतंगराव कदम : छोटया शेतकऱ्यांनी एकत्र येऊन अशाप्रकारच्या संस्था निर्माण केल्यानंतर त्यांनी घेतलेले कर्ज हे प्रतिमाणशी 1 लाख रुपये गृहीत धरुन अशा संस्थांना सुध्दा हा निर्णय लागू करु.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाला उत्तर मिळाले नाही. दामदुपटीने व्याज घेऊ नये अशाप्रकारचे आदेश भू विकास बँक व इतर बँकांना शासनाने दिले आहेत काय?

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, शासनाने सर्वच बँकांना आदेश दिले आहेत.

**सभापती** : प्रश्नोत्तरांचा तास संपलेला आहे.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**औचित्याच्या मुद्दयासंबंधी**

श्रीमती संजीवनी रायकर : सभापती महोदय, मला औचित्याचा मुद्दा उपस्थित करावयाचा आहे. गेल्या दोन-तीन दिवसांपासून वर्तमानपत्रामध्ये एकच बातमी छापून येत आहे. काल लोकसत्तेमध्ये आली, आज महाराष्ट्र टाईम्समध्ये आली यापूर्वी पुण्यनगरीमध्ये आली. माननीय शिक्षण मंत्र्यांनी आश्वासन दिले आहे की, शाळांतील तुकडया कमी केल्या जाणार नाहीत. इतकेच नव्हेतर प्रत्येक तासिकेमागे 20 रुपयेऐवजी 75 रुपये देण्याचे मान्य केले आहे. दोन दिवसांपासून 20 रुपयांचे 50 रुपये करण्याबाबत विचार असल्याचे वर्तमानपत्रामध्ये छापून येत आहे. याबाबत तत्कालीन शिक्षणमंत्री श्री. अनिस अहमद व राज्यमंत्री श्री. शिंगणे यांनी आश्वासन दिले होते. तरीसुध्दा पुन्हा पुन्हा ही बाब विचाराधीन असल्याचे सांगितले जात आहे. तेव्हा याबाबत शासनातर्फे खुलासा व्हावा ही विनंती आहे.

(यानंतर श्री.किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ D/ MAP/ पूर्वी श्री.सरफरे... 13:05

श्रीमती संजीवनी रायकर (पुढे सुरु....

त्यांना 50 रुपये तर दिले नाहीतच. पण एकदम आपण 75 रुपये जाहीर केले. कदाचित शिक्षण मंत्र्यांनी आश्वासन दिले नसेलही. त्यांनी तसे आश्वासन दिलेले नाही व चुकीची बातमी छापून आलेली आहे, म्हणून तसे वर्तमानपत्रामध्ये जाहीर करावे, कारण रोज लोक आम्हाला विचारतात की, 20 रुपयाचे 75 रुपये झाले काय ? याबाबत शिक्षण मंत्र्यांनी खुलासा करावा. अधिवेशन सुरु असतांना, बाहेर अशाप्रकारचे आश्वासन देणे योग्य आहे काय ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर यांनी उपस्थित केलेला मुद्दा रास्त आहे. एका संघटनेच्या पदाधिकाऱ्यांबरोबर फक्त चर्चा झाली. याबाबतीत सगळे मुद्दे केवळ विचाराधीन आहेत, त्याबाबतीत कोणताही निर्णय झालेला नाही, अशाप्रकारचा मी खुलासा करतो.

--

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आपल्या परवानगीने मी औचित्याचा मुद्दा मांडतो. प्रघात आणि कायद्याचे जे संकेत आहेत, त्यानुसार ज्या महिलेवर बलात्कार झालेला आहे, तिचे नाव प्रसिध्द करु नये, अशाप्रकारचा नियम सगळीकडे पाळला जात असतो. त्या मागचा हेतू हा आहे की, त्या व्यक्तीची ओळख चार-चौघांसमोर, समाजासमोर समोर आली तर त्या स्त्रीला नंतर जीवन जगणे, अजून अडचणीचे होऊ शकते. बलात्कार जरी घडला नाही तरी त्या महिलेला विवस्त्र करुन तिची धिंड काढण्याचे दोन प्रकार नुकतेच महाराष्ट्रामध्ये घडलेले आहेत. त्यापैकी सोलापूर जिल्ह्यामध्ये महिलेची धिंड काढण्यात आली आणि बीड जिल्ह्यामध्ये देखील अशाच प्रकारे स्त्रीला विवस्त्र करुन, तिची धिंड काढण्याचा प्रकार घडलेला आहे. सभापती महोदय, ज्यावेळेला अशाप्रकारे महिलेची धिंड काढण्यात येते, त्यावेळेला खरे तर तिचे नाव वर्तमानपत्रामध्ये देखील प्रसिध्द होता कामा नये. दुर्दैवाने, या सोलापूरच्या घटनेमध्ये त्या महिलेचे नाव...ते रेकॉर्डवर परत येऊ नये म्हणून घेत नाही. परंतु काही वृत्तपत्रामध्ये तिचे नाव वारंवार प्रसिध्द करण्यात येत आहे. याबद्दल सोलापूरमध्ये देखील सोलापूरच्या "दै.लोकमत"मध्ये यापूर्वी त्या महिलेचे नाव प्रसिध्द झाले होते. त्याबाबत तेथील महिला कार्यकर्त्यांनी तक्रार केलेली होती. आज देखील मुंबईतील "दै.लोकमत"मध्ये संबंधित महिलेचे नाव प्रकाशित करण्यात आलेले आहे. सभापती महोदय, आमची आपल्यामार्फत विनंती आहे की, महिलेचे नाव दुसरे दिलेले असते किंवा कंसामध्ये हे टोपण नाव असे म्हटलेले असते. जेणे करुन, त्याच नावाची दुसरी व्यक्ती असेल, तीच ती नाही ना ? असा



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ D/ MAP/

डॉ.नीलम गोऱ्हे (पुढे सुरु....

संभ्रम तयार होऊ नये. म्हणून बीड आणि सोलापूर येथे ज्या घटना घडलेल्या आहेत, त्या पार्श्वभूमीवर आणि एकूणच ज्यावेळेला स्त्रीची अप्रतिष्ठ करणारे प्रसंग घडलेले असतात, त्यामध्ये नाव प्रसिध्द होता कामा नये. या उलट हुंडाबळी किंवा संशयास्पद मृत्यू अशा प्रसंगी नाव प्रसिध्द होणे अपरिहार्य ठरत असते. म्हणून आमची अशी विनंती आहे की, वृत्तपत्रांमध्ये संबंधित महिलेचे नाव विवस्त्र करण्याच्या घटनेमध्ये प्रसिध्द होणार नाही, याची दक्षता घ्यावी. दुसरा भाग असा की, काही वाहिन्यांवरुन तिचे घर, तिचे नातेवाईक, तिची मुले-बाळे अशांचे चेहरे चॅनेलवर दाखविले जातात, जेणे करुन, तिचा जरी चेहरा समोर आला नाही, तरी देखील तिचे नातेवाईक कोण आहेत, यावरुन ती कोण व्यक्ती आहे याबाबत आसपासच्या लोकांना सुगावा लागू शकतो. म्हणून वाहिन्या आणि वृत्तपत्रांनी याबाबतच्या जबाबदारीचे पालन करावे आणि स्त्रीची अजून अप्रतिष्ठा जाहीररित्या होणार नाही, याबद्दलची दक्षता घ्यावी, अशी मी औचित्याच्या मुद्याद्वारे लक्ष वेधू इच्छिते.

**सभापती** : हा औचित्याचा मुद्दा गंभीर स्वरुपाचा आहे. या अनुषंगाने यापूर्वी देखील अशा प्रकारची नोंद घेतलेली आहे. बलात्काराची केस असेल किंवा सन्माननीय सदस्या श्रीमती नीलमताई गोऱ्हे यांनी उपस्थित केल्याप्रमाणे महिलेची धिंड काढली असेल.. असे प्रकार होत असतांना, त्या स्त्रीचे नाव प्रसिध्द होणे, हे योग्य आहे असे मला वाटत नाही. नावाबाबत कोणत्याही त्या स्त्रीचे नाव न घालता कंसामध्ये टोपण नावानेच ती बातमी प्रसिध्द केली पाहिजे. या अनुषंगाने शासनाने जे काही नियमाप्रमाणे करणे आवश्यक आहे, ते करण्याच्या दृष्टीने संबंधित मंत्री महोदयांनी प्रसिध्दी विभागाशी चर्चा करावी.

प्रा.वसंत पुरके : ठीक आहे.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. या जटील समस्येच्या संदर्भात औचित्याचा मुद्दा मांडण्याची अनुमती मी आपल्याकडे मागितली आणि आपण मला ती अनुमती दिली त्याबद्दल मी आपल्याला मनापासून धन्यवाद देतो. सभापती महोदय, बुलढाण्यामध्ये एस.टी. मध्ये कर्मचाऱ्यांच्या नेमणुका झाल्या. त्या ठिकाणी जे ड्रायव्हर आणि कंडक्टर नियुक्त झालेले आहेत ते त्या ठिकाणी उपोषणाला बसलेले आहेत. बाकीच्या डिव्हीजनमध्ये अशा प्रकारे नेमणुका झालेले जे कर्मचारी होते त्यांना नियमित केले गेले परंतु बुलढाण्यामध्ये मात्र त्यांना नियमित करीत नाहीत. त्या ठिकाणी गरज नसताना बाजूच्या डिव्हीजनमधील लोकांना आणले जाते. त्यामुळे तेथील कर्मचारी उपोषणाला बसलेले आहेत. त्यातील दोघांची प्रकृती अत्यवस्थ असून त्यांना रुग्णालयामध्ये दाखल केलेले आहे. शासनाने याबाबतीत लक्ष घालून त्या कर्मचाऱ्यांना न्याय द्यावा आणि त्यांचे उपोषण संपावे यासाठी तातडीने कार्यवाही करावी.

**सभापती** : सन्माननीय मंत्रिमहोदय श्री. वसंत पुरके यांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी एस.टी. च्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत जो औचित्याचा मुद्दा मांडलेला आहे त्याबाबत परिवहन विभागाने नोंद घ्यावी.

प्रा. वसंत पुरके : ठीक आहे.

-------

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. या ठिकाणी एक गंभीर घटना घडलेली आहे. आपण मला बोलण्यासाठी दोन मिनिटांचा वेळ द्यावा. सन्माननीय अर्थ राज्यमंत्री सभागृहामध्ये उपस्थित आहेत. काल मी विचारले होते की, 1941 कोटीच्या बजेटमध्ये 3100 कोटी रुपये एवढा जादा खर्च केला. 1200 कोटी रुपये कोठून आले ? त्याला विधिमंडळाची परवानगी होती की नाही ? यामध्ये माननीय राज्यपालांचे निर्देश पाळले की नाही ? सभापती महोदय, मला जी कळलेली गोष्ट आहे ती यापेक्षा भयानक आहे. रोज मी काय काय मुद्दा उपस्थित करतो त्याची मजाकबाजी सुरु आहे काय ? हे कळत नाही. हे पैसे देण्याच्या बाबतीत जी फाईल मूव्ह झाली त्या फाईलवर या पैशाच्या बाबतीत माननीय मुख्यमंत्र्यांनी असे लिहिले आहे की, हे पैसे माननीय राज्यपालांच्या निर्देशाप्रमाणे वाटण्यात यावेत आणि माननीय मुख्यमंत्र्यांनी जे लिहिले त्याला कचऱ्याची टोपली दाखविणारी ही कोण पॉवरफूल व्यक्ती आहे ? मी जबाबदारीने माहिती घेऊन सांगत आहे. माननीय मुख्यमंत्र्यांच्या आदेशाला देखील केराची टोपली दाखवली आणि पैशाचे वाटप मनाला येईल त्याप्रमाणे केले जाते ही गंभीर गोष्ट आहे. सभापती महोदय, पहिल्यांदा माननीय मुख्यमंत्री शपथ घेतात. उपमुख्यमंत्रीपद हे घटनात्मक पद नाही. तेही मंत्रीच आहेत. माननीय उपमुख्यमंत्र्यांची आणि मंत्र्यांची नेमणूक करण्याचा अधिकार माननीय मुख्यमंत्र्यांना आहे. कोणी कोणी मंत्रीपदाची शपथ घ्यावी यासाठी माननीय मुख्यमंत्री माननीय राज्यपालांकडे यादी पाठवितात. त्या सर्वांना ओव्हर-रुल करण्याचा अधिकार माननीय मुख्यमंत्र्यांना आहे. त्याचे आदेश पाळले जातात. परंतु यामध्ये कॉन्स्टिटयूशनचे व्हायोलेशन झालेले आहे. विधिमंडळाने जे नियम केलेले आहेत त्याचे व्हायोलेशन झालेले आहे आणि माननीय मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या निदेशाचे, त्यांच्या अधिकाराचे व्हायोलेशन झालेले आहे. सभागृहामध्ये काय चालले आहे हे आपण सांगावे. आम्ही पानटपरीवर बसलेलो आहोत काय ? आम्ही चौकामध्ये गप्पा मारण्यासाठी बसलेलो आहोत काय ? ही गंभीर बाब आहे. मी जबाबदारीने आरोप करतो. या विषयावर माननीय मुख्यमंत्र्यांनी निदेश दिल्यानंतर त्या फाईलला केराची टोपली दाखवून आपल्या मनाप्रमाणे पैसे वाटले गेले ही वस्तुस्थिती आहे. याबाबतीत शासनाने ताबडतोब निवेदन करावे असे निदेश आपण शासनाला द्यावेत अशी माझी विनंती आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MAP/

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, एका अतिशय गंभीर अशा कॉन्स्टिट्यूशनल क्रायसेसमधून हे राज्य जात आहे. गेली तीन वर्षे या सभागृहामध्ये आम्ही कशासाठी भांडत आहोत ? जे घटनात्मक निर्देश इश्यू झाले त्याची प्रत आम्हाला द्यावी. सभापती महोदय, या वर्षीची प्रत आपल्याला तरी मिळाली आहे काय ? या वर्षीचे अंदाजपत्रक सादर झाले त्याच्या बरोबर ही प्रत मिळावयास पाहिजे पण ती मिळाली नाही. How faithfully the Government has implemented the directives of the Hon. Governor ? त्याचा अनुपालन अहवाल द्यावा. दरवर्षी आम्ही भांडतो. परंतु तो अनुपालन अहवाल निदान आपल्याला तरी मिळाला आहे काय ? आम्हाला तो अहवाल मिळालेला नाही. आता सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी अत्यंत गंभीर माहिती सभागृहासमोर सांगितलेली आहे. ती माहिती अशी आहे की, राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी आदेश देऊन सुध्दा त्याचे पालन झालेले नाही. ही अत्यंत लाजिरवाणी गोष्ट आहे. माझ ो असे म्हणणे आहे की, महाराष्ट्रातील जवळजवळ तीनचतुर्थांश भागाला तुडवून राज्याचा विकास होणार असेल तर ही गोष्ट अत्यंत आक्षेपार्ह आहे. म्हणून याबाबतीमध्ये ही कागदपत्रे दाखल होणे आवश्यक आहे. त्याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे अशी माझी मागणी आहे.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MAP/ D/ पूर्वी श्री. बरवड 13:15

श्री. पांडुरंग फुंडकर : याठिकाणी माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी अतिशय गंभीर मुद्दा उपस्थित केलेला आहे. विदर्भ, मराठवाडा, कोकण, खानदेश या भागातील बॅकलॉग संबंधी माननीय राज्यपालांनी मागील तीन-चार वर्षापूर्वी निर्देश दिलेले असताना ते निर्देश पाळले जात नाहीत, घटनेच्या अनुच्छेद 371(2)चे पालन केले जात नाही, मराठवाडा, विदर्भाच्या बॅकलॉग संबंधातील आदेश पाळले जात नाहीत, त्यामुळे या राज्यामध्ये लोकशाही आहे की नाही असा प्रश्न निर्माण झालेला आहे. माननीय सदस्यांनी आणखीन एक गंभीर बाब या सदनामध्ये मांडलेली आहे. काल सभागृहामध्ये जो मुद्दा माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी उपस्थित केला त्याबाबतचा खुलासा अद्याप झालेला नाही. 1200 कोटी रु.चे काय झाले ? माननीय राज्यपालांच्या निर्देशानुसार निधीचे वाटप केले पाहिजे असे माननीय मुख्यमंत्र्यांनी फाईलवर लिहिलेले असताना त्यांचे आदेश पाळले गेले नाहीत. ही बाब अतिशय गंभीर आहे. या राज्यामध्ये प्रतिमुख्यमंत्री काम करीत आहे की काय अशी परिस्थिती दिसते. हा विषय अतिशय गंभीर असल्यामुळे माननीय मुख्यमंत्र्यांना बोलावून त्यांनी याठिकाणी निवेदन केले तरच या मुद्याचा खुलासा होऊ शकतो अन्यथा तो होऊ शकणार नाही. तेव्हा माननीय मुख्यमंत्र्यांना येथे बोलावून त्यांना याबाबतीत निवेदन करण्यास सांगावे अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : या सभागृहामध्ये अतिशय महत्वाचे असे दोन प्रश्न उपस्थित झालेले आहेत. हे राज्य कोणाच्या आदेशाने, कोणत्या घटनेप्रमाणे चाललेले आहे हे समजण्याची आवश्यकता आहे. हे राज्य घटनेप्रमाणे चालत असेल तर माननीय राज्यापालांनी या वर्षी जे डायरेक्टीव्हज दिलेले आहेत त्याची एक प्रत सभागृहातील सर्व माननीय सदस्यांना मिळण्याची आवश्यकता आहे. या अधिवेशनाला ज्या दिवशी सुरुवात झाली त्याच दिवशी या डायरेक्टीव्हज्ची मागणी केलेली होती. आतापर्यन्त आम्हाला डायरेक्टीव्हजची प्रत मिळालेली नाही. आता माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी जो गंभीर विषय मांडला तो सत्य नसावा असे मी मानतो, परंतु तो जर सत्य असेल तर ती बाब अतिशय गंभीर आहे. सभापती महोदय, माझी आपणास विनंती आहे की, आपण निदेश देऊन माननीय मुख्यमंत्र्यांना याठिकाणी बोलावून घेऊन याबाबतीतील सत्य शोधण्याची आवश्यकता आहे. हे राज्य घटनेप्रमाणो चालत असेल तर त्यादृष्टीने दोन गोष्टी अतिशय महत्वाच्या आहेत. याठिकाणी माननीय मुख्यमंत्री हे घटनेप्रमाणे स्थानापन्न झालेले आहेत.

..2..

(श्री. मधुकर सरपोतदार...)

माननीय मुख्यमंत्र्यांना घटनेप्रमाणे अधिकार प्राप्त झालेले आहेत. यादृष्टीकोनातून याठिकाणी खुलासा होण्याची आवश्यकता आहे. या सदनामध्ये बसलेले माननीय सदस्य घटनेचा मान ठेवतात. परमेश्वरापेक्षा घटनेची शपथ ही महत्वाची आहे, हे सभापती महोदय, आपणही जाणता. या ठिकाणी कोणतीही शपथ घटनेला स्मरुन घेतली जाते. तेव्हा माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी उपस्थित केलेल्या मुद्यावर माननीय मुख्यमंत्र्यांना येथे बोलावून त्यांच्याकडून खुलासा करुन घ्यावा आणि माननीय राज्यपालांच्या निर्देशांची प्रत आम्हाला द्यावी अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. जयंत प्र.पाटील : या सदनाचे सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी जी वस्तुस्थिती सभागृहामध्ये सांगितली ती या सदनाच्या आणि राज्याच्या दृष्टीने भूषणावह नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी सही करुन आदेश दिलेले असताना सुध्दा त्या आदेशांची अंमलबजावणी अधिका-यांनी केलेली नाही. जे अधिकारी सगळया फाईल्स अडवून ठेवतात त्या अधिका-यांना माननीय मुख्यमंत्र्यांनी आदेश देऊन देखील त्या आदेशांचे पालन न करता पैशाचे वाटप केले असेल तर त्याबाबतीत चौकशी करुन संबंधित अधिका-यांवर योग्य ती कारवाई झाली पाहिजे. माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी उपस्थित केलेल्या मुद्याला मी पाठिंबा देत आहे.

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सदनाचे कामकाज घटनादत्त चालावे ही सर्वांची जबाबदारी आहे. तसे जर चालत नसेल तर याबाबतीत योग्य ती दखल घेणे ही आपली जबाबदारी आहे. मी नेहमी सांगत असतो की सभापती महोदय,आम्हांला संरक्षण द्या. नुकतेच आम्ही माननीय राज्यपाल महोदयांना भेटून आलो. उद्विग्नता इतकी तीव्र होती की 2002-03,2003-04 आणि 2004-05 अशी तीन वर्षे आम्ही सतत या विषयाबाबत सभागृहात आंदोलन केले. राज्यपालांच्या निदेशाप्रमाणे मागास भागाला निधी उपलब्ध करुन द्या. परंतु गेली तीन वर्षे राज्यपालांचे निदेश डावलण्याचा प्रयत्न झाल. मागील वेळेस राज्यपालांना पाठविलेले साधे पत्र दाखविले आणि निर्देश बदलले. आम्हांला ॲडव्होकेट जनरलचे मत मान्य करावे लागले. अर्थसंकल्पीय तरतुदी येतात त्यावर सही करतात म्हणजे तुमची जबाबदारी येते यापुढे आमचे आंदोलन तुमच्या दरबारात राहील असे आम्ही राज्यपाल महोदयांना सांगितले आहे. याबाबतीत मी एवढेच सांगतो की, मुख्यमंत्री महोदय सभागृहात येऊन यासंदर्भातील सत्यता सांगत नाहीत तोपर्यंत सभागृहाचे कामकाज चालवू नये असे आम्हांला वाटते. आम्हांला आपली मदत हवी आहे. हे सभागृह ताबडतोब तहकूब करावे आणि मुख्यमत्र्यांना बोलावून निवेदन करण्यास सांगावे. मुख्यमत्र्यांना कोणी जुमानत नसेल आणि त्यांचे आदेश कोणी पाळत नसेल तर हे राज्य चालविण्यास सरकार नालायक आहे. सत्य काय आहे ते बाहेर येऊ द्या पुढील सोपस्कार आम्ही करतो. सभापती महोदय, या प्रकरणामध्ये घटनेचे अवमूल्यन होत असेल तर आम्हांला संरक्षण द्या. हे सभागृह ताबडतोब तहकूब करा अशी मी आपल्याला विनंती करतो.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी भाषण करताना "नालायक" हा जो असंसदीय शब्द वापरला आहे तो मी सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकत आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, हे सरकार कायद्याप्रमाणे चालत नाही,घटना पाळत नाही मुख्यमंत्र्यांचे आदेश पाळत नाही तर या सरकारला कोणता शब्द वापरावा हे आपण सांगावे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय,या अधिवेशनामध्ये हा अतिशय संवेदनशील विषय सदनासमोर आलेला आहे. आज प्रश्नोत्तराचा तास सोडून आम्ही राज्यपाल महोदयांना भेटण्यासाठी गेलो होतो. दरवर्षी विदर्भ,कोकण आणि मराठवाडा भागाला अशा प्रकारची वागणूक मिळते. मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्री त्यानंतर प्रतिमुख्यमंत्री आणि सुपरमुख्यमंत्री आहेत काय ? राज्य कायद्याने चालावे हे कायदेमंडळ आहे. राज्याच्या मुख्यमंत्र्यांना दिलेले आदेश जर ओव्हररुल्ड केले जात

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

असतील तर या राज्यामध्ये लोकांच्या अपेक्षा काय राहणार ? मुख्यमंत्र्यांना बोलावून खुलासा करण्यास सांगावे आणि त्यानंतर सभागृहाचे कामकाज पुढे चालू करावे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी वापरलेला शब्द आपण रेकॉर्डवरुन काढून टाकला आहे. परंतु हे सभागृह आहे. मैदानावरची सभा नाही. सभागृहामध्ये भाषण करताना अशा प्रकारचे शब्द वापरले जाणार नाहीत याची माननीय सदस्यांनी काळजी घ्यावी.

यानंतर श्री. भारवि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, आपल्या मार्फत मला सभागृहाला विनंती करावयाची आहे. सन्माननीय मुख्यमंत्री हे काही कामानिमित्त दिल्ली येथे गेले आहेत. त्यामुळे ते आज सभागृहामध्ये उपस्थित राहू शकत नाही. राज्यमंत्री म्हणून सर्वच फाईली माझ्याकडे येणे अपेक्षित नसते. येथे कोण लायक आहे, कोण लायक नाही याचा निर्णय जनता घेते. त्यावर भाष्य करणे मला प्रशस्त वाटत नाही.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी अत्यंत गंभीर अशी बाब सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली आहे. निधीचे वाटप माननीय राज्यपाल महोदयांच्या निदेशाप्रमाणे व्हावे अशाप्रकारची टिपणी सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी त्या फाईलवर लिहिली आहे. सदर बाब जर खरी असेल तर त्यासंबंधीचे निवेदन करण्याचे निदेश आपण द्यावेत अशी माझी विनंती आहे.

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांनी आज महाराष्ट्र (पुरवणी) विनियोजन विधेयक, 2006 हे विधान सभेत मांडण्यास परवानगी दिलेली नाही. त्यामुळे सदर विधेयक या सभागृहात विचारात घेण्यासाठी मांडण्यात येणार नाही. त्यामुळे ही चर्चा आपण सोमवारी घ्यावी व अन्य कामकाजाला सुरूवात करावी.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी का परवानगी दिली नाही ? हे सभागृहाला कळले पाहिजे.

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी परवानगी का दिली नाही ? हे राज्यपाल महोदयांनी मला सांगावे असे अपेक्षित नाही.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सन्माननीय मंत्र्यांनी आता येथे केलेले निवेदन अत्यंत गंभीर आहे. धीस अमाऊंटस टू क्रायसेस. धीस एन्टायर ॲक्शन अमाऊंटस टू क्रायसेस. तेव्हा यासंबंधीचा निर्णय होई पर्यंत आपल्याला कामकाज पुढे नेता येणार नाही.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

..2..

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, ही घटनात्मक लढाई आहे. कायदेशीर लढाई आहे. आज पर्यंत कधीही घडले नव्हते असे महाराष्ट्राच्या इतिहासात घडले आहे. विनियोजन विधेयक मांडू नका असा निरोप राज्यपाल महोदयांनी शासनाला पाठविलेला आहे. ही महाराष्ट्राच्या इतिहासातील पहिलीच घटना आहे. सभापती महोदय, या सभागृहामध्ये आम्ही आपल्याकडे नेहमी न्याय मागत असतो. आपण ॲडव्होकेट जनरलचे ओपिनियन घेणार आहात. आज मी सांगितले की, माननीय मुख्यमंत्र्यांनी फाईलवर लिहिले आहे की, राज्यपालांच्या निदेशाप्रमाणे निधीचे वाटप करण्यात यावे. तरी देखील मुख्यमंत्र्याच्या आदेशाला ओव्हर रूल्ड करण्यात आले आहे. माननीय मुख्यमंत्री मोठया मनाचे किती आहेत ते आपण पहावे. त्यांनी ज्यांना मंत्रिमंडळामध्ये नियुक्त केले, तेच सुपर मुख्यमंत्री झाले आहेत. ते कोण आहेत हे मला माहित नाही. विधिमंडळाचे कामकाज घटनेच्या नियमाप्रमाणे होणार नसेल, संविधानाप्रमाणे होणार नसेल तर आम्ही पुढचे कामकाज होऊ देणार नाही. आज घटनेचे व्हॉयलेशन होत आहे. कायद्याचे व्हॉयलेशन होत आहे. जे राज्याचे मंत्रिमंडळ स्थापन करतात त्या माननीय मुख्यमंत्र्यांच्या अधिकाराचे देखील व्हॉयलेशन झालेले आहे. माननीय मुख्यमंत्री दिल्लीला असतील तर सरकारतर्फे दुसऱ्या जबाबदार मंत्र्यांनी मुख्यमंत्र्यांनी असा शेरा लिहून सही केली होती किंवा नाही हे सांगावे. हा एक मिनिटाचा प्रश्न आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ D/ MAP/ पूर्वी श्री.भारवि... 13:30

श्री.नितीन गडकरी....

सन्माननीय अर्थ राज्यमंत्री महोदयांना एक संधी आहे. त्यामुळे त्यांनी स्वत: जाऊन या संदर्भात चौकशी करावी, फाईल शोधावी, ती फाईल पहावी. त्यानंतर त्यांनी सभागृहात यावे आणि सांगावे की, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी जो आरोप केला आहे तो चुकीचा आहे. मुख्यमंत्री महोदयांनी अशा प्रकारे कोणतीही सही केलेली नाही. खरोखरच जर मुख्यमंत्री महोदयांनी तशी सही केली नसेल तर मी सदनामध्ये त्यांची दिलगिरी व्यक्त करेन, एवढेच नव्हे तर उभे राहून क्षमा मागेन. त्यामुळे जो पर्यंत या संदर्भात निर्णय होत नाही तोपर्यंत सभागृहाचे कामकाज चालू देऊ नये. कारण माननीय राज्यपाल महोदयांनी विनियोजन विधेयक मांडू नये असे सांगितलेले आहे. महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी फाईलवर लिहीलेले रिमार्क्स गायब करण्यात आलेले आहेत. ही फार गंभीर गोष्ट आहे. त्यामुळे शासनाकडून जोपर्यंत या गोष्टीचा खुलासा होत नाही तो पर्यंत आम्हाला सभागृहाच्या कामकाजामध्ये स्वारस्य नाही.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख, सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर सरपोतदार, दिवाकर रावते, जयंत प्र.पाटील, सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे आणि वित्त राज्यमंत्री डॉ.सुनील देशमुख यांनी अत्यंत महत्वाच्या विषयासंदर्भातील गांभीर्य विशद करण्याचा मनापासून प्रयत्न केला आहे. मी या विषयाच्या अनुषंगाने निष्कर्षाप्रत येत असताना, या गंभीर विषयावर निर्णय देत असताना, रुल्स ऑफ बिझनेसच्या दृष्टीने व शासनाच्या कामकाजाच्या दृष्टीने यामध्ये काही संबंध असण्याची शक्यता आहे. तसेच या ठिकाणी माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या बाबतीत सुध्दा काही वक्तव्ये केली गेली आहेत. म्हणून मला असे वाटते की, या संपूर्ण बाबीची सखोल माहिती घेतल्यानंतर, माझे मत सदनाला सांगणे हे माझे कर्तव्य राहील. मी सदनाला एवढेच सांगू इच्छितो की, सन्माननीय वित्त राज्यमंत्री डॉ.सुनील देशमुख यांनी सांगितले आहे की, आज या सभागृहामध्ये विनियोजन विधेयक येणार नाही. त्यामुळे ते विधेयक सोमवारला येण्याची शक्यता आहे. त्यादृष्टीने मी सांगेन की, आजच्या कामकाजपत्रिकेवरील विनियोजन विधेयक ही बाब

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**....

वगळता, इतर सर्व अशासकीय कामकाज आपण आज पूर्ण करु. सोमवार पर्यंत आज या पध्दतीने चर्चा झाली, जे मुद्दे उपस्थित केले गेले त्याबाबतीत शासनाकडून मी संपूर्ण माहिती घेईन. माहिती घेतल्यानंतर, याबाबतचा निर्णय होईल व त्यानंतर सोमवारचे कामकाज रितसर करु. त्यामुळे माझा इंटेरियम रिप्लाय असा आहे की, आज अशासकीय कामकाज घेण्यात येईल.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, आम्हाला विनंती करावयाची आहे की, आपली काही तरी सँकटीटी आहे, रुल्स ऑफ बिझनेसची काही सँक्टीटी आहे, सभागृहाची काही सँक्टीटी आहे, विधानमंडळाने तयार केलेल्या कायद्यांची सँक्टीटी आहे, राज्यपाल महोदयांची सँक्टीटी आहे, भारतीय घटनेच्या संविधानाची सँक्टीटी आहे, माननीय मुख्यमंत्री महोदयांची सँकटीटी आहे. परंतु या सर्वांनाच लंबे करण्याचे धोरण यांनी आखले तर या ठिकाणी वांझोटी चर्चा का म्हणून आणि कशासाठी करावयाची ? खरे म्हणजे ही चर्चा उपस्थित करण्यामध्ये मला आनंद होतो आहे अशातला भाग नाही. या चर्चेमुळे मला अतिशय क्लेश होत आहे, दु:ख होत आहे. मी जरी विरोधी पक्षामध्ये असलो तरी लोकशाहीवर माझी श्रध्दा आहे, माननीय सभापतींवर श्रध्दा आहे, सभागृहावर श्रध्दा आहे, सभागृहाच्या सार्वभौमत्वावर श्रध्दा आहे, एवढेच नव्हेतर माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या अधिकारावर सुध्दा श्रध्दा आहे. मुख्यमंत्री महोदयांची अशी अवहेलना होत असेल तर, मग या ठिकाणी कशाला प्रश्न उपस्थित करावयाचे ? कशाला चर्चा उपस्थित करावयाच्या ? कशाला नियमांचा आधार घ्यावयाचा ? या ठिकाणी सचिव नकोत, त्यांचे ओपिनियन नको. त्यामुळे हे सर्व पुस्तके येथून उचलून टाका. इथे कोणीही यावे, काहीही बोंबलावे, नाचावे-गावे आणि बाहेर जावे असे प्रकार होऊ द्या. सभापती महोदय, आपला सन्मान ठेऊन मी आपणांस विनंती करीत आहे की, आपण जे सुचविले आहे ते आम्हाला मान्य करता येत नाही. आपणास वाटले तर आम्हाला सभागृहातून हाकलून द्या. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी आपण सभागृहाबाहेर जावे असे आपण आम्हाला सांगा. आपला कसलाही अवमान न करता आम्ही बाहेर जाऊ. कारण या सरकारने केलेल्या पापामध्ये निदान आम्ही तरी सहभागी होऊ इच्छित नाही. घटनेचा, लोकशाहीचा, गव्हर्नरचा, मुख्यमंत्र्यांचा, सभापतींचा, सभागृहाचा जर अपमान होत असेल आणि राष्ट्रवादी पक्षाची दादागिरी चालत असेल, ती दादागिरी काँग्रेस पक्ष सहन करु शकेल. कारण त्यांची सहनशिलता महान आहे, त्यांनी जरुर सहन करावी. परंतु आम्ही कदापि सहन करणार नाही.

नंतर श्री.कांबळे....

अमुद्रित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ....

शेट्टी साहेबांनी सहन करावे, पुरके साहेबांनी सहन करावे, म्हेत्रे साहेबांनी सहन करावे. मेहेरबानी करुन ही अवहेलना आम्ही सहन करु इच्छित नाही. सभापती महोदय, आपल्याला जर असे वाटत असेल की, आम्ही येथे बसलेलो आहोत तर आपण आम्हाला बाहेर जाण्यास सांगावे. आमच्यावर कारवाई करावी. परंतु आम्ही या सभागृहाच्या कामकाजात सहभागी होऊ शकत नाही.

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन बसतात. )

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य जागेवरुन बाजूला येऊन घोषणा देत असतात. )

**सभापती** : मी यासंबंधी माझा निर्णय दिलेला आहे. अशा परिस्थितीत सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नसल्यामुळे मी सभागृह अर्ध्या तासासाठी स्थगित करतो.

( सभागृहाची बैठक दुपारी 1 वाजून 36 मिनिटांनी अर्ध्या तासासाठी स्थगित झाली. )

----

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**( सभापती स्थानी माननीय उपसभापती )**

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात )

**उपसभापती** : आपले म्हणणे काय आहे ते मला ऐकू तरी द्या.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात )

यानंतर श्री. सांगळे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : अशा परिस्थितीत सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नसल्यामुळे मी सभागृह अर्ध्या तासासाठी स्थगित करतो.

( सभागृहाची बैठक दुपारी 2 वाजून 10 मिनिटांनी अर्ध्या तासासाठी स्थगित झाली. )

----

( यानंतर श्री.सुंबरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( सभागृह स्थगितीनंतर ... )

**सभापतीस्थानी - माननीय उपसभापती**

**उपसभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, दालनात अजूनही चर्चा चालू आहे तेव्हा आपण तोपर्यंत कार्यक्रम पत्रिकेवरील पुढील कामकाज घेऊ या. ...

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, ही चर्चा कोणामध्ये आणि कोणत्या विषयावर होत आहे ते आम्हालाही कळू द्या. ..

**उपसभापती** : मी सभागृहाची बैठक 3.00 वाजेपर्यंत स्थगित करतो.

( सभागृहाची बैठक दुपारी 2.44 वाजता, 3.00 पर्यंत स्थगित झाली. )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभागृह स्थगिती नंतर**

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी मघाशी जो हरकतीचा मुद्दा उपस्थित केला होता त्यासंबंधी खुलासा झालेला नाही. हे प्रकरण अतिशय गंभीर असल्यामुळे तो खुलासा झाला पाहिजे अशी माझी आपणास विनंती आहे. या ठिकाणी माननीय मुख्यमंत्र्यांनी सही केलेल्या फाईलचा प्रश्न आहे. एका बाजूला माननीय मुख्यमंत्र्यांनी राज्यपालांनी दिलेल्या निदेशानुसार निधीचे वाटप करावे असे त्या फाईलवर लिहिल्यानंतर ती फाईल बाजूला सारुन माननीय राज्यपालांच्या निदेशाचा व घटनेचा अवमान करुन निधीचे वाटप करण्यात आले आहे. आणि म्हणून या गंभीर घटनेबाबत खुलासा होण्यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांना बोलाविण्यात यावे अन्यथा माननीय मुख्यमंत्र्यांशी संपर्क साधून त्यासंबंधी खुलासा करण्यात यावा अशी आमची मागणी आहे. या बाबतीत जर सरकार गंभीर नसेल तर हे सभागृहाचे कामकाज तहकूब करावे. आणि म्हणून जोपर्यंत शासनातर्फे यासंबंधी खुलासा होणार नाही तोपर्यंत सभागृहाचे कामकाज आपल्याला करता येणार नाही.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आज या सदनामध्ये दोन घटनात्मक मुद्दे उपस्थित झाले आहेत. त्यापैकी पहिला मुद्दा असा की, माननीय राज्यपालांनी दिलेले निदेश डावलून उपलब्ध झालेल्या निधीचा विनियोग अन्यत्र करण्यात आला. हे करीत असतांना माननीय राज्यपालांनी दिलेले निदेश डावलले गेले. त्यामुळे त्यांच्या अधिकाराचा व घटनेचा भंग झाला आहे. दुसऱ्या मुद्दयाबाबत मी जास्त चर्चा करणार नाही. त्यावर यापूर्वी चर्चा झाली आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार (पुढे सुरु...

दुसरा मुद्दा महत्वाचा आहे. महाराष्ट्र राज्याचे माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांनी या वाटपाबद्दल अतिशय स्पष्ट निर्देश फाईलवर लिहिलेले आहेत, अशी येथे माहिती दिलेली आहे.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

..(अडथळा)...

श्री.विनोद तावडे : सन्माननीय सदस्य मधेच कसे काय बोलतात ? त्यांना आपण परवानगी दिलेली आहे काय ?

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांचा हरकतीचा मुद्दा आहे, तो त्यांनी विचारावा.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : ही चर्चा गंभीर आहे, याबाबत माझे दुमत नाही. परंतु प्रश्न असा आहे की, वारंवार त्या बाजूचे सन्माननीय सदस्य उभे राहून सांगतात की, मुख्यमंत्र्यांनी फाईलवर आदेश दिले. मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या आदेशाची फाईल कोणी पाहिलेली आहे ? कोणा सन्माननीय सदस्यांनी फाईल मी पाहिलेली आहे असे सांगावे.... (अडथळा)

श्री.दिवाकर रावते : हा तुमचा हरकतीचा मुद्दा आहे काय ?

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : होय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. ज्या ज्या सन्माननीय सदस्यांनी मुख्यमंत्र्यांनी फाईलवर रिमार्क मारलेले आहेत, असे सांगितले आहे त्यांच्यापैकी कोणी ती पाहिली आहे ते सांगावे. हा माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री.दिवाकर रावते : एक तर काँग्रेसचे मुख्यमंत्री आहेत. राष्ट्रवादीच्या मंत्र्यांनी गोंधळ केला, असे दिसल्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी हरकतीच्या मुद्याच्या माध्यमातून बोलत आहेत. त्या फाईलवर सही झाली की नाही ? याचे उत्तर सरकारतर्फे आले पाहिजे. तुम्ही आम्हाला कशासाठी विचारता ? आम्हाला प्रश्न विचारण्याचा तुम्हाला कोणी अधिकार दिला ? त्याबाबतचा सरकारने खुलासा केला पाहिजे. तुम्ही कोण विचारणार ? सरकारने खुलासा केला पाहिजे.

श्री.मधुकर सरपोतदार : सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी ती फाईल पाहिलेली आहे काय ? सभापती महोदय, सन्मानीय विरोधी पक्षातर्फे एक निवेदन केलेले आहे,त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी, हे ॲडव्होकेट आहेत. त्यांना केवळ कोणता विषय मांडावा, याबाबत त्यांनी संयम राखण्याची आवश्यकता आहे, परंतु त्यांनी तो संयम न ठेवता, माझ्या भाषणामध्ये मध्येच हरकतीचा मुद्दा



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार (पुढे सुरु......

उपस्थित केला. त्या हरकतीच्या मुद्यावर आपण काय सांगितले, ते मला कळले नाही. म्हणून मी आपण सांगेपर्यन्त बसून राहिलो. त्यांचा मुद्दा फेटाळून लावला असेल तर माझे एकच म्हणणे आहे की,आम्ही सकाळपासून याबाबतीत मुद्दे मांडतो आहोत. तरीही सन्माननीय सदस्य श्री.कुलकर्णी का गप्प बसले होते, मला माहीत नाही. आताच मधे त्यांना कोठून बोलण्याचा झटका आला माहीत नाही. फाईल कोणी पाहिलेली आहे, म्हणून ते विचारायला लागले. माझे एकच म्हणणे आहे की, त्या फाईलवर तसे लिहिलेले नसेल तर आमचे आंदोलन त्याच क्षणी थांबेल. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी फाईल पाहून तसे सांगावे. जर ते सांगत नसतील तर शासनातर्फे त्यांनी बाहेर जाऊन खुलासा करावा. शासनातर्फे तसे अधिकार त्यांना दिले असतील तर त्यांनी खुलासा करावा. आमचे असे म्हणणे आहे की, आम्ही दोन घटनात्मक मुद्दे उपस्थित केलेले आहेत, त्याचा खुलासा जोपर्यन्त होत नाही, तोपर्यन्त या सदनाचे काम पुढें चालवू नये. हा सदनाचा अवमान आहे, महाराष्ट्र राज्याचा अवमान आहे, राज्यपालांचा अपमान आहे, घटनेचा अवमान आहे. दोन घटना अतिशय दुर्दैवी घडलेल्या आहेत. जोपर्यन्त त्याचा खुलासा होत नाही तोपर्यन्त या सदनाचे काम पुढे चालवू नये,अशी आमची स्पष्ट भूमिका आहे, म्हणून आम्ही आपल्यासमोर हा युक्तीवाद केला. धन्यवाद.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, या महाराष्ट्रामधील जे मागास विभाग आहेत,त्यांना न्याय देण्याच्याबाबतीत गेल्या दोन-चार वर्षांमध्यें...,.

**उपसभापती** : माझ्या माहितीप्रमाणे विधानसभेमध्ये पुरवणी मागण्यांवरील विनियोजन विधेयक सोमवारी घ्यायचे ठरविलेले आहे. जोपर्यन्त खालून वर ते विधेयक येत नाही....

श्री.विनोद तावडे : मुख्यमंत्र्यांची त्या फाईलवर सही आहे. मंत्र्यांनी मुख्यमंत्राना ओव्हर रुल करुन निर्णय केलेला आहे काय ?

**उपसभापती** : मला बोलू द्यावे. जो पर्यन्त विधानसभेतून पुरवणी मागण्यांवरील विनियोजन विधेयक आलेलेच नाही, तोपर्यन्त त्याच्यावर चर्चा सुरु ठेवणे हे मला तितकेसे योग्य वाटत नाही.

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** ......

मी असे म्हणतो की, सोमवारी विधानसभेमध्ये ते विधेयक चर्चेला घेणार आहेत. ते विधेयक या सभागृहामध्ये आल्यानंतर आपण बोलावे. तोपर्यंत आपण पुढचे कामकाज घेऊ या.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, ही त्या विधेयकासंबंधीची चर्चा नाही.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, ते विधेयक माननीय राज्यपालांनी थांबविले आहे.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, यामध्ये थोडीशी गफलत होत आहे. ही इतकी साधी गोष्ट नाही. It is for the first time in the history of Maharashtra that Governor refused the permission. सभापती महोदय, विधानसभेमध्ये आपण आपल्या डोळ्यांनी पाहिलेले आहे. मीही पाहिलेले आहे. गॅलरीतून आपण सगळ्यांनी पाहिलेले आहे. हे का झाले ? गेली अनेक वर्षे मी या सभागृहामध्ये बोलत आहे तसेच विधानसभेमध्ये सन्माननीय सदस्य बोलत आहेत परंतु कॉन्स्टिटट्यूशनल डायरेक्शन्सचे फेथफूल इम्प्लिमेंटेशन होत नाही. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी म्हणाले ते बरोबर आहे की, माननीय मुख्यमंत्र्यांनी फाईलमध्ये काय लिहिले आहे ते कोणी पाहिलेले आहे ? या ठिकाणी सन्माननीय सदस्यांना अधिकार आहे. त्यांच्याकडे अधिकृत माहिती आहे की, माननीय मुख्यमंत्र्यांनी असे असे लिहिलेले आहे आणि सन्माननीय सदस्यांना त्याबाबत विचारण्याचा अधिकार आहे. शासनाच्या कोणी तरी प्रतिनिधीने सांगितले पाहिजे की, ते खरे नाही. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी मघाशी सांगितले की, ते खरे नसेल तर मी क्षमा मागेन. माझे असे म्हणणे आहे की, हे अत्यंत जिव्हाळ्याचे विषय आहेत आणि त्यांचे खुलासे अधिकृतपणे सभागृहामध्ये यावयास पाहिजे. एका गोष्टीचा आपण उल्लेख केला की, महाराष्ट्राच्या निर्मितीपासून हे पहिल्यांदाच घडलेले आहे आणि माननीय राज्यापाल महोदय आपल्याला ॲप्रोप्रिएशन बिल मांडण्यास परवानगी देत नाहीत ही गोष्ट क्रेडिटेबल नाही. ते परवानगी का देत नाहीत ? या सभागृहाने तीन वर्षापूर्वी एकमताने शिफारस करुन त्यांना सांगितले होते की, राज्यपालांच्या निर्देशाकडे लक्ष ठेवावे. That was the recommendation and not an amendment. It was accepted unanimously, but was not implemented. सभापती महोदय, या परिस्थितीमध्ये आम्ही आपल्याला म्हणत आहोत

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख ....

की, ज्या दोन गोष्टी झालेल्या आहेत त्यातील एक म्हणजे सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी मांडलेला मुद्दा आणि दुसरे म्हणजे माननीय राज्यपालांनी परवानगी दिलेली नाही तो मुद्दा, या दोन्ही गोष्टी लक्षात घेता त्याचे महत्व आणि गांभीर्य आपण लक्षात घ्यावे अशी विनंती आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी गेल्या 18 वर्षापासून या सभागृहाचा सदस्य आहे. मला सभागृहाच्या सगळ्या नियमांची माहिती आहे असा दावा मी करीत नाही. मी म्हणतो ती प्रत्येक गोष्ट सत्य आहे असाही दावा मला करावयाचा नाही. मी याबाबतीत फार ट्रान्स्परंट आहे. परवा माझ्या हातून सभागृहामध्ये चूक घडली. सन्माननीय राज्यमंत्री श्री. सुरेश शेट्टी सभागृहामध्ये उपस्थित आहेत. ते या सभागृहामध्ये भाषण करीत असताना मी त्यांना असे म्हणालो की, एका वाक्यात बोला आणि मागण्या मंजूर करुन घ्या. मी खाली बसून बोललो. त्यांनी माझे म्हणणे ऐकले. आमचे सन्माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी नाराज झाले. मी ताबडतोब सांगितले की, यामध्ये माझ ी चूक आहे. यामध्ये सन्माननीय राज्यमंत्री श्री. सुरेश शेट्टी यांची काही चूक नाही. मी आपल्याला विनंती केली की, माझ्या चुकीमुळे हे झालेले आहे त्यामुळे आपण त्यांना संधी द्यावी. सभापती महोदय, मी अतिशय जबाबदारीने सांगितले आहे की, विदर्भ, मराठवाडा, कोकण, उत्तरमहाराष्ट्राच्या विकासाचा मुद्दा आहे. सर्व पक्षाच्या भिंती तोडून त्या विषयाकरिता आम्ही संघर्ष करीत आहोत. आम्ही राज्यपाल महोदयांना भेटावयास गेलो. गेल्या तीन वर्षात जेवढे जेवढे निर्देश माननीय राज्यपालांनी दिले होते त्या सगळया आदेशांना केराची टोपली मिळाली. आमच्यावरील अन्याय वाढतच चाललेला आहे. पश्चिम महाराष्ट्राचा विकास झाला पाहिजे, त्यांना पाणी मिळाले पाहिजे. त्यांच्याही पैशाचे वाटप करा. इरिगेशनचे बजेट वाढवा आणि निकषाप्रमाणे त्यांनाही पैसे द्या आणि आम्हालाही द्या. प्रायोरिटी इरिगेशनला द्यावी असे मी वारंवार सभागृहात सागत आहे. जर आज इरिगेशनचे बजेट 5 हजार कोटी रुपयांचे झाले असते तर त्याचे वाटप होऊन पश्चिम महाराष्ट्राचे काम झाले असते आणि आम्हालाही पैसे मिळाले असते. पण हे असे करतात की, पैसे दाखवितांना सुरुवातीला 1941 कोटी रुपये अशी एक रक्कम दाखवितात. माननीय राज्यपालांना पत्र पाठवितात की, या वर्षी रिसोर्सेसची कमी असल्यामुळे यापेक्षा जास्त निधीची तरतूद पाटबंधारे खात्याकरिता करु शकत नाही. फायनल तरतूद 1941 कोटी रुपयांची दाखवितात. त्याचे

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MAP/

श्री. नितीन गडकरी .....

निकषाप्रमाणे वाटप करतात आणि प्रत्येक अधिवेशनात पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून, जादूच्या प्रयोगातून काही रिॲप्रोप्रिएशनचे पैसे, काही इकडचे पैसे आणतात आणि परस्पर पैसे खर्च करुन टाकतात. मी आपल्याला नियम वाचून दाखविले. विधिमंडळाने जे नियम पास केले त्याचे कायद्यामध्ये रुपांतर झाले. त्या कायद्याप्रमाणे या ठिकाणी एका रिजनचे पैसे दुसऱ्या रिजनला ट्रान्सफर करता येत नाहीत. यांनी 263 कोटी रुपये ट्रान्सफर केले. तसेच दुसरे 878 कोटी रुपये असे मिळून 1041 कोटी रुपये यांनी इरिगेशनला वर्ग केले. कायदा काय सांगतो ? ॲडव्होकेट जनरलचे मत काय आहे हे मी वाचून दाखविले.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MAP/ D/ पूर्वी श्री. बरवड 15:15

(श्री. नितीन गडकरी...)

जेव्हा जेव्हा इरिगेशनसाठी अशा प्रकारची तरतूद करण्यात आली तेव्हा तेव्हा It is the first duty of the Govt. to immediately intimate to the Governor. माझे लर्नेड मित्र ॲड. गुरुनाथ कुलकर्णी यांना मी सांगू इच्छितो की, मी या सदनामध्ये कायद्याचे जे जे मुद्दे उपस्थित केले ते मुद्दे चुकीचे होते असे त्यांनी उभे राहून सांगावे. पैशाचे वाटप करताना या शासनाने राज्यपालांना न कळविताच पैशाचे वाटप केले. आम्ही अशा अशा त-हेने पैशाचे वाटप केलेले आहे हे या सरकारने माननीय राज्यपालांना सांगितले पाहिजे. माननीय राज्यपालांना न सांगताच शासनाने पैशाचे वाटप करुन टाकले. सभापती महोदय, पक्षाच्या भिंती सोडून सर्वांनाच जिल्ह्याचा विकास झाला पाहिजे असे वाटते्. माननीय वित्त राज्यमंत्री डॉ. सुनील देशमुख यांचा यामध्ये काय गुन्हा आहे ? महाराष्ट्रातील अनुशेषाबद्दल त्यांच्या हातून त्यांना पाप करायला लावता , त्यांना उत्तर द्यायला लावता. सभापती महोदय, मी याठिकाणी एवढेच सांगितले की, अनुशेषाच्या संदर्भात माननीय राज्यपालांचे निर्देश पाळले जात नाहीत, माननीय सभापतींनी सभागृहामध्ये दिलेले निर्देश पाळले जात नाहीत, घटनेतील तरतुदी पाळल्या जात नाहीत, तर मग हे सरकार कोणत्या घटनेने चालत आहे ? विधानपरिषदेतील मॅट्रेसेसचा रंग हा लाल आणि विधानसभेतील मॅट्रेसेसचा रंग हिरवा असावा असे नियम पुस्तिकेमध्ये लिहिलेले आहे. माननीय राज्यपालांच्यानंतर पहिला कोण, दुसरा कोण, तिसरा कोण हा प्रोटोकॉल देखील नियमाप्रमाणे आहे. या सभागृहातील संपूर्ण कामकाज हे घटनेच्या आधारे, विधिमंडळाच्या नियमांच्या आधारे चालते. तसे ते चालवायचे नसेल तर सभापती महोदय, आपणा समोरची सर्व पुस्तके बंबात टाकून पेटवून द्या. सभापती महोदय, आपणा समोर ठेवलेली पुस्तके आपण कशासाठी पाहाता ? आपण जर आम्हाला न्याय देणार नसाल तर मी आपणास एकच विनंती करीन की, आपणा समोर असलेली सर्व पुस्तके तेथून उचलावित. आपणाला जर नियमाप्रमाणे चालायचे नसेल तर ही घटनेची, नियमांची पुस्तके कशासाठी ठेवता ? काल या सदनामध्ये सत्ताधारी पक्षाच्या बाजूने असे म्हटले गेले की, गडकरींनी सभागृहामध्ये गाणी म्हटली. आम्ही गाणी म्हटली म्हणून तुम्ही देखील म्हणा.... सभापती महोदय, याठिकाणी मी मूलभूत प्रश्न उपस्थित केलेला आहे. मी या सभागृहामध्ये जबाबदारीने बोलतो. याबाबतीत महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्याची भूमिका न्याय्य आहे. माननीय मुख्यमंत्र्याकडे जेव्हा फाईल

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री.नितीन गडकरी पुढे सुरु...)

गेली त्यावेळी त्यांनी फाईलवर, "इरिगेशनच्या पैशाचे वाटप माननीय राज्यपालांच्या आदेशानुसार झाले पाहिजे" असे लिहिले. सभापती महोदय, सर्व मंत्र्याना हे सांगण्याचा अधिकार आहे की, नितीन गडकरी तुम्ही सभागृहाची दिशाभूल करीत आहात, तुम्ही सांगता तशी वस्तुस्थिती नाही. पण असे सांगणारा है कोई माँ का लाल ? अगर है, तो आ जाओ. नितीन गडकरी यांनी सभागृहाची दिशाभूल केलेली आहे असे कोणत्याही मंत्र्यांनी मला सांगावे. मी त्याच क्षणी उभा राहून हात जोडून सभागृहाची माफी मागेन. या सभागृहामध्ये जेव्हा माननीय सदस्य बोलतात तेव्हा ते सत्य असते असे गृहीत धरले जाते. या सभागृहाचे तसे संकेत आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांनी फाईलवर असा असा शेरा लिहिलेला आहे असे सांगून त्याबाबतीत मी हरकतीचा मुद्दा उपस्थित केला आणि सांगितले की, माननीय मुख्यमंत्र्यांनी तसे लिहिलेले आहे किंवा नाही याचा खुलासा सरकारने करावा. याबाबतीत माननीय मुख्यमंत्री दिल्लीला गेले आहेत, असे उत्तर देण्यात आले. सभापती महोदय, माझी अशी विनंती राहील की, माननीय मुख्यमंत्र्यांची परवानगी घेऊन त्यांच्या ऑफिस मधील फाईल पहावी आणि तसे लिहिलेले आहे की नाही याचा खुलासा करावा. तसे लिहिलेले नसेल तर मी या सभागृहाचा वेळ घेतला त्याबद्दल क्षमा मागेन. ही अतिशय गंभीर बाब असल्यामुळे याबाबतीत खुलासा झाला पाहिजे. तो होत नसेल तर या सरकारला विधिमंडळाच्या कामकाजाच्या संदर्भातील नियमांची किंमत नाही, सभागृहाच्या प्रथा, परंपरांची किंमत नाही, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या घटनेची किंमत नाही, राज्यापालांच्या निर्देषांची किंमत नाही असे होईल आणि हे जर असेच चालणार असेल तर या सभागृहाच्या कोणत्याही कामकाजामध्ये भाग घेण्यात आम्हाला स्वारस्य नाही. सभापती महोदय, आपण न्यायाच्या खुर्चीवर बसलेले आहात, आपण कोणत्याही पक्षाचे प्रतिनिधी नसता, आपण नेहमी कायद्याने निर्णय देता...

**उपसभापती** : दोन्ही बाजूंकडून मला बिनविरोध निवडून दिलेले आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मला विश्वास आहे की, याबाबतीत आपण नियमांच्या आधारे निर्णय घ्याल, आपण न्यायप्रिय आहात, आपण नि:पक्ष आहात, सर्वांबरोबर न्याय करण्याचा आपला स्वभाव आहे, या सभागृहामध्ये आपल्या तोंडून सत्यच निघते असा आमचा दृढ विश्वास आहे.

...नंतर श्री. कानडे...

अप्रुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ D/ MAP/ 15:20

श्री. नितीन गडकरी ...

सभापती महोदय, या विषयावर सरकारला खुलासा करण्याचे निर्देश आपण ताबडतोब द्या अशी माझी आपणांस नम्र विनंती आहे. रामशास्त्री प्रभुणेंसारखे तुमचे नांव महाराष्ट्र विधानमंडळाच्या इतिहासात लिहिले जाईल की या विषयावर तुम्ही असा निर्णय दिला आणि आम्हांला न्याय द्या. न्यायाची बाजू घ्या. महाभारत द्रौपदीकरिता घडले होते. ज्यावेळी पांचालीचे वस्त्रहरण सुरु होते त्यावेळी कृपाचार्य,भीष्माचार्य,धृतराष्ट्र हे सभागृहामध्ये होते.....

**उपसभापती** : द्रौपदीचे वस्त्रहरण सुरु होते असे आपण म्हणाला तेव्हा माझी भूमिका श्रीकृष्णाची आहे काय ?

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय,तुमची भूमिका श्रीकृष्णाची नाही तर तुमची भूमिका विकर्णाची आहे तो त्यावेळी सभागृहात म्हणाला होता दुर्योधना तू जे करतो आहेस ते योग्य नाही सत्य हे आहे असे म्हणून त्याने सत्याची आणि न्यायाची बाजू महाभारतामध्ये कौरवांच्या सभेत मांडली होती. विकर्ण त्यावेळी जरी दुर्योधनाचा भाऊ असला तरी तुम्ही आमच्या सार्वभौम सभागृहाचे सभापती आहात. तुमची प्रतिष्ठा, तुमचा मान, तुमचा सन्मान हा आमचा मान आणि सन्मान आहे. तुम्ही आजपर्यंत निर्णय निरपेक्ष भावनेने आणि न्याय बुध्दीने दिलेले आहेत. तेव्हा तुम्ही आज देखील योग्यच निर्णय द्याल असा मला विश्वास आहे. तुम्ही आम्हांला न्याय द्या एवढी विनंती करतो. मागासलेल्या भागाला न्याय देणे हे तुमच्या हातून होईल एवढी कळकळीची विनंती करतो. आपण मेहरबानी करुन विचारपूर्वक निर्णय द्या

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, सन्माननीय गडकरी साहेबांचे असे म्हणणे आहे की, माननीय मुख्यमंत्र्यांच्या मान्यतेशिवाय या पुरवणी मागण्या सभागृहासमोर आलेल्या आहेत. मला आपणांस सांगावयाचे आहे की सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी या सर्व मागण्यांना मान्यता दिल्यानंतर कॅबिनेटपुढे या प्रस्तावावर सविस्तर चर्चा झाली आणि कॅबिनेमध्ये चर्चा झाल्यानंतर त्या सभागृहासमोर आलेल्या आहेत.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी काय म्हटले ते समजून घ्या. मुख्यमंत्र्यांना तुम्ही ओव्हररुल्ड केले की अजित पवारांनी केले ते मला माहीत नाही. याबाबतीत मुख्यमंत्र्यांकडे जी फाईल गेली होती त्यावर फाईलवर माननीय मुख्यमंत्र्यांनी राज्यपालांच्या निदेशानुसार निधीचे वाटप केले पाहिजे असे रिमार्क्स लिहिले आहेत असे मी सदनामध्ये माहितीच्या आधारावर

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ D/ MAP/ 15:20

श्री. नितीन गडकरी ...

सांगितले. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी हे सभागृहाची दिशाभूल करीत आहेत असे जर आपण सांगत असाल तर मी सभागृहाची माफी मागायला तयार आहे. मी खरे बोलतो किंवा खोटे बोलतो हे सांगा. मुख्यमंत्र्याला ओव्हररुल्ड करण्याचा अधिकार कॅबिनेटला आहे. तो आमचा विषय नाही. माझा एकच प्रश्न आहे रामाची सीता कोण ? त्यानुसार मुख्यमंत्र्यांनी फाईलवर मी वर सांगितल्याप्रमाणे रिमार्क्स लिहिले किंवा नाहीत एवढेच सांगा. होय किंवा नाही या दोनच शब्दात उत्तर द्या. नाही असेल तर मी क्षमा मागतो.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी जी भूमिका मांडली त्यात पाटबंधारे विभागाला निधीचे वाटप करण्याविषयीच्या प्रत्येक फाईलवर मुख्यमंत्र्यांची अनुमती असणाऱ्या सहया आहेत. नेमक्या कोणत्या फाईलबद्दल माननीय सदस्य बोलत आहेत हे मला माहीत नाही. परंतु सर्व मागण्यांच्या इंडीज्युअल फाईलवर माननीय मुख्यमंत्र्यांच्या सहया झ ााल्यानंतर हे सर्व प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे आले. मंत्रिमंडळाने मान्यता दिल्यानंतर पुरवणी मागण्यांसाठी आपल्यासमोर आलेले आहेत.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, 1941 कोटींव्यतिरिक्त 1041 कोटींपैकी 263 कोटी पुनर्विनियोजनाचे 778 कोटी अधिकचे असे 1041 कोटींचे वाटप झालेले आहे ती जी फाईल आहे म्हणजे अतिरिक्त निधीची त्या फाईलवर मुख्यमंत्र्यांनी मी वर म्हटल्याप्रमाणे लिहिले आहे. तुम्हांला जर माहीत नसेल तर आपण अर्धा तास थांबू. मंत्रालयात जाऊन तुम्ही माहिती घ्या नंतर सांगा. आमची हरकत नाही. मुख्यमंत्र्यांनी या फाईलवर असे लिहिले आहे की, या पैशाचे वाटप राज्यपालांच्या निदेशानुसार करण्यात यावे. मुख्यमंत्र्यांनी असे लिहिले असेल तर आमचा त्यांच्याबद्दलचा आदर वाढतो आहे. आम्हांला माहीत आहे ते न्याय देऊ शकत नाहीत. परंतु कमीत कमी, न्याय देण्याचा प्रयत्न तरी केलेला आहे.खरे का खोटे काय असेल ते सांगा.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, कोणत्या फाईलवर काय काय कोणी कोणी लिहिले आहे याची माहिती मला नाही . माहिती काढण्याचे आपले रिसोर्सेस मोठे आहेत तशी परिस्थिती आमची नाही. आम्ही लहान असू,गरीब असू,किरकोळ असू.

यानंतर श्री. भारवि

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील..

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांच्याकडे असलेल्या रिसोर्सेच्या तुलनेने मी लहान माणूस आहे. सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी कोणकोणत्या फाईलवर काय-काय लिहिले आहे आणि कोणकोणत्या गोष्टीला मान्यता दिली आहे याचा खोलात जाऊन जरूर अभ्यास करू. सन्माननीय मुख्यमंत्री महोदय इथे नाहीत. ते दिल्लीला गेले आहेत. (अडथळा)

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री किंवा मुख्यमंत्री जेव्हा एखाद्या फाईल विषयी डिसॲग्री होतात तेव्हा ती फाईल कॅबिनेटपुढे जाते. या प्रकरणातील मूळ फाईल ही वित्त किंवा पाटबंधारे विभागांपैकी एका विभागाची असू शकेल. ज्या फाईलसंबंधी मुख्यमंत्री डिसॲग्री असतात ती फाईल कॅबिनेट समोर येते. या 1041 कोटी रुपयाचा जो निधी आहे त्याची फाईल कॅबिनेट पुढे आल्यानंतर मग पुरवणी मागणी सभागृहासमोर आली असेल. कॅबिनेटसमोर जाण्याआधी ती फाईल सर्वांचे रिमार्क घेतल्यानंतर संबंधित मंत्र्यांच्या सहीसाठी जाते. अशी रुल्स ऑफ बिझिनेसची पध्दत आहे. मुख्यमंत्र्यांकडून ती फाईल पुन्हा परत आली असेल. मूळ फाईल ही पाटबंधारे विभागाची आहे की, वित्त विभागाची आहे हे मला माहित नाही. मला 100 टक्के संशय वाटतो की, ती फाईल वित्त विभागाची असेल. वित्त विभागाची फाईल ही सन्माननीय वित्त मंत्री श्री.जयंत पाटील यांच्याच कार्यालयामध्ये आहे. तेव्हा त्यांनी ती फाईल बघून त्यावर माननीय मुख्यमंत्र्यांनी काय शेरा लिहिला आहे तो पहावा.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, ही फाईल पाटबंधारे विभागाची असण्याची जास्त शक्यता आहे. आपल्या सभागृहासमोर ज्या पुरवणी मागण्या मांडल्या आहेत, त्या मंत्रिमंडळाने मान्य केल्यानंतर आलेल्या आहेत. माननीय मुख्यमंत्री यांच्या सहकार्याने आणि पुढकाराने मागण्या मांडलेल्या असतील तर त्यांच्यावर दबाव आणण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. मंत्री माननीय मुख्यमंत्र्यांना ओव्हर रूल करू शकतात की, मंत्र्यांना माननीय मुख्यमंत्री ओव्हर रूल करतात हे सन्माननीय सदस्यांना माहित पाहिजे. कारण ते देखील काही वर्षे मंत्रिमंडळामध्ये होते. त्यामुळे माननीय मुख्यमंत्र्यांना ओव्हर रूल करण्याचा प्रश्नच येत नाही.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, श्री.नितीन गडकरी यांनी जी माहिती सभागृहाला दिलेली आहे ती दिशाभूल करणारी आहे, असे मंत्रिमहोदयांनी त्यांच्याकडे असलेली फाईल बघून सांगितले तर, त्यांच्या शब्दावर विश्वास ठेवून मी सभागृहाची क्षमा मागायला तयार आहे.

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील : मी जर फाईल बघितली नसेल तर अमूक एक झाले आहे असे मी कसे सांगू शकेन. इथून पुढे सभागृहामध्ये फाईली घेऊन बसले पाहिजे असा त्याचा अर्थ होतो.

**उपसभापती** : सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन सोमवार, दिनांक 27 मार्च 2006 रोजी दुपारी 2.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक 3 वाजून 28 मिनिटांनी, सोमवार दिनांक 27 मार्च 2006 रोजीच्या दुपारी 2.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

.....

अमुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही